03-11-2016 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) A

MJS/ 12:00

11-03-2016 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) A-1

MJS/ AKN/ KTG/ 12:00

(सभापतीस्थानी माननीय सभापती)

सभागृहाच्या लॉबीमधील सीसीटीव्ही कॅमेरांबाबत

सभापती : प्रश्नोत्तरे...

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, माझा पॉईंट ऑफ ऑफ ऑर्डर आहे. आपण काल सूचना दिल्यानंतर देखील सदनाच्या लॉबीमध्ये सीसीटीव्ही कॅमरे जसेच्या तसे आहेत.

सभापती : सीसीटीव्ही कॅमरे काढलेले आहेत.

श्री.अमरसिंह पंडित : सदर सीसीटीव्ही कॅमरे सुरु आहेत.

सभापती : चव्हाण साहेब, हा प्रशासकीय प्रश्न आहे. सदर सीसीटीव्ही काढले नसल्यास ते काढून टाकावे.

श्री.अमरसिंह पंडित : सदर सीसीटीव्ही कॅमरे सुरु आहेत.

सचिव : रात्री सदर सीसीटीव्ही काढून घेण्याकरिता संबंधितांना पाठविले होते.

सभापती : ही बाब तपासून घ्यावी. ते काम झाले आहे किंवा नाही, ते बघावे.

सचिव : ठीक आहे.

सभागृहाच्या कामकाजासंबंधी

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, आजच्या कार्यक्रमपत्रिकेवर प्रथम प्रश्नोत्तराचा तास देखील अतिशय महत्त्वाचा आहे. सन्माननीय सदस्य 3 महिने अगोदर प्रश्न देत असतात. प्रश्नोत्तराच्या तासानंतर जवळपास 7-8 लक्षवेधी सूचना दर्शविलेल्या आहेत. आजच्या कार्यक्रमपत्रिकेत लक्षवेधी सूचना व शासकीय विधेयकानंतर शेवटी नियम 260 अन्वये दुष्काळावरील चर्चा दर्शविण्यात आली आहे. कार्यक्रमपत्रिकेवरील सर्व कामकाज महत्त्वाचे आहे. दुष्काळावर अर्धवट चर्चा आहे, दुष्काळाचा अतिशय महत्त्वाचा विषय आहे. त्यावर काही सन्माननीय सदस्य बोलणार आहेत. माझी आपल्याला विनंती आहे की, प्रश्नोत्तराचा तास संपल्यानंतर दुष्काळावरील चर्चेला सुरुवात करावी.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

सभापती : नियम 93 अन्वये सूचना व लक्षवेधी सूचना पुढे ढकलाव्यात, असे आपल्याला म्हणावयाचे आहे का ?

...2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.भाई जगताप : होय.

श्री.सुनिल तटकरे : सभापती महोदय, प्रश्नोत्तराच्या तासाच्या वेळी सदनात इतर चर्चा केल्यामुळे प्रश्नोत्तराचा वेळ वाया गेला आहे. माझी आपल्याला विनंती आहे की, प्रश्नोत्तराच्या तासाची वेळ 5 मिनिटे वाढवून द्यावी.

सभापती : ठीक आहे. या संदर्भात योग्य निर्णय घेऊ.

...3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी./मु.शी.: तोंडी उत्तरे.

राज्यात मुख्यमंत्री सहाय्यता निधीअंतर्गत जलयुक्त शिवार योजनेसाठी देण्यात आलेले धनादेश बनावट असल्याबाबतत

(1) * १४७५५ श्री.अनंत गाडगीळ, डॉ.सुधीर तांबे, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.अनिल भोसले, श्री.अमरसिंह पंडित, श्री.जयवंतराव जाधव, ॲड.अनिल परब, श्रीमती दिप्ती चवधरी, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.आनंद ठाकूर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.ख्वाजा बेग, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.राहुल नार्वेकरर सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राज्यात मुख्यमंत्री सहाय्यता निधी अंतर्गत जलयुक्त शिवार योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी अनेक व्यक्तींनी व संस्थांनी शासनाला देणगी स्वरुपात धनादेश दिले, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, त्यातील अनेक धनादेश बँकेत न वटल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, यामधील काही धनादेश संबंधित खात्यांमध्ये योग्य रक्कम नसल्याने वटले गेले नाहीत तर काही धनादेश वटवण्यापूर्वीच ते वटवले जाऊ नयेत असे बँकांना लेखी कळविण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(4) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने उक्त देणगीदारांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(5) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे : (१) होय, हे खरे आहे.

(2) होय, हे खरे आहे.

(3) होय, हे खरे आहे. जलयुक्त शिवार योजनेचे एकूण २८ धनादेश स्टेट बँक ऑफ इंडिया याच्याकडून परत आले आहेत.

(4) सदर देणगी स्वेच्छेने देण्यात आली असल्याने, कारवाईचा प्रश्न उद्‌भवत नाही. संबंधित देणगीदारांना धनादेश न वटण्याची कारणे कळविण्यात आली आहेत.

श्री.अनंत गाडगीळ : सभापती महोदय, या सरकारचा आणि विशेष करुन माननीय मुख्यमंत्र्यांना पेट प्रोजेक्ट, जो खरा आमचा प्रोजेक्ट होता. सदर जलशिवार योजनेत काही देणगीदारांनी काही देणग्या दिलेल्या आहेत. या संदर्भात जवळपास ३२ लोकांनी दिलेले धनादेश स्टेट बँकेत बाऊन्स झालेले आहेत. याचा अर्थ फसवणूक झाली आहे. काही लोकांनी देणगीचे धनादेश दिल्यानंतर ते वटविण्यास टाकण्यापूर्वी मागे घ्यावेत असे त्यांनी पत्र दिले. याचा अर्थ ही शुध्द फसवणूक आहे. माझा पहिला प्रश्न असा आहे की, शासन सदर बोगस देणगीदारांची नावे जाहीर करणार आहेत का व ही मंडळी कोणत्या जिल्ह्यातील आहेत ? माझ्याकडे असलेली नावे त्या अनुषंगाने ते भाजपाचे कार्यकर्ते आहेत, हे खरे आहे का ?

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, मी संबंधी सविस्तर उत्तर देणार आहे. परंतु केवळ प्रोसिजर म्हणून आपल्या लक्षात आणून देतो की, दिनांक १५ नोव्हेंबर, २००१ रोजी शासनाने एक जी.आर. काढला होता. त्या जी.आर.मध्ये मुख्यमंत्री सहाय्यता निधी हा मुंबई सार्वजनिक विश्वत व्यवस्था अधिनियम १९५० अन्वये सार्वजनिक न्यास म्हणून नोंदविण्यात आला असल्याने राज्याच्या एकत्रित निधीशी त्याचा कोणताही संबंध नसेल. राज्य विधानमंडळाच्या कक्षेत तो येणार नसल्याने विधानमंडळात त्याबाबत उपस्थित केलेल्या कोणत्याही प्रश्नास उत्तर देणे बंधनकारक असणार नाही. सभापती महोदय, मी यासंबंधी उत्तर देण्यास तयार आहे. परंतु ही बाब यासाठी लक्षात आणून दिली की, या प्रश्नाचे उत्तर पाठवित असताना ही बाब विधानमंडळ कार्यालयाच्या निदर्शनास आणून देण्यात आली होती की, आम्ही उत्तर देत असलो तरी अशा प्रकारचा जी.आर. आहे. तरी हा प्रश्न स्वीकारण्यात आला. या संदर्भात उत्तर देण्यास काही हरकत नाही. यात लपविण्यासारखे काही नाही. परंतु विधानमंडळाचे कायदे व नियम आहेत. आपण या संबंधी चौकशी केली पाहिजे. मी प्रश्नोत्तरामध्ये २-३ बाबी निर्दशनास आणून देणार आहे. या प्रश्नाला उत्तर देण्यास नकार द्यावयाचा आहे, असे नाही. परंतु नियम व परंपरा पाळल्या नाहीत तर ते योग्य होणार नाही. असे काही प्रश्न स्वीकारले जात आहेत की, ज्या प्रश्नांची सविस्तर उत्तरे मागील अधिवेशनात किंवा यापूर्वी मिळालेली आहेत. नियमानुसार असे प्रश्न स्वीकारता येत नाहीत. यात आपण लक्ष घालावे अशी माझी आपल्याला विनंती आहे. असे प्रश्न स्वीकारले जात आहेत.

सभापती : ठीक आहे.

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, जलयुक्त शिवार खात्यात एन.ई.एफ.टी., आर.टी.जी.एस. आणि धनादेश अशा ३ माध्यमातून पैसे आले आहेत. १०,३७३ धनादेशच्या माध्यमातून एकूण ९० कोटी रुपये मिळाले आहेत. १०,३७३ धनादेशांपैकी २८ धनादेश वटलेले नाहीत. न वटलेल्या २८ धनादेशांची एकूण रक्कम १० लाख ३६ हजार इतकी आहे. त्यापैकी ३ लोकांनी पुन्हा नव्याने धनादेश दिले आहेत. कारण त्यांच्या सह्या मॅच झाल्या नव्हत्या. त्या ३ धनादेशांची रक्कम जवळपास साडेपास लक्ष रुपये आहे. एकूण ९० कोटी रुपयांपैकी ४ लक्ष रुपयांचे धनादेश वटलेले नाहीत, याची विविध कारणे आहेत. त्यात अपुरा फंड, सही न जुळणे, काही धनादेशांमध्ये इन्स्ट्यूमेंट आऊट डेटेड आहेत म्हणजे जुन्या धनादेशांवर पैसे दिलेले आहेत. या सर्वांची नावे जाहीर करण्यास निश्चितपणे हरकत नाही. मी सदर नावे देण्यास तयार आहे. यात कोणीही भाजपचा कार्यकर्ता नाही. भाजपच्या एका कार्यकर्त्याच्या संदर्भात जी बातमी छापून आली होती. त्याची सही मॅच न झाल्यामुळे तो धनादेश

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.14755

श्री.देवेंद्र फडणवीस .....

परत गेला होता व त्यांचा दुसरा धनादेश आला व तो वटलेला आहे. ज्या लोकांनी या संदर्भात ९० कोटी रुपये दिले त्यांचे आपण अभिनंदन केले पाहिजे. जे धनादेश परत गेले, त्या सर्वांना नोटीसेस दिलेल्या आहेत की, तुमचे धनादेश परत गेलेले आहेत. त्यापैकी बहुतांश लोकांनी आम्हाला पुन्हा कळविले आहे की, काही तांत्रिक कारणांमुळे आमचे धनादेश परत गेलेले आहेत, यामुळे आम्ही पुन्हा नवीन धनादेश देऊ. त्या धनादेशांची किंमत ५ हजार रुपये, १० हजार रुपये अशी आहे. परंतु ती रक्कम महत्त्वाची आहे. या संदर्भात राज्य शासनाकडून पुढील कार्यवाही निश्चितपणे केली जाईल.

सभापती : माननीय मुख्यमंत्र्यांनी या संदर्भात तपशीलवार उत्तर दिलेले आहे.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, या संदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांनी तपशीलवार उत्तर दिले आहे. माझ्याकडे अशी माहिती आहे की, मुख्यमंत्री सहाय्यता निधीला डान्स बार असोसिएशनकडून ३० लाख रुपयांचा निधी आलेला आहे, ही बाब खरी आहे का ? असल्यास मुख्यमंत्री सहाय्यता निधीला डान्य बार असोसिएशनच्या निधीची गरज आहे का ?

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, डान्स बार असोसिएशनने कुठलाही निधी दिलेला नाही.

सभापती : ठीक आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

राज्य शासनाची विविध महामंडळे, देना बँकेतील व इतर राष्ट्रीयकृत बँकेतील मुदत ठेवींवरील रकमेचा अपहार झाल्याबाबत

(2) * १५२८७ श्रीमती शोभाताई फडणवीस, श्री.मितेश भांगडिया, डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, ॲड.अनिल परब, श्री.रामहरी रुपनवर, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.संदिप बाजोरिया, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.अनिल भोसले, श्री.विक्रम काळे, श्री.रामराव वडकुते, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.ख्वाजा बेग, श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, श्री.राहुल नार्वेकर, श्री.महादेव जानकर, श्री.गिरीशचंद्र व्यास, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.हरिसिंग राठोड, श्री.जयवंतराव जाधव, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सुनिल तटकरे, श्री.किरण पावसकर, श्री.सतिश चव्हाण, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.धनंजय मुंडे, श्री.प्रकाश बिनसाळे, श्रीमती स्मिता वाघ, श्री.अनिल सोले, श्री.नागो गाणार: सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राज्य शासनाची विविध महामंडळे आणि प्राधिकरणांच्या जवळपास ३५० कोटी रुपयांच्या देना बँकेतील व इतर राष्ट्रीयकृत बैंकेतील मुदत ठेवींवर बनावट पावत्या बनवून कोट्यवधी रुपयांचे कॅश क्रेडिट बिल्डरांसह उद्योगपतीं यांना देण्याचा प्रकारर दिनांक ११ जानेवारी, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय,

(2) राज्य शासनाच्या एमएमआरडीए, महिला आर्थिक विकास मंडळ, महात्मा फुले आर्थिक विकास महामंडळ, संत रोहिदास चर्मकार विकास महामंडळ (लिडकॉम) व पर्यटक विकास महामंडळासह किमान १० महामंडळाने आणि प्राधिकरणांने जवळपास ३५० कोटी रुपयांच्या ठेवीवर बनावट क्रेडिट देवून बँकेचे अधिकारी आणि दलालांच्या संगनमतातून महामंडळांची फसवणूक केल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(3) तसेच दिनांक १२ जानेवारी, २०१६ रोजी वा त्या सुमारास राज्यात शासनाच्या महामंडळाव्यतिरिक्त बड्या कंपन्या व संस्थांना मुदत ठेव (एफ.डी) गैरव्यवहारात किमान १००० कोटी रुपयांहून अधिक रकमेला फसविले असल्याचे उघडकीस येऊन यामध्ये काही दलाल, बँकांचे वित्तीय सल्लागार तसेच काही अधिकाऱ्यांना अटक करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(4) असल्यास, सदर गैरव्यवहार बँकेचे अधिकारी आणि दलालांच्या संगनमतातून झाल्याचेही निष्पन्न झाले आहे, हे खरे आहे काय,

(5) असल्यास, यामध्ये राज्य शासनाच्या कोणकोणत्या महामंडळांच्या किती रकमेच्या मुदत ठेवी (एफ.डी.) चा अपहार झाल्याची बाब निदर्शनास आली आहे, सदर महामंडळांचे अध्यक्ष, संचालक मंडळ व अधिकारी यामध्ये सामिल असल्याबाबतचा तपास पूर्ण झाला आहे काय,

(6) असल्यास,स याबाबत शासनाने चौकशी करूनन यास जबाबदार असणाऱ्या व्यक्तींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(7) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुधीर मुनगंटीवार : (१) व (२) हे अंशतः खरे आहे, जुलै, २०१४ मध्ये मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ यांनी देना बँकेत आणि संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ यांनी विजया बँक येथे गुंतविलेल्या मुदतीठेवीवरील एकूण रु. १४३.१५ कोटी इतक्या रक्कमेचा अपहार झाल्याचे निदर्शनास आले आहे.

तथापि, महिला आर्थिक विकास महामंडळाच्या निधीसंदर्भात कोणताही अपहार झाल्याचे आढळून आलेले नाही.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.15287....

श्री.सुधीर मुनगंटीवार .....

देना बँकेच्या कर्मचाऱ्यांविरुध्द सी.बी.आय.ने जून, २०१५ मध्ये विशेष न्यायाधीश, बृहन्मुंबई येथे आरोपपत्र दाखल केले असून सद्यःस्थितीत प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.विजया बँकेसंदर्भात आर्थिक गुन्हे शाखा, मुंबई यांचेमार्फत तपास सुरु आहे.

(3) व (४) होय हे अंशतः खरे आहे, सदर गुन्हयामध्ये एजंन्ट, लाभार्थी आणि संबंधीत बँक अधिकाऱ्यांना अटक करण्यात आलेली आहे. सदर गुन्हयाबाबत तपास सुरु आहे.

(5) व (६)

अ.क्र.	सार्वजनिक उपक्रमाचे नाव	मुदत ठेवीवरील अपहार झालेली रक्कम
१.	मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,	रु. ४५.२३ कोटी
२.	महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ,	रु. ६४.०९ कोटी
३.	महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ,	रु. २५.७३ कोटी
४.	संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ	रु. ८.१० कोटी
	एकूण	**रु. १४३.१५ कोटी**

वर नमूद केल्याप्रमाणे राज्य सार्वजनिक उपक्रमांनी गुंतविलेल्या मुदतीठेवीवरील एकूण रु. १४३.१५ कोटी इतक्या रक्कमेचा उपहार झाल्याचे निदर्शनास आले आहे.

सदर गुन्हयामध्ये एजंन्ट, लाभार्थी आणि संबंधीत बँक अधिकाऱ्यांना अटक करण्यात आलेली असून त्यांचेविरुध्द विशेष न्यायाधीश बृन्हमुंबई येथे आरोप पत्र दाखल केले आहे. तसेच यासंदर्भात सी.बी.आय. व आर्थिक गुन्हे शाखा, मुंबई यांचेमार्फत तपास सुरु आहे.

(7) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, महाराष्ट्र विकास प्राधिकरण तसेच संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ यांनी बँकेत एफडीमध्ये पैसे जमा केले आहेत.

यानंतर B-१.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.15287....

श्रीमती शोभा फडणवीस.....

वास्तविक पाहता महामंडळाकडे पैसे नाहीत म्हणून अर्जदारांची प्रकरणे निकाली काढली जात नाहीत. महामंडळाने बँकेत पैसे ठेवायचे आणि अर्जदारांची प्रकरणे निकाली काढायची नाहीत. बँकेत ठेवण्यासाठी या महामंडळांना पैसे दिले जात नाहीत. 14 महामंडळे आणि आयुर्वेदिक प्रचार संस्था यांनी आतापर्यंत एफ.डी.मध्ये किती पैसे ठेवले, किती रक्कमेचा अपहार झाला, तो कशा पध्दतीने झाला याची माहिती दिली जाईल काय? महामंडळांनी एफ.डी.मध्ये ठेवलेले पैसे काढण्याचा अधिकार त्यांना नसताना पैसे कसे काढले जातात, ते एफ.डी.वरील व्याजाचे काय करतात, ती रक्कम कशा पध्दतीने खर्च केली जाते याची माहिती देण्यात यावी. यापुढे एफ.डी.मध्ये पैसे न ठेवता या महामंडळांचा निधी शासन स्वत:च्या ट्रेझरीमध्ये ठेवणार आहे का?

श्री.सुधीर मुनगंटीवार : सभापती महोदय, हे खरे आहे की, जून, 2013 ते 2014 च्या दरम्यान अशा पध्दतीने अपहार करण्यात आला. नगरविकास विभागाच्या अंतर्गत असलेल्या एमएमआरडीएचे 45.23 कोटी रुपये, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे 64.09 कोटी रुपये, महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाचे 25.73 कोटी रुपये, संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळाचे 8.10 कोटी रुपये मुदत ठेवीमध्ये ठेवण्यात आल्याच्या प्रकरणी सीबीआय चौकशी करीत आहे. सीबीआयने या संदर्भात विशेष न्यायाधीश, बृहन्मुंबई यांच्याकडे प्रकरण चार्जशीटसह न्यायप्रविष्ठ केले आहे.

सभापती महोदय, संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळाबाबत पोलीस निरीक्षक, आर्थिक गुन्हे शाखा, माता रमाबाई आंबेडकर पोलीस ठाणे यांनी दिनांक 7 ऑगस्ट, 2014 रोजी एफआयआर दाखल केला आहे. आरोपी श्री.अनिल पवार व मोहम्मद फसीउद्दीन हे दिनांक 3 जून, 2014 पासून अटकेत आहेत. हे खाजगी व बदमाष प्रवृत्तीचे लोक आहेत. साधारणत: यांची काम करण्याची पध्दत अशी होती की, एमएमआरडीए या संस्थेमध्ये सूट बूट घालून बँकेचे प्रतिनिधी म्हणून जायचे आणि त्यांना सांगायचे की, तुम्ही एफडीआर काढला तर तुम्हाला अर्धा ते एक टक्का अधिक व्याज देऊ. एमएमआरडीएच्या अधिकाऱ्यांना वाटायचे की, पैसे देना बँकेला आरटीजीएसने द्यायचे आहेत आणि प्राधिकरणाला जास्त व्याज मिळणार आहे. हेच

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुधीर मुनगंटीवार..... ता.प्र.क्र.15287...

लोक बँकेत एमएमआरडीएचे प्रतिनिधी म्हणून जायचे तेव्हा बँकेच्या मॅनेजरला वाटायचे की, बँकेला डिपॉझिट मिळत आहे. त्या अनुषंगाने बँकेकडून डिपॉझिट स्लीप दिली जायची. ओरिजिनल स्लीप स्वत:कडे ठेवून डुप्लीकेट कॉपीवर खोटी सही व खोटा शिक्का मारुन ते एमएमआरडीएला द्यायचे. बँकेत ओ.डी.अकाऊंट काढायचे आणि त्या अकाऊंटमध्ये बँकेच्या इलेक्ट्रॉनिक ट्रान्सफरने पैसे पाठविले जायचे. त्यातून पुन्हा नवीन अकाऊंट उघडून आरटीजीएसने त्यात पैसे पाठवायचे.

सभापती महोदय, पोलिसांनी एका आरोपीला अटक केल्यानंतर त्याच्या बँक खात्याची छाननी केल्यानंतर हे प्रकरण लक्षात आले. या संदर्भात इंडियन एक्स्प्रेस व डीएनए या दोन वृत्तपत्रांमध्ये 10 जुलै, 2014 रोजी बातमी छापून आली. प्रत्यक्ष वित्त विभागाकडे हा प्रश्न का आला हे मला माहित नाही. वित्त विभागाशी याचा काही संबंध नाही. ही महामंडळे स्वतंत्र असून ती त्या त्या विभागांच्या अखत्यारित येतात. प्रश्न विधानमंडळाकडून वित्त विभागाकडे का आला हे आपण चांगल्या पध्दतीने सांगू शकाल. वृत्तपत्रातील बातमी वाचल्यानंतर वित्त विभागाकडून सू-मोटो पत्र पाठवून या प्रकरणाचा पाठपुरावा सुरु केला. अशा पध्दतीने व्यवहार का झाले याची तपासणी सुरु केली.

सभापती महोदय, माननीय सदस्यांनी म्हटल्याप्रमाणे हे खरे आहे की, प्रत्येक महामंडळाकडून स्वत:चा निधी बँकेमध्ये डिपॉझिट ठेवला जातो. वित्त विभागाकडे ती सर्व डिपॉझिट जमा व्हावी याबद्दल माननीय सदस्यांची समिती नेमावी व अभ्यास करुन अहवाल द्यावा, त्याबाबत शासनाचे दुमत असण्याचे कारण नाही. साधारणत: या 4 महामंडळाची डिपॉझिट रक्कम 18 हजार कोटी रुपयांची आहे. अपहार झालेली रक्कम 143 कोटी रुपये आहे. त्यापैकी 57 कोटी रुपये आपल्याला परत मिळू शकतात. कारण ती रक्कम बँक खात्यात जमा आहे. इतर निधीबाबत सीबीआय आणि आरबीआयकडे आपण पाठपुरावा करीत आहोत. देना बँक ही राष्ट्रीयकृत बँक असल्यामुळे या संदर्भात सीबीआयने चौकशी केल्यानंतर आपल्याला केंद्र सरकारने हे पैसे परत केले पाहिजेत हा आपला प्रयत्न आहे. सध्या सीबीआय चौकशी करीत असून प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. सरकार याबाबत गंभीर आहे. अशा पध्दतीचा अपहार होऊ नये म्हणून आम्ही

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

गाईडलाईन तयार केली आहे. ती गाईडलाईन आपल्याला हवी असेल तर पटलावर ठेवतो. गाईडलाईन मोठी आहे. आम्ही ती गाईडलाईन पटलावर ठेवू. अशा प्रकारची घटना पुन्हा होऊ नये. ही एक टोळी आहे. त्यांनी इलेक्ट्रॉनिक ट्रान्सफर असूनही अशा प्रकारचा व्यवहार केला. भविष्यात असे काही होऊ नये यासाठी सरकार काळजी घेत आहे. प्रकरण न्यायप्रविष्ठ असून आरोपी अटकेत आहेत.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, या प्रकरणाची यापूर्वी या सभागृहात चर्चा झाली आहे. त्यामुळेच वित्त विभागाने हे आदेश काढले आहेत. माथाडी कामगार मंडळाचे पैसे बँकेत ठेवले जातात. अशा प्रकारच्या मंडळांच्या अधिकाऱ्यांकडे मंत्री महोदय दुर्लक्ष करतात. शासनाचे पैसे बँकेत डिपॉझिट ठेवण्यासाठी एजन्टची आवश्यकता केव्हापासून भासू लागली? मंत्री महोदयांनी सांगितले की, हे एजन्ट अर्धा ते एक टक्का जास्त व्याज देऊ असे सांगून डिपॉझिट मिळवित असतात. सभापती महोदय, मी स्वत: रायगड जिल्हा मध्यवर्ती बँक चालवितो. बँकेत डिपॉझिट ठेवण्यासाठी आम्हाला बँकेकडून ऑफर दिली जाते. अशा वेळी आम्हाला अंडर टेबल अर्धा टक्का व्याज देण्याचे आमिष दाखविले जाते. या गुन्हयामध्ये जे दोषी आहेत त्याची चौकशी सीबीआयने केली पाहिजे. एमएमआरडीए हे प्राधिकरण माननीय मुख्यमंत्र्यांकडील नगरविकास विभागाच्या अधिपत्याखाली येते. त्या प्राधिकरणाचे करोडो रुपये ज्या अधिकाऱ्यांनी बोगस एजन्टकडे सुपूर्द केले, बोगस एजन्टच्या हाती रक्कम देऊन रिसिप्ट घेतली असेल तर त्या अधिकाऱ्यांची सीबीआयमार्फत चौकशी करणार आहात काय?

श्री.सुधीर मुनगंटीवार : सीबीआयने चौकशी करुनच 2014 मध्ये हा अहवाल दिला आहे. त्या अहवालात या अधिकाऱ्यांचा हेतू वाईट नव्हता, त्यांची स्वत:ची फसवणूक झाली असे आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, माननीय मंत्री हे ज्येष्ठ व अभ्यासू आहेत. त्यांनी अशा प्रकारे उत्तर देणे संयुक्तिक वाटत नाही.

श्री.सुधीर मुनगंटीवार : सभापती महोदय, 2014 मध्ये सीबीआयने या प्रकरणाची चौकशी केली. सीबीआयने काय अभिप्राय द्यावेत हे मी ठरवू शकत नाही. मी सुरुवातीलाच सभागृहाला सांगितले आहे की, सरकारची या संदर्भात भूमिका स्पष्ट आहे. महामंडळाचे पैसे एफडीआरमध्ये

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुधीर मुनगंटीवार..... ता.प्र.क्र.15287...

ठेवावयाची इतक्या वर्षाची परंपरागत पध्दत आहे. ही पध्दत बंद करून हा सर्व पैसा सरकारकडे जमा करावा ही माझी वैयक्तिक भूमिका आहे. याबाबत वित्त विभाग अधिक अभ्यास करीत आहे. या संदर्भात समिती नेमावी. हे पैसे डिपॉझिटमध्ये का ठेवले जातात, 15-15 वर्षापासून त्यांनी एफडीआर का करावा? या संदर्भात सीबीआयने चौकशी केली असून प्रकरण विशेष न्यायाधीश, बृहन्मुंबई यांच्याकडे दिले आहे. त्यांनी सांगितले की, या अधिकाऱ्यांचा हेतू, त्यांचे बँक अकाऊंट आम्ही तपासले आहे.

नंतर सी.1...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.15287....

श्री.सुधीर मुनगंटीवार....

त्यांच्या संदर्भात जे काही तपासायचे होते ते आम्ही तपासले आहे. यामध्ये यांची फसवणूक झाली. एजंट बँकेचे प्रतिनिधी बनून सूटबूट घालून गेले. तेव्हा यांना वाटले की, एक टक्का व्याज आपल्याला जास्त मिळते आहे. हे प्रकरण आता न्यायप्रविष्ट आहे. तरीही सन्माननीय सदस्यांची शंका असेल व यासंबंधी अजून चौकशी करावी असे वाटत असेल तर माननीय सभापती महोदयांनी तसे निदेश द्यावेत. सन 2013-14 मध्ये झालेल्या घटनेसंबंधात माननीय सभापती महोदय सांगतील त्याप्रमाणे चौकशी करायला सरकारची कुठेही ना नाही.

सभापती : सर्वांच्या संमतीने मी माझा निदेश नंतर देतो.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, हे अतिशय गंभीर असे प्रकरण आहे. त्याची सीबीआयने चौकशी केली आहे हे खरे आहे. त्यानंतरच सर्व गुन्हे दाखल झाले आहेत हे ही खरे आहे. आपण नेहमी इलेक्ट्रॉनीक प्रणालीचा उद्घोष करतो. मंत्री महोदय उत्तर देताना म्हणाले की, सूटबूटवाले आहेत. सूटबुटामध्ये कोणीही गेले तरी ते असे करू शकतात काय ? आज सगळीकडे सूटबूटवाल्यांचेच सरकार आहे. .....(अडथळा).....ही जी महामंडळे आहेत त्यांच्या पैशाचा चुकीच्या पद्धतीने वापर केला जात आहे हा प्रश्न आहे. अशी अनेक महामंडळे असून आपल्यासमोर अनेक उदाहरणे आहेत. त्याची पुन्हा उजळणी नको. लेखी उत्तरामध्ये असे नमूद केले आहे की, हे अंशत: खरे आहे. सदर गुन्ह्यांमध्ये एजंट, लाभार्थी आणि संबंधित बँक अधिकाऱ्यांना अटक करण्यात आलेली आहे. ते खरे आहे. महामंडळाचा पैसा ज्यांनी कोणी बुडविला आहे, जे कोण यास जबाबदार असतील त्यांचा उल्लेख यात कुठेही नाही. यात अधिकाऱ्यांना जबाबदार पकडावे लागेलच. पण त्याच बरोबर जो कोणी असेल..... आपण सांगितले की, 18 हजार कोटी रुपयांचे डिपॉझिट त्यांच्याकडे आहे. एवढ्या मोठ्या निधीचा गैरफायदा घेण्यात येत असेल तर त्या सर्व अधिकाऱ्यांवर व महामंडळाच्या पदाधिकाऱ्यांवर शासन कारवाई करणार आहे काय ?

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

सभापती : मला या विषयाची थोडीफार माहिती आहे. This default is corruption. हे बँक लेव्हला आहे की, महमंडळ लेव्हलला आहे की, एकत्रितपणे केले आहे हा सर्वात महत्वाचा मुद्दा आहे. यात फक्त महामंडळे नाहीत. माझ्याकडे एक माहिती अशी आहे की, वाशीच्या मोठ्या मार्केटमध्ये देखील असाच प्रकार झालेला आहे. त्यामुळे हे अत्यंत गांभीर्याने घेणे आवश्यक आहे. एवढा विषय आहे. आपण काय उचित कारवाई करायची आहे ती करावी.

श्री.सुधीर मुनगंटीवार : सभापती महोदय, आपण म्हणता ते बरोबर आहे. मुंबई कृषि उत्पन्न बाजार समितीमध्ये असा प्रकार झालेला असून असे काही प्रकार काही खाजगी संस्थेमध्ये घडलेले आहेत. या घटना सन 2013 मध्ये झाल्या. तेव्हा सीबीआयने चौकशी करून त्यात यांचा दोष नाही असे सांगितले. सन 2013 मधील घटनांसंबंधात आपल्याला वाटत असेल तर चौकशी करण्यास सरकार तयार आहे. या सर्व प्रकरणाची सीबीआयने ऑलरेडी चौकशी केलेली आहे. सीबीआयच्या चार्जशिटमध्ये बँक मॅनेजरची नावे होती. त्यांना चौकशीअंती न्यायालयाने जामीन दिलेला आहे. आता सात लोक राहिली असून त्यांना कोर्टाने जामीन दिलेला नाही.

सभापती : ही महामंडळे राज्याची आहेत.

श्री.सुधीर मुनगंटीवार : सभापती महोदय, सीबीआय, गुन्हे अन्वेषण या दोन यंत्रणांनी चौकशी केल्यानंतर त्या चौकशीच्या तथ्यावर आपण येथे चर्चा करीत आहोत. खरे म्हणजे आपल्याला सीबीआय आणि गुन्हे अन्वेषण या दोन संस्थांवर विश्वास ठेवणे गरजेचे आहे. आपा या दोन संस्थांनी काढलेलया निष्कर्षावर प्रश्न चिन्ह निर्माण करीत आहात. यापेक्षा अजून कोणतीही मोठी संस्था सध्या तरी नाही असे मला वाटते. 2014 मध्ये हाच विचार करून मागील सरकारने सीबीआयकडे हे प्रकरण दिले होते. तत्कालीन सरकारने अतिशय अभ्यास करून हे प्रकरण सीबीआयकडे दिले आहे. सीबीआयने निष्कर्ष काढल्यानंतर आता पुन्हा आपण सीबीआयच्या निष्कर्षावर विधिमंडळामध्ये चर्चा करीत आहोत. सीबीआयच्या वर अजून कोणतीही न्याय आणि चौकशी व्यवस्था असेल तर त्यांच्यासमोर चौकशीसाठी जाऊ शकतो किंवा आपण निदेश दिले तर माननीय सदस्यांची समिती ही सीबीआयच्या निष्कर्षापेक्षाही अजून काही उत्तम निष्कर्ष काढू शकत असेल तर त्यासंदर्भात समिती घटित करायला सरकारची कोणतीही ना नाही. ..3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी सविस्तर उत्तर दिलेले आहे. येथे सीबीआयच्या निष्कर्षावर कोणीही शंकाच उपस्थित केलेली नाही. यात मूलभूत मुद्दा असा येतो की, महामंडळाचा, एमएमआरडीएचा निधी एका विशिष्ट बँकेत डिपॉझिट म्हणून ठेवण्यासाठी कोणाच्या स्तरावर निर्णय घेतले जातात. हा सर्वात महत्त्वाचा मुद्दा आहे. एंजटच्या मार्फत राष्ट्रीयकृत किंवा अन्य कुठल्याही बँकेत मोठ्या रकमा डिपॉझिट म्हणून ठेवण्याचा निर्णय कोणाच्या स्तरावर घेतला जातो ? शेवटी त्यात जबाबदारी येते किंवा नाही ? एमएमआरडीए, चर्मोद्योग महामंडळासह इतर महामंडळे असतील या महामंडळांवर वरिष्ठ आयएएस अधिकारी काम करीत असतात. त्यात कॅफोसारखे तत्सम अधिकारी देखील असतात. अशा वेळी राष्ट्रीयकृत बँकेत मोठ्या प्रमाणावर रकमा ठेवत असताना एजंटांमार्फत ठेवण्याची पद्धत का आलेली आहे ? राष्ट्रीयकृत बँक आणि महामंडळे यांच्यामध्ये थेटपणाने व्यवहार होऊ शकतो. तेव्हा विशिष्ट बँकेमध्ये, विशिष्ट खाते उघडून डिपॉझिट ठेवण्यात यावे हा निर्णय कोणाच्या स्तरावरून झालेला आहे ?

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, यास जबाबदार कोण आहे एवढेच विचारण्यात आले आहे ?

श्री.सुधीर मुनगंटीवार : सभापती महोदय, याला जबाबदार कोण म्हणजे मागचे सरकार आहे. तेव्हा त्यांनी निर्णय घेतला नव्हता. या सरकारचे त्याचे निकष तयार केले. याला जबाबदार कोण आहे हे मी सांगत आहे.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप असे म्हणाले की, याला जबाबदार कोण आहे ? आपण लगेच सरकार म्हणून म्हणाला. मघाशी तर आपण असे म्हणालात की, मागच्या सरकारने अभ्यासपूर्वक विचार करून हे प्रकण सीबीआयकडे सोपविले. रूल्स ऑफ बिझिनेसमध्ये सरकार म्हणजे मुख्यमंत्री, मंत्री असा उल्लेख आहे. म्हणून माझे असे म्हणणे आहे की, कोणाच्या स्तरावर असे निर्णय घेतले गेले आहेत ती माहिती येणे अत्यंत आवश्यक आहे?

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुधीर मुनगंटीवार : सभापती महोदय, साधारणतः त्या संस्थेच्या स्तरावरच ते निर्णय होतात. मी पहिल्या प्रश्नाचे उत्तर देताना सांगितले की, वित्त विभागाने आता काही गाईड लाईन्स दिलेल्या आहेत. त्या पटलावर ठेवतो असे मी म्हणालो आहे. कारण त्या गाईड लाईन्स खूप आहेत. यासंदर्भात आपण समिती नियुक्ती करावी अशी माझी भावना आहे. विविध महामंडळांनी पैसे डिपॉझिट करण्याची पद्धत अनेक वर्षांपासून सुरू आहे. त्यासंबंधी आपण एक समिती नेमावी. त्या समितीला आपण निदेश दिले तर त्यास मान्यता देण्यात येईल. महामंडळांनी त्यांच्याकडील रक्कम बँकेत डिपॉझिट करायची की शसनाच्या ट्रेझरीमध्ये जमा करायची याचा अभ्यास त्या समितीने नक्की केला पाहिजे.

सभापती : ठीक आहे. समिती नेमण्यात येत आहे.

श्री.सुभाष झांबड : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी उत्तर देताना सांगितले की, सूटबूटमधील एजंट अधिकाऱ्यांकडे गेले. अर्धा ते एक टक्का जास्त व्याज देण्याच्या लालसेने ते डिपॉझिट बँकेमध्ये वर्ग झाले. माझा प्रश्न हा आहे की, महामंडळाच्या माध्यमातून डिपॉझिट वर्ग होते तेव्हा डिपॉझिट फॉर्मवर सह्या करण्याचा अधिकार महामंडळाच्या कोणत्या अधिकाऱ्यांना होता. आपण सांगितले की, डिपॉझिटच्या पावत्या एजंटानी घेऊन मूळ पावतीची डयुप्लीकेट पावती करून महामंडळाला सादर केली. इतक्या मोठ्या प्रमाणात बँत डिपॉझिट जमा होते तर महामंडळाचे अधिकारी ए.सी.मध्ये बसून आरटीजीएसच्या माध्यमातून फक्त पैसा ट्रान्सफर करतात. बँकेतील डिपॉझिट फॉर्मवर सही करण्याची गरज नाही असे सांगतात.

यानंतर श्री.अजित....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.15287....

श्री.सुभाष झांबड...

या प्रकरणाची सी.बी.आय. चौकशी झाली असली तरी इतक्या मोठ्या रकमेचे डिपॉझीट ट्रान्सफर करताना महामंडळाच्या अधिकाऱ्यांनी बँकेतील अधिकाऱ्यांच्या संपर्कात राहून फॉर्मलिटीज पूर्ण केल्या होत्या काय ?

श्री.सुधीर मुनगंटीवार : सभापती महोदय, मी या प्रश्नाचे उत्तर अगोदरच दिलेले आहे. आरटीईजीएस केल्यास एक किंवा अर्धा टक्का जास्त व्याज मिळू शकते म्हणून बँकेमधून आरटीईजीएस करायचे आणि आरटीईजीएसपेक्षा सुरक्षित पद्धत नव्हती. महामंडळाचे प्रतिनिधी आहोत असे सांगून एजंट रिसीट घेऊन जाताना गडबड करायचे. अशा घटना होऊ नयेत म्हणून आपण त्या संदर्भात काही गाईडलाईन्स इश्यू केलेल्या आहेत. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाला सरकारमार्फत विनंती केलेली आहे. त्या संदर्भातील पत्रव्यवहार आपल्याकडे आहे. वित्तीय सुधारणेच्या संदर्भात दिनांक 14 जुलै, 2014 रोजीचा जी.आर आहे. दिनांक 22 जुलै, 2014 रोजीचा एमपीएससीचा अहवाल आहे. दिनांक 24 जुलै, 2014 रोजी दक्षता घेण्यासंदर्भातील परिपत्रक आहे. तसेच केंद्र शासनाने दिनांक 9.12.2014 रोजी सूचना दिलेल्या आहेत.

श्री.अनिल भोसले : सभापती महोदय, महामंडळाच्या ठेवी ठेवल्या त्या संदर्भात सीबीआय चौकशी सुरु आहे. या ठिकाणी माननीय मुख्यमंत्री आणि माननीय सहकार मंत्री उपस्थित आहेत.. अशाप्रकारच्या ठेवी ठेवण्यासंदर्भात रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे काही गाईडलाईन्स आहेत. काही रक्कम जिल्हा बँकेत ठेवण्यात यावी. काही रक्कम सहकारी बँकेत आणि काही रक्कम राष्ट्रीयकृत बँकेत ठेवण्यात यावी. अशाप्रकारची नियमावली मार्च अखेरपर्यंत करण्यात येईल काय ?

श्री.सुधीर मुनगंटीवार : सभापती महोदय, जिल्हा बँकेची अपहराची प्रकरणे खूप आली...

श्री.अनिल भोसले : सभापती महोदय, आमच्या महानगरपालिकेत आम्ही अशी नियमावली तयार केली आहे की, एका ठराविक बँकेत दोन टक्के रक्कम ठेवावी. दुसऱ्या बँकेत तीन टक्के रक्कम ठेवावी. आपण अशा पद्धतीची नियमावली तयार करणार आहात काय ?

श्री.मुनगंटीवार : सभापती महोदय, अशाप्रकारची कोणतीही नियमावली नाही. राष्ट्रीयकृत बँकेत, जेथे रक्कम सुरक्षित राहील अशा बँकेत पैसे ठेवावेत अशी नियमावली आहे. पण या ठिकाणी राष्ट्रीयकृत बँकेत पैसे ठेवले होते. तरीसुद्धा अशाप्रकारची घटना घडली.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

11-03-2016 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) D-2

AJIT/ KTG/ AKN/ पूर्वी श्री.भारवि... 12:30

ता.प्र.क्र.15287....

सभापती : मला असे वाटते की, आपण या संदर्भात कमिटी नेमण्याचे ठरलेले आहे. तेव्हा सन्माननीय सदस्यांना ज्या काही सूचना असतील त्या समितीकडे द्याव्यात. माझे असे म्हणणे आहे, त्या समितीने फक्त महामंडळापुरता विचार करु नये तर सहकारासंबंधी असे जे काही विषय असतील त्याबाबत देखील विचार करावा.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, या ठिकाणी सांगण्यात आले की, ते एजंट म्हणून जात होते, रिसीट घेत होते आणि ओरिजीनल रिसीट स्वतःजवळ ठेवत होते. इथपर्यंत आपण खरे मानले तरी ओव्हर ड्राफ्ट महामंडळाचा होता. महामंडळाच्या नावावर ओव्हरड्राफ्ट काढला जातो, हे महामंडळाला कसे समजले नाही ? कारण ओव्हरड्राफ्ट काढताना तो किती रकमेचा पाहिजे हे विचारले जाते आणि हे सर्व लेखी लिहून घेतले जाते. महामंडळ स्वतःच्या अंगावरचे घोंगडे दुसऱ्याच्या अंगावर टाकून गुंडाना बदनाम करीत आहे. माझा प्रश्न आहे की, या प्रकरणी महामंडळाची चौकशी करुन संबंधितांवर कारवाई करण्यात येईल काय ?

श्री.सुधीर मुनगंटीवार : सभापती महोदय, सरकारचे गुंडाना बदनाम करण्याचे धोरण नाही. सीबीआच्या चौकशीत गुंड आढळले. यामध्ये पद्धत अशी होती की, बँकेत जाऊन सांगायचे आम्ही महामंडळाकडून आलो आणि महामंडळाकडे जाऊन सांगायचे आम्ही बँकेतून आलो. खोटे शिक्के, खोट्या सह्या करुन नवीन अकाऊन्ट ओपन करुन ओव्हर ड्राफ्ट काढला जायचा. हा सर्व अपहार आरटीईजीएसच्या माध्यमातून करण्यात आलेला आहे. या ठिकाणी रोख रक्कम काढण्यात आलेली नाही. ओव्हरड्राफ्ट मात्र स्वतःच्या अकाऊंटवर जमा करायचा अशी पद्धत होती. हा सर्व प्रकार तत्कालीन सरकारच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी या प्रकरणी सीबीआय चौकशी नेमली. सीबीआयने या प्रकरणाचा अतिशय बारकाईने अभ्यास केला. आता ही बाब न्यायप्रविष्ट आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

राज्यात शिक्षकांच्या आंतरजिल्हा बदलीचे प्रस्ताव प्रलंबित असल्याबाबत

(3) * १५१७९ श्री.अनिल सोले, श्री.मितेश भांगडिया, श्री.नागो गाणार, श्री.रामनाथ मोते, डॉ.अपूर्व हिरे : तारांकित प्रश्न क्रमांक ११९८१ ला दिनांक १७ डिसेंबर, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:

सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पती-पत्नी एकत्रिकरण करण्यासाठी व त्यांचे कौटुंबिक जीवन सुखद होण्यासाठी शासनाने पती-पत्नी एकत्रिकरण योजना आखून आंतरजिल्हा बदली धोरण मंजूर केले आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, लग्नानंतर किंवा लग्नापूर्वी वेगवेगळ्या जिल्ह्यात तसेच आदिवासी जिल्ह्यांमध्ये कार्यरत शिक्षकांनी आंतरजिल्हा बदलीसाठी विहित नमुन्यात अर्ज केल्यानंतरही वर्षानुवर्ष (५ ते १० वर्ष) पर्यंत त्यांना आंतरजिल्हा बदली देण्यात येत नाही, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, आंतरजिल्हा बदली न मिळाल्यामुळे अशा शिक्षकांचे कौटुंबिक जीवन दु:खमय होऊन अनेक समस्या निर्माण होतात, हे खरे आहे काय,

(4)4 तसेच शिक्षक (आंतरजिल्हा बदली) सहकार कृती समिती, महाराष्ट्र राज्य या संघटनेतर्फे बदलीग्रस्त शिक्षकांच्या मागण्या मांडण्यात आल्या, हे खरे आहे काय,

(5) तसेच पती-पत्नी एकत्रिकरणाच्या धोरणानुसार जिल्हा परिषदेतील शिक्षकांचे आंतरजिल्हा बदलीसंबंधिचे प्रलंबित प्रस्तावाबाबत शासनस्तरावरून माहिती संकलित करण्याची सुरु असलेली कार्यवाही पुर्ण झाली आहे, हे खरे आहे काय,

(6) असल्यास, पती-पत्नी एकत्रिकरणाचे एकूण प्रलंबित प्रस्तावांची संख्या किती आहे व यापैकी किती प्रस्तावांना मंजुरी देण्यांत आली आहे,

(7) असल्यास, वरील प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(8) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.दीपक केसरकर,श्रीमती पंकजा मुंडे यांच्याकरिता : (१) होय.

(2) व (३) आंतरजिल्हा बदली ही विनंती बदली असून ती दोन जिल्हा परिषदांमधील कार्यवाहीची बाब आहे. राज्य शासनाच्या धोरणानुसार पती पत्नी एकत्रिकरणासाठी संबंधित जिल्हापरिषदेमध्ये ३ वर्षाचा कार्यकाल पूर्ण केल्यानंतर आंतरजिल्हा बदलीस पात्र होतात. तद्नंतर अशा बदलीचे प्रस्ताव तपासताना संबंधित जिल्ह्यातील शाळांची संख्या, या शाळांमधील विद्यार्थी संख्या, सदर शाळांमध्ये संबंधित शिक्षकांच्या नियुक्ती प्रवर्गाचे पद उपलब्ध असणे, प्राधान्यक्रम, संबंधित जिल्हा परिषदेची प्रतिक्षायादी या बाबी विचारात घ्याव्या लागतात.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.15179...

श्री.दीपक केसरकर....

(5) व (६) होय, पती पत्नी एकत्रिकरणातंर्गत सकृतदर्शनी एकूण ४५०९ प्रस्ताव प्रलंबित आहेत. मात्र या बदली प्रस्तावास शासनातर्फे मंजुरी देण्यात येत नाही, तो निर्णय जिल्हापरिषद स्तरावर आपआपसातील सहसमतीने घेतला जातो.

(7) व (८) शिक्षकांच्या बदल्या संदर्भात शालेय शिक्षण विभागाकडून धोरणात्मक निर्णय घेण्यात येत असून त्यानुसार संगणक प्रणाली विकसित करण्याची बाब त्या विभागाच्या विचाराधीन आहे.

प्रा.अनिल सोले : सभापती महोदय, लेखी उत्तरामध्ये नमूद केले आहे की, पती-पत्नी एकत्रिकरणांतर्गत सकृतदर्शनी एकूण 4 हजार 509 प्रस्ताव प्रलंबित आहेत. मागील हिवाळी अधिवेशनात माननीय ग्राम विकास मंत्र्यांनी उत्तर देताना सांगितले होते की, अशी एकूण 4500 प्रकरणे आहेत. आजच्या उत्तरामध्ये 4 हजार 509 प्रकरणे आहेत असे म्हटलेले आहे. मागील अधिवेशनात हा प्रश्न उपस्थित झाला होता त्यावेळी समान रोष्टर असावे अशी सूचना सन्माननीय सदस्यांनी केली होती. कारण यामध्ये खूप गुंतागुंत असल्यामुळे पती-पत्नी एकत्रिकरणाचा लाभ शिक्षकांना होताना दिसत नाही. त्यामुळे शिक्षकांमध्ये अत्यंत असंतोष आहे. माझा प्रश्न आहे की, शासन ही प्रलंबित प्रकरणे किती दिवसांत निकाली काढणार आहे ? लेखी उत्तरामध्ये असे नमूद केले आहे की, शिक्षकांच्या बदल्या संदर्भात शालेय शिक्षण विभागाकडून धोरणात्मक निर्णय घेण्यात येत असून त्यानुसार संगणक प्रणाली विकसित करण्याची बाब त्या विभागाच्या विचाराधीन आहे. शिक्षण विभागाचा याच्याशी काही संबंध नाही. जोपर्यंत जिल्हापरिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी शिक्षकांना रिलिव्ह करीत नाही तोपर्यंत त्यांची बदली होत नाही. शिक्षण विभाग फक्त शिक्षकांच्या पगाराची व्यवस्था पाहते. माझा प्रश्न आहे की, पती-पत्नी एकत्रिकरणाच्या आणि आंतर जिल्हा शिक्षकांच्या बदल्यास केव्हा सुरुवात करण्यात येईल ?

श्री.दीपक केसरकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारलेला आहे की, 4 हजार 509 प्रलंबित प्रकरणाची यादी केव्हा पूर्ण करण्यात येईल. त्याबाबत मी सांगू इच्छितो की, प्रत्येक जिल्ह्यामध्ये उपलब्ध असलेल्या पदांच्या संख्येनुसार बिंदू नामावली असते. त्यामुळे अशी प्रकरणे लवकर क्लिअर होत नाहीत. या संदर्भात सरकार नवीन धोरण आखण्याच्या विचारात आहे

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

आणि ते धोरण जवळपास पूर्णत्वाकडे आलेले आहे. शिक्षकांनी तिसऱ्या जिल्ह्याचा चॉईस दिला तरी

ता.प्र.क्र.15179...

श्री.दीपक केसरकर....

तो चॉईस ॲक्सेक्ट करावा अशाप्रकारचे धोरण आणण्याचा आम्ही विचार करीत आहोत. सन्माननीय सदस्यांनी ज्या प्रणालीचा उल्लेख केला ती सरल प्रणाली आहे. मला आपल्या निदर्शनास आणून द्यायचे आहे की, या प्रणालीमध्ये प्रत्येक जिल्ह्याची बिंदू नामावली, राज्यातील रिक्त पदांची माहिती, प्रवर्ग याची संपूर्ण माहिती असेल. त्यामुळे जिल्ह्याच्या बाबतीत निर्णय घेताना पुन्हा माहिती मागवावी लागणार नाही आणि लवकर निर्णय दिला जाईल.

सभापती महोदय, आपण या संदर्भात एक मिटींग घेण्याचे निर्देश दिले होते. दिनांक 17 फेब्रुवारी, 2016 रोजी ती बैठक घेण्याचे निश्चित झाले होते. परंतु काही अडचणीमुळे ती बैठक होऊ शकली नाही. या अधिवेशन काळात बैठक घ्यावी अशी विनंती आहे.

सभापती : आपण ती बैठक पुन्हा घ्यावी.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, मागील हिवाळी अधिवेशनात हा विषय चर्चेला आला तेव्हा शासनाकडून काही अडचणी सांगण्यात आल्या होत्या. त्यावेळी सन्माननीय सदस्यांनी खूप चांगल्या सूचना होत्या. या सूचनेचा विचार करावा. आंतरजिल्हा बदली म्हणण्यापेक्षा पती-पत्नीला एकत्रिकरण करणे हा सर्वात महत्वाचा विषय आहे.

यानंतर श्री.बोर्डे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

याबद्दल शासनाचे सहानुभूतीचे धोरण आहे. परंतु या विषयी तांत्रिक अडचणी सांगून, शिक्षक असलेल्या पती-पत्नीला जवळ ठेवण्याऐवजी दुसऱ्या टोकांवर ठेवून आपण त्यांना एकत्र येऊ देणार नाही काय ? असे असताना या शिक्षकांकडून प्रामाणिकपणे आणि समर्पित भावनेने काम करण्याची अपेक्षा करणार काय ? सभापती महोदय, पती-पत्नी शिक्षक एक-दुसऱ्या टोकावर असल्यामुळे ते कित्येक दिवस एकमेकांना भेटू शकत नाहीत, आपल्या मुलांना भेटू शकत नाहीत. यामुळे शिक्षकांमध्ये प्रचंड आक्रोश आहे. सभापती महोदय, माझी विनंती आहे की, आपण या विषयी आपल्या दालनामध्ये बैठक आयोजित करावी. तसेच या संदर्भातील तांत्रिक अडचणींवर मार्ग काढून गेली अनेक वर्षे प्रलंबित असलेला प्रश्न मार्गी लावण्यासाठी आपण पुढाकार घ्यावा.

श्री.श्रीकांत देशपांडे : सभापती महोदय, या बदल्यांमध्ये बिंदुनामावलीचा विषय सर्वात महत्त्वाचा आहे. अनेक जिल्हा परिषदांमध्ये बिंदुनामावली तयार करण्याचे काम गेल्या तीन वर्षांपासून सुरु आहे. ते काम अजूनही पूर्ण झालेले नाही. या निमित्ताने मी स्पेसिफिक विचारतो की, जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाची बिंदुनामावली पूर्ण करण्यासाठी शासन काय कार्यवाही करणार आहे ?

श्री.दीपक केसरकर : सभापती महोदय, मी अगोदरच सांगितले आहे की, या संदर्भात नवीन प्रणाली तयार केली जात आहे. त्यामध्ये बिंदुनामावलीचा सुध्दा समावेश आहे. त्यामुळे राज्य स्तरावर या बाबतची माहिती उपलब्ध होईल.

सभापती : मी माननीय मंत्र्यांना सांगू इच्छितो की, हा केवळ शिक्षक आमदारांचा प्रश्न आहे असे नाही. त्यामुळे या प्रश्नावर आपल्याला सोल्यूशन काढणे गरजेचे आहे. कारण हा विषय किचकट होत चालला आहे. बिंदुनामावली पूर्ण करण्याचे काम शिक्षक, पोलीस पाटील या प्रमाणेच इतरही पदांमध्ये वेळेवर होत नाही हा अनुभव आहे. हे खरे आहे की, आपण यामध्ये सोपा आणि परिणामकारक मार्ग काढत आहात. मला वाटते आपण सन्माननीय सदस्यांचे प्रश्न एकत्रित करून त्यानंतर त्याबाबत एक बैठक आयोजित करु या व त्यावर सोल्यूशन काढण्याचा प्रयत्न करु या.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.निरंजन डावखरे : सभापती महोदय, लेखी उत्तरात नमूद केले आहे की, "पती-पत्नी एकत्रिकरणांतर्गत सकृतदर्शनी एकूण 4509 प्रस्ताव प्रलंबित आहेत. मात्र या बदली प्रस्तावास शासनातर्फे मंजुरी देण्यात येत नाही." या निमित्ताने मी विचारु इच्छितो की, शासन निश्चितपणे संबंधित मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना प्रलंबित असलेल्या सर्व प्रस्तावांवर कार्यवाही करुन ती प्रकरणे लवकरात लवकर निकाली काढण्यासाठी भाग पाडणार काय ?

श्री.दीपक केसरकर : सभापती महोदय, आंतरजिल्हा बदलीबाबत प्राधान्यक्रम यादी तयार केलेली आहे. त्यानुसार गंभीर आजार असलेल्या कर्मचाऱ्यांना प्रथम प्राधान्य द्यावे लागते. त्यानंतर विधवा कर्मचारी, परित्यक्त्या, कुमारीका कर्मचारी, सैनिक पत्नी आणि त्यानंतर पती-पत्नी एकत्रिकरण बदली असा प्राधान्यक्रम आहे. मला निदर्शनास आणून द्यावयाचे आहे की, शासनाचे या बाबतीत सहानुभूतीचे धोरण आहे. इतर बदल्यांच्या बाबतीत 5 वर्षांची अट आहे. परंतु पती-पत्नी एकत्रिकरण बदलीच्या बाबतीत 3 वर्षे कन्सीडर करीत आहोत. त्यामुळे यानुसार पती-पत्नी शिक्षकांना कन्सीडर करण्यात येईल.

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, आंतरजिल्हा पती-पत्नी एकत्रिकरणाच्या बाबतीत शासनाने तांत्रिक बाबीत न जाता मानवी दृष्टिकोनातून विचार करावयास पाहिजे. पती-पत्नी एकत्रिकरण अंतर्गत आंतरजिल्हा बदलीबाबत माननीय मंत्र्यांनी तांत्रिक स्वरुपाच्या त्रुटी निदर्शनास आणून दिल्या आहेत. हा प्रश्न आंतरजिल्हा बदल्यांच्याच बाबतीत आहे असे नाही तर एकाच जिल्ह्यातील म्युच्युअल बदल्यांच्या बाबतीत सुध्दा आहे. अनेक ठिकाणी जिल्ह्यांतर्गत म्युच्युअल बदल्या सुध्दा वेळेवर होत नाहीत किंवा त्यांना मान्यता दिली जात नाही. जिल्ह्यांतर्गत करावयाच्या म्युच्युअल बदल्यांबाबत सुध्दा शासन गंभीर नाही. त्यामुळे मी स्पेसिफिक विचारतो की, आंतरजिल्ह्याच्या बदल्याप्रमाणे जिल्ह्यांतर्गत करावयाच्या म्युच्युअल बदल्यांबाबत सुध्दा शासन निर्णय घेईल काय ?

श्री.दीपक केसरकर : महोदय, या बाबतीत विभाग सॉफ्टवेअर विकसित करीत आहे. या विषयी अधिवेशन कालावधीत माननीय सभापतींच्या दालनात बैठक आयोजित करण्यात येईल.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, हा प्रश्न अतिशय महत्त्वाचा आहे. आंतरजिल्हा पती-पत्नी एकत्रिकरणांतर्गत शिक्षकांच्या बदल्या होत नसल्यामुळे पती-पत्नी यांना वेगवेगळे राहावे लागत आहे. त्यामुळे त्यांच्या डोक्यावर परिणाम होतात. त्यांचे शिकविण्यात लक्ष लागत नाही. त्यामुळे या विषयी शासनाने गांभीर्याने विचार केला पाहिजे. हा प्रश्न केवळ शिक्षकांच्याच बाबतीत आहे असे नाही तर आयएएस, आयपीएस व इतर अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या बाबतीत सुध्दा आहे. आजच्या युगात महिलांना नोकरी करण्याशिवाय पर्याय नाही. शासनामध्ये नोकरी मिळविणे सुलभ नाही. परंतु नोकरी मिळाल्यानंतर पती-पत्नी मात्र वेगवेगळ्या टोकाला कार्यरत असतात. त्यामुळे मी विचारु इच्छिते की, पती-पत्नी एकत्रिकरणांतर्गत आंतरजिल्हा बदल्या करण्याचा धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी किती वेळ लागणार आहे ?

श्री.दीपक केसरकर : सभापती महोदय, शिक्षण विभागाने या संदर्भात सॉफ्टवेअर विकसित केले असून, त्याचे नाव सुध्दा 'मदत' असेच ठेवले आहे. मदत म्हणजे Desire Adjustment of teachers होय. शिक्षकांना बदलीबाबत जसे अपेक्षित आहे त्या पध्दतीचे हे सॉफ्वेअर आहे. माननीय सभापती महोदय, आपल्या दालनात जी बैठक होईल त्या बैठकीत या विषयी माहिती देण्यात येईल.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

नार, पार, अंबिका, औरंगा नदी खोऱ्यातील २०० मीटर उपसा उंचीच्या मर्यादेत उपलब्ध होणारे पाणी गिरणा खोऱ्यात वळविण्याबाबत

(४) १४५८४ डॉ.अपूर्व हिरे : तारांकित प्रश्न क्रमांक १२६९० ला दिनांक १० डिसेंबर, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात: सन्माननीय जलसंपदा मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नार, पार, अंबिका, औरंगा नदी खोऱ्यातील २०० मीटर उपसा उंचीच्या मर्यादेत उपलब्ध होणारे पाणी गिरणा खोऱ्यात वळविणेसंबंधिच्या विचाराधीन बाबींवर शासनाचा विचार पुर्ण झाला आहे काय,

(२) दमणगंगा, पिंजाळ, नार-पार, तापी, नर्मदा या प्रकल्पातील उर्वरित पाणी उपसा सिंचनाद्वारे अनुक्रमे गोदावरी व तापी खोऱ्यात वळवून अवर्षण पिडीत भागास उपलब्ध करून देणेबाबत निर्णय घेण्याचे प्रस्तावित होते, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहु प्रकल्पास राष्ट्रीय प्रकल्प घोषित करणेबाबतचा निर्णय घेण्यांत आला आहे काय,

(४) असल्यास, नार, पार, औरंगा व अबिका या चार खोऱ्यातील पश्चिमवाहिनी नद्यांचे पाणी पुर्वेकडे तापी खोऱ्यात वळविण्यासाठी योजनेचे सविस्तर सर्वेक्षण व अन्वेषण प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी लागणाऱ्या खर्चास दिनांक २३ डिसेंबर, २०१४ रोजी प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, पश्चिमेकडे अरबी समुद्रास वाहून जाणारे पाणी पुर्वेकडे गोदावरी खोऱ्यात वळविण्यासाठी ६ प्रवाही वळण योजनांची कामे भौतिकदृष्ट्या पुर्ण, ११ प्रवाही वळण योजनांची कामे विविध टप्प्यावर प्रगतीपथावर, ३ प्रवाही वळण योजनांना तत्वत: मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव शासनाकडे विचाराधीन, ३ प्रवाही योजनांची कामे स्थानिकस्तर मार्फत प्रगतीपथावर आणि ७ प्रवाही वळण योजनांची कामे अत्यंत प्राथमिक अवस्थेत आहेत, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, एकदरे (दमणगंगा) ते गोदावरी खोरे या नदीजोड योजनेचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याची विनंती राज्य शासनाने राष्ट्रीय जलविकास अभिकरण यांना दिनांक १२ मार्च, २०१५ रोजीच्या पत्रान्वये केली आहे, हे ही खरे आहे काय,

(७) असल्यास, वरील प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(८) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन : (१) नाही.

(२) होय.

(३) याबाबत राज्य शासनाने मा.केंद्रीय जलसंसाधन मंत्री यांचे अध्यक्षतेखालील नदीजोड प्रकल्पाच्या विशेष समितीच्या बैठकीत मागणी केलेली आहे.

(४) होय.

(५) होय.

(६) होय.

(७) एकदरे (दमणगंगा) ते गोदावरी खोरे या नदीजोड योजनेबाबत राज्यशासनाने मा.केंद्रीय जलसंसाधन मंत्री यांचे अध्यक्षतेखाली नदीजोड प्रकल्पाच्या विशेष समितीच्या दिनांक १४/५/२०१५ रोजीच्या बैठकीत मागणी केलेली आहे.

(८) प्रश्न उद्भवत नाही.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.14584....

डॉ.अपूर्व हिरे : सभापती महोदय, नार, पार, अंबिका, औरंगा नदी खोऱ्यातील 200 मीटर उपसा उंचीच्या मर्यादेत उपलब्ध होणारे पाणी गिरणा खोऱ्यात वळविणेसंबंधीच्या विचाराधीन बाबींवर शासनाचा विचार पूर्ण झाला आहे काय, असा मी प्रश्न विचारला होता. या प्रश्नाला 'नाही' असे लेखी उत्तर देण्यात आलेले आहे. तसेच दुसरा प्रश्न हा दमणगंगा, पिंजाळ, नार-पार, तापी, नर्मदा या प्रकल्पातील उर्वरित पाणी उपसा सिंचनाद्वारे अनुक्रमे गोदावरी व तापी खोऱ्यावर वळवून अवर्षण पिडीत भागास उपलब्ध करून देणेबाबत निर्णय घेण्याचे प्रस्तावित होते, हे खरे आहे काय, असा विचारला होता. या प्रश्नाला 'होय' असे लेखी उत्तर देण्यात आलेले आहे. महोदय, आज राज्यातील दुष्काळी परिस्थितीची आपल्या सर्वांना कल्पना आहे. महोदय, या नद्यांचे पाणी गिरणा व गोदावरी खोऱ्यांमध्ये आणले तर महाराष्ट्रात खाली मराठवाड्यापर्यंत पाणी जाऊ शकते आणि त्यातून पाण्याचा प्रश्न सुटू शकतो. शासनाने पुढील प्रश्नांची उत्तरे सकारात्मक दिली असली तरी, यातील बरेच पाणी पुन्हा मुंबई शहरालाच द्यावयाचे आणि उत्तर महाराष्ट्र, अन्य दोन-तीन जिल्हे आणि खाली मराठवाड्याला मिळणाऱ्या पाण्यापासून त्यांना वंचित ठेवण्याची भूमिका यातून पुढे येत असल्याचे दिसते. आजही नाशिकचे जास्तीत जास्त पाणी मुंबई शहरालाच पिण्यासाठी दिले जाते. मी स्पेसिफिक विचारतो की, हे पाणी नाशिक आणि मराठवाड्यासाठी राखीव ठेवणार काय आणि उपरोक्त नदी खोऱ्यातील पाणी गिरणा आणि गोदावरी खोऱ्यात आणणार काय ?

श्री.गिरीष महाजन : सभापती महोदय, दमणगंगा, पिंजाळ नदीचे पाणी हे मुंबईऐवजी गिरणा व गोदावरी खोऱ्यात सोडण्याची सन्माननीय सदस्यांची मागणी आहे. मुंबई शहराची पाण्याची गरज भागविण्याचा प्रस्ताव तयार झालेला आहे. 100 टक्के डिपेंडन्सीने 21 टीएमसी पाणी आणि 75 टक्के डीपेंडन्सीने 31 टीएमसी पाणी मुंबईला आणले जाणार आहे. काही नद्यांमधील पाणी गिरणा व गोदावरी खोऱ्यामध्ये वळवून ते पाणी मराठवाड्याला द्यावे अशी सन्माननीय सदस्यांची मागणी आहे. परंतु असे करणे शक्य नाही. कारण ही नदीजोड प्रकल्प योजना आहे. हे पाणी मुंबईला प्रवाहीत पध्दतीने दिले जाणार आहे. मुंबईला पाणी दिल्यानंतर उर्ध्व वैतरणा येथील 10 टीएमसी पाणी मराठवाड्याला सोडणे शक्य आहे. त्यामुळे सन्माननीय सदस्य जी मागणी करीत आहेत ती पूर्ण करणे कदापि शक्य नाही. कारण यामध्ये अनेक तांत्रिक

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

निकष आहेत. उदाहरणार्थ त्याची उंची, ते पाणी दमणगंगावरुन तिकडे म्हणजे जवळजवळ 600 मीटरच्या वरुन प्रवाहीत पध्दतीने न्यावे लागेल. म्हणून सन्माननीय सदस्यांच्या म्हणण्याला कुठेही तांत्रिकदृष्ट्या आधार नाही. त्यांच्या भागाला पाणी मिळाले पाहिजे हे त्यांचे म्हणणे ठीक आहे. परंतु मुंबई ही आर्थिक राजधानी आहे. आज मुंबईच्या उपनगरात दोन-दोन दिवसांनी पाणी पुरवठा होतो. मुंबईत पुरेसे पिण्याचे पाणी नाही. मुंबई शहराची पुढील 25-30 वर्षांची लोकसंख्या किंवा वाढती लोकसंख्या पाहता मुंबईला पाणी देणे आवश्यक आहे. तसेच हे पाणी प्रवाहीत पध्दतीने मुंबईला जाणार असल्यामुळे याकामी खर्च येणार नाही. एनडब्ल्यूडीएने सांगितल्यानुसार 30 टीएमसी पाणी मुंबईला प्रवाहित पध्दतीने देण्याची योजना प्रस्तावित केली आहे.

एफ.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.14584....

डॉ. अपूर्व हिरे : सभापती महोदय, आज चेन्नईसारख्या शहराने समुद्राचे पाणी शुध्द करून चेन्नईला देण्यास सुरूवात केली आहे. आज त्यांचे 3 प्रकल्प सुरू झाले आहेत. आपल्याला असे मुंबईतही करणे शक्य आहे. मी देशातील उदाहरण देतो. मॉरिशससारख्या देशात एकही नदी नाही. समुद्राचे पाणी शुध्द करून ते पित आहेत. आपण जर मुंबईसाठी अशी व्यवस्था केली तर या पाण्यामध्ये नाशिक, उत्तर महाराष्ट्र, मराठवाडा या सर्व भागांच्या पाण्याचा प्रश्न सुटू शकेल. शेतकऱ्यांना आत्महत्या करावी लागत आहे. शेतकऱ्यांवर वाईट परिस्थती येत आहे, ती येणार नाही. आपण दोन्ही गोष्टी यातून साध्य करू शकतो.

श्री. गिरीष महाजन : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सांगत आहेत की, समुद्राचे पाणी गोड केले पाहिजे. खरे आहे की, चेन्नईसारख्या शहरात तो प्रयोग सुरू केला आहे. परंतु याची कॉस्ट पाहिली तर दिसेल की, हा खर्च खूप मोठा आहे. त्यापेक्षा आपल्याला हे पाणी आणणे सहज शक्य आहे. मुंबईला सध्या ऊर्ध्व वैतरणाचे पाणी दिले जाते. मी सांगितले की, आपण जर पिंजाळचे पाणी या ठिकाणी आणले तर ते पाणी मुंबईला देऊन, ते 10 टीएमसी पाणी आपल्याला मराठवाड्याला देणे शक्य आहे. त्यामुळे मला वाटते की, आपल्यासाठी ही योजना अतिशय उपयुक्त आहे. सन्माननीय सदस्य म्हणत आहेत की, समुद्राचे पाणी गोड करून पिण्याच्या पाण्यासाठी त्याचा वापर करावा.

सभापती : सुदैवाने आज माननीय मुख्यमंत्री सभागृहात उपस्थित आहेत. हा प्रश्न काही फक्त उत्तर महाराष्ट्रातील किंवा आंतरजोड नदी प्रकल्पाचा आहे असे मला तरी काही वाटत नाही. आपल्या राज्यात अर्बनायझेशन अतिशय वेगाने सुरू आहे. आपण पुण्यासारखे शहर घेतले तर आपल्यालाही माहीत आहे की, खडकवासला सिस्टिम आहे, भामा आस्केड आहे, या सर्वांचे पाण्ी आपण घेत आहोत. त्यामुळे डायरेक्ट परिणाम शेतीवर होणार आहे हे वादातीत आहे. मुख्यमंत्री महोदय, आपण आपल्या स्तरावर एक बैठक घेऊन मार्ग काढावा अशी माझी आपल्याला सूचना आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.14584....

श्री. देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, आपण अतिशय योग्य बाब सांगितली आहे. आपण म्हणायचो की, पुढची युध्दे पाण्यावर होतील. मात्र आता ते बाजूला ठेवा. पण आज खरोखर राज्यांमधील शहरीकरणामुळे शहर व ग्रामीण असा पाण्याचा वाद सुरू झाला आहे. सिंचनाचे पाणी, इंडस्ट्रीचे पाण्ी व पिण्याचे पाण्ी असा प्रकार सुरू झाला आहे. विशेषतः आज आपण एमएमआर रिजनमध्ये एमआयडीसीच्या डॅममधून पाणी घेत आहोत, त्याच्यावरही खूप मोठ्या प्रमाणात अडचणी चालल्या आहेत. कारण पिण्याचे पाण्ी दिले तर इंडस्ट्री बंद करावी लागते अशी एमएमआर रिजनमध्ये अनेक ठिकाणी अवस्था तयार झाली आहे. त्यामुळे आपल्याला यामध्ये आपण सांगितल्याप्रमाणे मल्टिस्कोप ॲप्रोच घ्यावा लागेल. माननीय मंत्र्यांनी सांगितले ते प्रकल्पही आपल्याला करावे लागतील. कारण हे वाया जाणारे पाण्ी आहे. हे वाया जाणारे पाण्ी जेथे ग्रॅव्हिटीने येऊ शकते तेथे ग्रॅव्हिटीने आणले पाहिजे. सन्माननीय सदस्यांनीही सूचना मांडली आहे आणि माननीय मंत्र्यांनीही दुजोरा दिला आहे. आपल्याला काही प्रमाणात नवीन टेक्नॉलॉजीचा उपयोग करून समुद्रातील पाण्याविषयी पहावे लागणार आहे. खरी गोष्ट आहे की, आज समुद्रातील पाणी सॉफ्ट करून वापरण्यात येते. मात्र त्याचा खर्च मोठा आहे. इंग्रजांनीच त्या काळात धरणांची मालिका तयार केली, त्यामुळे अतिशय चांगली इको सिस्टिम तयार झाली. त्यामुळे स्वस्त पाणी ग्रडिएडने मिळते. आपल्याला भविष्यात हा विचार निश्चितपणे करावाच लागेल. आपल्याला समुद्राचे पाणी कसे वापरता येईल या संदर्भातीलही विचार करावा लागेल. त्यामुळे आपण सांगितल्याप्रमाणे या संदर्भात एक बैठकही घेण्यात येईल आणि त्यासोबत निश्चितपणे समुद्राचे पाणी वापरण्याच्या संदर्भात आपल्याला कोणत्या टेक्नॉलॉजीचा वापर करता येईल याबाबतीतील एक प्रकल्प अहवाल तयार करण्यात येईल.

श्री. जयवंतराव जाधव : सभापती महोदय, मांजरपाड्याचा 80 कोटी रुपयांचा निधी प्रलंबित होता, तो तातडीने उपलब्ध करून दिला जाईल हे मागच्या वेळी माननीय मुख्यमंत्र्यांनी खालच्या सभागृहात आश्वासन दिले होते. पण अजुनही तो निधी आपल्याला प्राप्त झालेला नाही. आमचे

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

माननीय पालकमंत्री सभागृहात उपस्थित आहेत. माननीय मुख्यमंत्री उपस्थित आहेत. वेळ चालला आहे, त्यामुळे काम रखडले आहे, ते मार्गी लावण्याकरिता आजच काही घोषणा कराल का ? ..3

11-03-2016 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) F.3

MSK/ AKN/ AKN/ KTG/ MMP/ 12:50

ता.प्र.क्र.14584....

श्री. गिरीष महाजन : सभापती महोदय, मांजरपाडा संदर्भात सुप्रमाचाही प्रश्न प्रलंबित आहे. आता आपण सुप्रमाला सुरूवात केलेली आहे. परंतु सुप्रमा देताना अनेक अडचणी यामध्ये येत आहेत. आपण पाहिले असेल की, परवा आपण वाशिमच्या 11 बॅरेजंना सुप्रमा दिली आहे. आपल्याकडून टीकाटिप्पणी होत आहे की, एवढे पैसे कसे वाढले, कशा परवानग्या दिल्या. मागच्या काळात 8-10 वर्षांत टेंडर निघाले, त्यावेळी अनेक अनियमितता, त्रुट्या झाल्या आहेत. तांत्रिक करणांमुळे किंमती वाढत आहेत. बरेच प्रयत्न करीत आहोत. जवळपास 65-70 सुप्रमा या वर्षभराच्या काळात दिलेल्या आहेत.

सभापती : मूळ प्रश्न असा आहे की, आपण जर सुप्रमामुळे हे निधी डायव्हर्ट केले असतील तर सुप्रमा देण्याकरिता आपण काय करणार आहात ? संपूर्ण राज्यातील प्रकल्पांच्या सुप्रमांबद्दल प्रश्न आहे.

श्री. गिरीष महाजन : सभापती महोदय, वर्षभरात 65-70 सुप्रमा दिल्या आहेत. गेल्या वेळी वाशिमची सुप्रमा दिली. आम्ही सुप्रमा देतो. पण आपण टीकाटिप्पणी करता की, एवढ्या सुप्रमा कशा दिल्या, एवढी किंमत कशी वाढली. तांत्रिक अडचणी येतात.

श्री. देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, आपण अतिशय चांगला मुद्दा मांडला आहे. मुळात आपण आता सुप्रमा देताना टेक्निकल ॲडव्हायजरी कमिटी तयार केली आहे. आता मांजरपाड्याचा विषय घेतला तर असे दिसेल की, सिंचन विषयक विशेष समिती तयार केली होती, तिने फार गंभीर आक्षेप त्यावर घेतले आहेत. राज्य सरकारसमोर अशा प्रकारची परिस्थिती आहे. आता वाशिमचा उल्लेख केला. त्याचे 80 टक्के काम झाले आहे, 20 टक्के काम बाकी आहे. आता उरलेले 20 टक्के काम केले नाही तर पाणी मिळत नाही. 80 टक्के कामामध्ये 100 टक्के अनियमितता आहे. त्यामुळे आता शासनाने कॅबिनेटमध्ये हा विषय घेऊन, अनियमिततेची चौकशी अलहिदा चालेल, त्याला मान्यता देऊन उरलेले काम पूर्ण करण्याच्या संदर्भात भूमिका घेतली आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

खूप अडचणी आहेत. वेगवेगळ्या स्टेजेसवर खूप प्रकल्प अडले आहेत. त्यामध्ये वेगवेगळ्या प्रकारच्या अनियमितता आहेत. सर्व कंडोन करणे हे फार कठीण जात आहे आणि म्हणून याला

..4

11-03-2016 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) F.4

MSK/ AKN/ AKN/ KTG/ MMP/ 12:50

ता.प्र.क्र.14584....

श्री. देवेंद्र फडणवीस ....

उशिर लागत आहे. मांजरपाड्याचा विषय टेक्निकल ॲडव्हायजरी कमिटीकडे गेला आहे. आपण चितळे कमिटी तयार केली होती, तिने या संदर्भात इतके गंभीर आक्षेप घेतले आहेत की, त्याची पूर्तता केलयाशिवाय आपण टेक्निकल कमिटीला दिले तर अडचणीचे होईल. त्यामुळे आता या संदर्भात आपण त्यांना सांगितले आहे. आता त्या संदर्भातील एक धोरणात्मक अहवाल टेक्निकल ॲडव्हायजरी कमिटी जी राज्य स्तरावर केली आहे, ती देणार आहे, त्या आधारे कॅबिनेट त्यावर निर्णय करील.

..5

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

तारांकित प्रश्न क्रमांक 14721 (अ.क्र.5) व 15755 (अ.क्र.6) पुढे ढकलण्याबाबत

सभापती : तारांकित प्रश्न क्रमांक 14721 व 15755 संदर्भात माननीय मंत्री, महिला व बाल विकास यांनी आताच माझ्याकडे एक निवेदन पाठविले आहे की, त्या अपरिहार्य कारणामुळे बाहेरगावी गेल्यामुळे हे प्रश्न राखून ठेवावेत. मी या विषयीचे पूर्वीचे प्रिसिडंट बघितले आहेत. आपण अपवाद म्हणून सोमवारी तारांकित प्रश्न क्रमांक 14721 व 15755 हे अग्रक्रमाने घेऊ. आता 2 मिनिटे राहिलेली आहेत.

(विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य मोठ्याने बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

माननीय मंत्र्यांनी प्रश्न पुढे ढकलण्याची विनंती केली. मी ती विनंती मान्य केली. सोमवारी हे प्रश्न घेण्यात येतील.

श्री. धनंजय मुंडे : सभापती महोदय, राज्याचे माननीय मुख्यमंत्री सदनात आहेत. माननीय मंत्री उत्तर देण्यास उपस्थित नसतील तरी, त्यांनी त्या संदर्भात पत्र जरी दिले असले तरी माननीय मुख्यमंत्र्यांनी उत्तर दिले तरी आम्ही समाधानी राहू. आम्हाला काही अडचण नाही. प्रश्न पुढे ढकलण्याऐवजी माननीय मुख्यमंत्र्यांनी उत्तर दिले तरी काही अडचण नाही.

श्री. देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, मला माननीय मंत्र्यांनी सांगितले होते की, त्यांनी आपल्याला विनंती केली आहे. आपले हृदय विशाल असल्यामुळे आपण ती विनंती मान्य कराल हे मला माहीत असल्यामुळे मी या प्रश्नाचे ब्रिफिंग घेलले नाही. मी ब्रिफिंग घेतले असते तर जरूर उत्तर दिले असते. सन्माननीय विरोधी पक्षनेते बसलेले असताना मी चुकीचे उत्तर दिले तर मी अडचणीत येईन. मी ब्रिफिंग घेऊन त्या प्रश्नांचे उत्तर देऊ शकतो.

सभापती : आता माननीय मुख्यमंत्र्यांनी या संदर्भात सांगितले आहे. आपणही मन विशाल करावे.

डॉ. अपूर्व हिरे : सभापती महोदय, माझी हरकत आहे. मघाशी माननीय मंत्र्यांनी उत्तर देताना मांजरपाड्याच्या बाबतीत सांगितले.

सभापती : आता प्रश्न पुढे गेला आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

नंदूरबार शहरात एम.एस.आर.डी.सी. प्रकल्प अंतर्गत डिझेल व पेट्रोलवर लावलेला सेस रद्द करण्याबाबत

(7) * १६१२९ श्री.चंद्रकांत रघुवंशी, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्रीमती दिप्ती चवधरी : सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) नंदूरबार शहरात एम.एस.आर.डी.सी. प्रकल्प अंतर्गत डिझेल व पेट्रोलवर लावलेला सेस रद्द न होण्याची कारणे काय आहेत,
(2) असल्यास, याबाबत मागील अधिवेशनात आश्वासन देऊनही त्याची अंमलबजावणी झालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(3) असल्यास, आदिवासी जिल्ह्याला सेसपासून किती दिवसात रद्द करण्यात येणार आहे ?
(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुधीर मुनगंटीवार : (१) दिनांक ११.०८.२००३ च्या शासन निर्णयानुसार नंदूरबार शहरातील वाहतूक व्यवस्थेत सुधारणा करण्यासाठी रस्ते व पुलांच्या कामाकरिता एमएसआरडीसी यांना उद्योजक घोषित करण्यात आले व त्याची या संबंधातला खर्च वसूल करण्याकरिता डिझेल व पेट्रोल लावलेला जादा अधिभारापोटी जमा होणारा निधी देण्याचे ठरविण्यात आले. त्या निर्णयाच्या अनुषंगाने दिनांक १ जून, २०१२ पासून अधिभार लावण्यात आला आहे. उल्लेखित उद्देश लक्षात घेता जादा अधिभार रद्द करण्यात येऊ शकत नाही.
(2) खरे नाही, या संदर्भात कोणतेही आश्वासन दिलेले नाही.
(3) अशी बाब नाही.
(4) नंदूरबार शहर एकात्मक रस्ते विकास योजनेची वित्तीय आखणी सर्वसाधारणपणे वर्धनक्षम होण्याच्या दृष्टिने पेट्रोल व डिझेलवर अधिभार लावण्यात आला आहे. त्यामुळे अधिभार रद्द करता येत नाही.

श्री. चंद्रकांत रघुवंशी : सभापती महोदय, गेल्या 3 वर्षांपासून नंदुरबार शहराला लागलेला टोल रद्द करण्यात आला आहे. परंतु तरी सुध्दा आजही नंदुरबार शहरातील पेट्रोल व डिझेलवरील सेस सुरू आहे. मागे सुध्दा हा प्रश्न आला होता. मात्र उत्तरामध्ये एमएसआरडीसीच्या माननीय मंत्र्यांनी सांगितले होते की, आम्ही सुरूअसलेला सेस सुध्दा तत्काळ बंद करू

....G

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.16129.....

श्री.चंद्रकांत रघुवंशी.....

माननीय मंत्री श्री.एकनाथ शिंदे यांनी सभागृहात उत्तर दिलेले आहे. एकीकडे आपण आदिवासी जिल्ह्यांना न्याय देत असताना राज्यातील एमएसआरडीसी आणि सार्वजनिक बांधकाम विभागाचे 60 ते 70 टोल बंद केले आहेत. कोल्हापूर येथील 400 कोटी रुपयांचा प्रकल्प आपण माफ केलेला आहे. नंदुरबार शहरातील लोकांना या सेसपोटी वर्षाला एक ते दीड कोटी रुपयांचा भूर्दंड आहे. आदिवासींना कोर्ट फी सुध्दा लागत नाही आणि दुर्दैवाने त्या आदिवासी जनतेला, मुख्यालयाला येणाऱ्या प्रत्येक माणसाला सेस भरावा लागत आहे. हा सेस हे अधिवेशन संपण्यापूर्वी शासन रद्द करणार आहे का ?

सभापती : प्रश्नोत्तराचा तास 5 मिनिटांसाठी वाढविण्यात येत आहे.

श्री.सुधीर मुनगंटीवार : सभापती महोदय, दिनांक 1 जून, 2012 पूर्वी पासून बृहन्मुंबई, ठाणे आणि नवी मुंबई या महानगरपालिकांच्या भौगोलिक हद्दीमध्ये हायस्पीड डिझेलवर 3 टक्के अतिरिक्त कर आकारला जातो. एमएसआरडीसीच्या माध्यमातून नंदुरबार शहरातील 5 कामे करण्यात आली. 2 रेल्वे उड्डाणपुल तसेच नंदुरबार शहर बाह्यवळण रस्त्याची कामे पूर्ण झाली आहेत. पथकर रोड व शहराअंतर्गत काही कामे पूर्ण व्हावयाची आहेत. दिनांक 16 मे, 2012 च्या अधिसूचनेमध्ये नंदुरबार नगरपरिषदेचा समावेश करण्यात आला होता. नंदुरबार नगरपरिषदेचा अतिरिक्त कर हा दिनांक 31 डिसेंबर, 2016 पर्यंत आहे. त्यामुळे दिनांक 31 डिसेंबर, 2016 नंतर त्याबाबतचा पुनर्विचार करता येईल.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, आपल्याला माहीत आहे की, नागपूर येथील हिवाळी अधिवेशनात याच मंत्रिमंडळातील एका जबाबदार मंत्री महोदयांनी हा सेस तत्काळ रद्द केला जाईल, असे आश्वासन याच सभागृहात दिलेले आहे. या आदिवासीबहुल असलेल्या शहरामध्ये इतर सर्व सुविधा आपण त्यांना देत आहोत व त्या देणे आवश्यक आहे. आता सन्माननीय सदस्या असे म्हणत होत्या की, पेट्रोलच्या दरामध्ये आता बदल झाला आहे व तो कमी झाला आहे. परंतु, एक ते सव्वा कोटी रुपयांचा सेस आपण रद्द करण्याचा निर्णय घेणार नसाल तर आदिवासी

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.16129.....

श्री.भाई जगताप.....

विभागावर अन्याय होईल. माझा असा प्रश्न आहे की, माननीय मंत्री श्री.एकनाथ शिंदे यांनी या सभागृहात कबूल केल्याप्रमाणे हा सेस तत्काळ रद्द होणार आहे का ?

श्री.सुधीर मुनगंटीवार : सभापती महोदय, या तारांकित प्रश्नाच्या प्रश्न भाग 2 अन्वये "मागील अधिवेशनात आश्वासन दिले आहे का", अशी विचारणा करण्यात आली होती व त्याला "हे खरे नाही, या संदर्भात कोणतेही आश्वासन दिलेले नाही," असे उत्तर देण्यात आले आहे. तथापि, अशा प्रकारे नंदुरबार जिल्ह्याच्या संदर्भात स्पेसिफिक आश्वासन नागपूरच्या हिवाळी अधिवेशनात दिल्याची कागदपत्रे सन्माननीय सदस्यांकडे असतील तर त्या आश्वासनाची पूर्तता सरकार निश्चितपणे करील.

श्री.चंद्रकांत रघुवंशी : सभापती महोदय, मंत्री महोदय नगरपरिषदेचा उल्लेख करीत आहेत. खरे म्हणजे, या शहरामध्ये 14 किलो मिटरचे रस्ते एमएसआरडीसीमार्फत करण्यात येणार होते. परंतु, ते तयार करण्यात आलेले नाहीत. त्या ठिकाणी 1 किलो मिटरचा रस्ता देखील बनविलेला नाही. परंतु, सेस सुरु आहे. माननीय मंत्री श्री.एकनाथ शिंदे यांनी डिसेंबर, 2015 मधील नागपूरच्या हिवाळी अधिवेशनात या संदर्भातील आश्वासन दिलेले आहे. त्यानंतर आदिवासी विकास मंत्री महोदयांबरोबर बैठकही झालेली आहे. परंतु, मार्ग निघालेला नाही. ही अतिशय अल्प रक्कम आहे. त्यामुळे डिसेंबर, 2016 मध्ये तरी हा सेस रद्द करणार आहात का व त्याबाबतचे आश्वासन मंत्री महोदय सभागृहाला देणार आहेत का ?

श्री.सुधीर मुनगंटीवार : सभापती महोदय, संबंधित मंत्री महोदयांनी आश्वासन दिले असेल तर सामुहिक जबाबदारी म्हणून त्या आश्वासनाची पूर्तता करण्यात कोणतीही अडचण येऊ शकत नाही. हा सेस एमएसआरडीसीच्या प्रस्तावानुसारच लावला जातो. सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप असे म्हणाले की, "हा आदिवासींवर अन्याय आहे." परंतु, हाच तात्कालिक विचार सन 2012 मधील सरकारने केला आणि तो तात्कालीक समयामधील निर्णय आदिवासी बांधवांच्या हिताच्या दृष्टीने घेतला गेला असता तर हा प्रश्नच निर्माण झाला नसता.

सभापती : प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

11-03-2016 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) G-3

SRR/ AKN/ AKN प्रथम श्री.मंगेश..... 13:00

राखून ठेवलेल्या तारांकित प्रश्नांबाबत

सभापती : मी मघाशी महिला व बाल कल्याण विभागाशी संबंधित तारांकित प्रश्न क्रमांक 14721 व 15755 राखून ठेवण्यात येऊन ते सोमवार, दिनांक 14 मार्च, 2016 रोजी चर्चेला घेण्यात येतील, असा निर्णय दिला होता. त्याऐवजी हे प्रश्न मंगळवार, दिनांक 15 मार्च, 2016 रोजी प्रश्नोत्तराच्या तासात घेण्यात येतील. (अडथळा....) ठीक आहे. प्रश्नाच्या यादीतील क्रमांक 8 सह घेण्यात येतील. महिला व बालकल्याण विभागाशी संबंधित असतील ते प्रश्न घेण्यात येतील.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशनबाबत

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, माझा पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशन आहे.

सभापती महोदय, राज्याचे माननीय वित्त मंत्री दिनांक 18 मार्च, 2016 रोजी या वर्षाचा अर्थसंकल्प मांडणार आहेत. मागील वेळी अर्थसंकल्प सादर केल्यानंतर माध्यमातून वेगवेगळ्या बातम्या आमच्यासमोर आल्या होत्या. काही ठिकाणी असे आले की, फक्त 45 टक्के बजेट स्पेंडिंग झाले आहे, 48 टक्के झाले आहे. सोशल वेलफेअर, सोशल जस्टिसच्या विभागांना शासन प्राधान्याने निधी देत असते व तो तसा दिला पाहिजे. परंतु, आम्हाला अशी चिंता आहे की, या विभागांना दिलेला निधी शेवटच्या क्षणापर्यंत खर्च होणार आहे किंवा नाही, हा निधी अन्य विभागांकडे डायव्हर्ट होणार आहे का ? याबाबत वित्त मंत्री महोदयांनी सभागृहाला माहिती द्यावी, अशी माझी विनंती आहे.

सभापती : सन्माननीय सदस्य हा प्रश्न पुरवणी मागण्यांवरील चर्चेमध्ये देखील उपस्थित करु शकले असते.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, हा महत्वाचा विषय आहे, चिंतेचा विषय आहे. या विषयामध्ये संदिग्धता आहे. त्यामुळे खुलासा व्हावा, अशी आमची अपेक्षा आहे.

श्री.सुधीर मुनगंटीवार : सभापती महोदय, असा एखादा प्रश्न वेळेवर उपस्थित झाल्यानंतर मला आकडेवारी व्यवस्थितपणे देता येणार नाही. परंतु, हे खरे आहे की, मागील महिन्यापर्यंत एकूण बजेटच्या 77 टक्क्यांपेक्षा जास्त खर्च झाला आहे. आता आपल्याकडे एक ते सव्वा महिना शिल्लक आहे. त्यामुळे उर्वरित निधी देखील खर्च होईल. दरवर्षी कॅश फ्लो कसा होता, ही गेल्या 5 वर्षाची माहिती देखील मी पुरवणी मागण्यांच्या वेळी सभागृहाला देईन. गेल्या 5 वर्षात कोणत्या, कोणत्या पध्दतीचा कॅश फ्लो कसा असायचा, हे देखील आपल्या लक्षात येईल. मी सभागृहाला ही माहिती देऊ इच्छितो की, समाजकल्याण आणि आदिवासी विकास विभाग यांना घटनेने दिलेल्या चौकटीत आपण निधी देत असल्यामुळे त्यामध्ये इकडचा पैसा तिकडे करता येणार नाही. त्यामुळे आम्ही घटनेच्या चौकटीत बांधिल राहूनच काम करणार आहोत. सामाजिक न्याय व

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

आदिवासी विकास विभाग हे आमच्यासाठी अतिशय महत्वाचे विभाग आहेत. आपण जाणता की,

...5....

श्री.सुधीर मुनगंटीवार.....

देशाचे माननीय पंतप्रधान श्री.नरेंद्र मोदी यांनी सुरु केलेल्या स्टँण्ड अप इंडिया, स्टार्टअप इंडिया, मुद्रा बँक या योजना विषमतामुक्तीकडे नेणारे पाऊल आहे. हे करीत असताना भारत सरकारने जी भूमिका ठेवली आहे ती दुर्बल, शोषित, पीडित यांच्यासाठीच आहे.

...6....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

नियम 289 अन्वये प्रस्तावाच्या सूचनेसंबंधी

सभापती : आज माझ्याकडे नियम 289 अन्वये प्रस्तावाच्या काही सूचना प्राप्त झालेल्या आहेत. हे विषय आजच्या कामकाजपत्रिकेत समाविष्ट नाहीत. तथापि, विषयाचे गांभीर्य लक्षात घेता मी या सूचनेसंबंधी माननीय सदस्यांना थोडक्यात आपले म्हणणे मांडण्याची संधी देण्यात येत आहे.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, आम्ही विधानपरिषद नियम 289 अन्वये स्थगन प्रस्तावाची सूचना दिलेली आहे.

सभापती महोदय, सन्माननीय मुख्यमंत्री सभागृहात उपस्थित आहेत. मुंबई वसल्यापासून गिरणी कामगारांचे योगदान मोठ्या प्रमाणावर राहिलेले आहे. आज गिरणी कामगारांनी मोर्चा काढला असून आझाद मैदान येथे त्यांचे आंदोलन सुरु आहे. त्यांचे उपजीविकेचे साधन संपुष्टात आल्यानंतर ते गावागावात गेले. त्यांनी त्या त्या खेड्यात, तालुक्याच्या आणि जिल्ह्याच्या ठिकाणी जेलभरो आंदोलन सुरु केलेले आहे.

सभापती महोदय, जवळपास 1 लाख 40 हजार गिरणी कामगारांच्या घरांचा प्रश्न निर्माण झाला आहे. गेली काही वर्षे सातत्याने या सभागृहामध्ये वेगवेगळ्या माध्यमातून त्यांचे प्रश्न मांडण्यात आले आहेत. सर्वच राजकीय पक्षांनी या प्रश्नाच्या बाबतीत नेहमीच आग्रही भूमिका घेतली आहे. काही वेळेला सोयीची भूमिका घेतली गेली असेल, काही वेळा सोयीनुसार ती विसरली गेली असेल. आज सरकारला विसर पडला आहे म्हणूनच त्यांना मोर्चा घेऊन या ठिकाणी यावे लागत आहे. गेल्या वर्षभरामध्ये या संदर्भात कोणतेही निर्णय झालेले नाहीत. मागील सरकारमध्ये या संदर्भात निर्णय झाला होता व एमएमआरडीएच्या परवडणाऱ्या 5 लाख घरांपैकी 50 टक्के घरे गिरणी कामगारांना देण्यासंबंधी अध्यादेश काढण्यात आला होता. ही जी घरे आहेत त्यासंदर्भात लॉटरी काढण्यात येईल, असे आश्वासन मुख्यमंत्र्यांनी दिले होते. अद्यापही ती लॉटरी काढण्यासंबंधी कोणताही विषय घेतला गेला नाही. गिरण्यांची घरे, जागा यामधील काही महापालिकेच्या आणि सरकारच्या ताब्यात आल्या आहेत. त्यामधील घरे बांधण्याच्या बाबतीत गेल्या वर्षभरात कोणत्याही प्रकारची कार्यवाही दुर्दैवाने होऊ शकलेली नाही.

यानंतर श्री.बोरले.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुनील तटकरे.....

गिरणी कामगारांच्या या प्रश्नाबाबत सातत्याने दुर्लक्ष झालेलेच आहे. आज या प्रश्नासाठी गिरणी कामगारांचे आंदोलन सुरु आहे. सभागृहासमोर असलेले सर्व कामकाज बाजूला सारुन या प्रश्नावर चर्चा होणे अत्यंत आवश्यक आहे. मागील प्रत्येक अधिवेशनात गिरणी कामगारांनी लाखोच्या संख्येने मोर्चे काढले. त्या त्यावेळी गिरणी कामगारांना वेगवेगळी आश्वासने देण्यात आली. परंतु, दुर्दैवाने त्या आश्वासनांची पूर्तता करण्याच्या दृष्टीने एकही पाऊल उचलले गेले नाही, हे वास्तव नाकारता येणार नाही. आज गिरणी कामगारांचा मोर्चा आलेला असल्यामुळे सभागृहासमोर असलेले सर्व कामकाज बाजूला सारुन या प्रश्नावर चर्चा व्हावी. सरकारकडून या संदर्भात नेमकी कोणती ठोस पावले उचलली जाणार आहेत ? मागील सरकारने एमएमआरडीएची घरे गिरणी कामगारांना देण्याबाबत जो अध्यादेश काढला होता, त्याबाबत शासनाची भूमिका काय राहणार आहे ? कारण, आता वेगवेगळ्या पद्धतीच्या लॉटरी काढल्या जातात. मध्यंतीरी म्हाडाच्या घरांची लॉटरी काढण्यात आली. मग गिरणी कामगारांना वंचित ठेवण्याचा जाणीवपूर्वक का प्रयत्न केला जात आहे ? या संदर्भात सविस्तर चर्चा होणे आवश्यक असल्यामुळे आम्ही या विषयावर म.वि.प. नियम 289 अन्वयेच्या सुचनेच्या माध्यमातून चर्चा उपस्थित करीत आहोत. आपण ती मान्य करावी, अशी माझी विनंती आहे.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, हा अतिशय संवेदनशील प्रश्न आहे. अशाच प्रकारचा मोर्चा एका वर्षापूर्वी काढण्यात आला होता. जी घरे तयार आहेत ती आमच्या हवाली करावीत यासाठी तो मोर्चा काढण्यात आला होता. आपण स्वतः याच सभागृहात आम्हाला आश्वासन दिले हाते की, आम्ही यासाठी तत्काळ लॉटरी काढू आणि जी घरे तयार आहेत ती त्यांना वितरित करु. आता या गोष्टीला देखील एक वर्ष झालेले आहे. कामगारांना एका वर्षापासून समोर तयार घरे दिसत आहेत.

सभापती : सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप आपण आपले म्हणणे थोडक्यात मांडावे.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, मी गिरणी कामगारांच्या घरांच्या संदर्भात थोडक्यात बोलणार आहे. मी गिरणी कामगारांच्या चळवळीबाबत बोलणार नाही. आता ती निकाली काढण्यात आलेली आहे. हा गिरणी कामगारांच्या घरांचा प्रश्न आहे. तुमच्या शासनाने काय केले, अशी बोटे

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.भाई जगताप.....

दाखविली जातात. मी सांगू इच्छितो की, मागील सरकारच्या काळात तयार झालेली घरे वितरित करण्यासाठी दिड वर्ष लागत असेल तर त्याचे आम्हाला आश्चर्य वाटते. सन 1995 मध्ये युती सरकारने 47 हजार गिरणी कामगारांचा आकडा सांगितला होता. तो आकडा चुकीचा होता. आमच्या काळात 1 लाख 68 हजार गिरणी कामगारांना घरे मिळावीत, असा निर्णय झाला होता. एखादा कामगार गावाकडे गेलेला असेल, या शहरात असेल त्यासाठी आम्ही आमच्या काळात गिरण्यांची जमीन अधिग्रहीत करण्याचे, त्या जमिनीवर घरे बांधण्याचे आणि ते वितरित करण्याचे काम केलेले आहे. आमच्या काळात तयार झालेली घरे वितरित करावीत, असे आम्ही सांगत आहोत आणि त्यासाठीच तो मोर्चा आलेला आहे. मागील वर्षी आपण सभागृहात सांगितले की, आम्ही ती घरे लवकरात लवकर वितरित करु. आता एक वर्ष झालेले आहे. आता त्यांना जी घरे तयार आहेत ती मिळावीत, यासाठी पुन्हा मोर्चा काढावा लागत आहे. महत्वाचे म्हणजे या संदर्भात आणखी एक निर्णय झाला होता. जे कामगार गावी गेलेले असतील आणि त्या जिल्ह्यात अशा जागा असतील तर त्याही जागा अधिग्रहीत करुन तेथे त्यांना घरांची सोय करुन द्यावी, असाही निर्णय झाला होता. परंतु, हे सरकार कष्टकऱ्यांच्या, शेतकऱ्यांच्या बाबतीत एकही पाऊल पुढे जात नाही. जॅकअप, स्टार्टअप हे मी आताच ऐकले. मला माहिती नाही की, काय स्टार्टअप झाले, कोणासाठी स्टार्टअप झाले. परंतु, एक गोष्ट नक्की सांगतो की, राज्यात कष्टकऱ्यांसाठी, शेतकऱ्यांसाठी काहीही स्टार्टअप झालेले नाही, काहीही डिजीटल झालेले नाही. मेक इन इंडिया, मेक इन महाराष्ट्र याचे काय झाले, हे मला माहीत नाही. परंतु, ज्या कामगारांच्या, कष्टकऱ्यांच्या जीवावर आपण मेक इन महाराष्ट्र केलेला आहे त्यांची तयार असलेल्या घरांसाठी जर अशा प्रकारे परवड होत असेल तर त्याचा मी जाहीरपणे निषेध करु इच्छतो. सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांनी अत्यंत महत्वाच्या विषयावर म.वि.प. नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना दिलेली आहे. सभागृहासमोर असलेले सर्व कामकाज बाजूला सारुन या संदर्भात चर्चा व्हावी. आपण स्टार्टअप इंडिया, रोडमॅप इंडिया, रोडमॅप महाराष्ट्र, रोडमॅप कामगार याबाबत सांगितले तर आम्हाला त्या विषयावर चर्चा करायला आवडेल आणि त्याचा रोडमॅप देखील ऐकायला आवडेल.

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, गिरणी कामगारांच्या संदर्भात.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय.....

सभापती : मुख्यमंत्री महोदय, मी आपल्याला थांबवितो. म.वि.प. नियम 289 अन्वये जी सूचना दिलेली आहे त्यामध्ये सन्माननीय सदस्य श्री.कपील पाटील यांचे देखील नाव आहे. सन्माननीय सदस्य श्री.कपील पाटील यांनी थोडक्यात आपले म्हणणे मांडावे.

श्री.कपील पाटील : सभापती महोदय, आज गिरणी कामगारांनी फक्त मोर्चा काढलेला नाही तर जेलभरो आंदोलन सुरु केलेले आह. घरांचे आश्वासन मिळूनही घरे पदरात पडत नाहीत, म्हणून कामगार वैतागलेले आहेत. एमएमआरडीएची 11 हजार घरे बांधून तयार आहेत. परंतु, सरकार त्या घरांची सोडत काढायला तयार नाही. 10 गिरण्यांच्या जमिनी ताब्यात घेतलेल्या आहेत. परंतु, त्या जागेवर घरांचे बांधकाम सुरु झालेले नाही आणि जी अडीच हजारापेक्षा अधिक घरे बांधलेली आहेत त्या घरांचे वाटप झालेले नाही. मागील वेळी 6 हजार घरे मिळालेली आहेत. त्यावेळी विरोधी पक्षातर्फे मागणी करण्यात येत होती की, सर्व गिरणी कामगारांना घरे देण्यात यावीत. आज ते सत्तेवर आहेत. आता पुन्हा मोर्चा निघणार नाही, अशी अपेक्षा होती. परंतु, मागील वर्षभरात कामगारांच्या तोंडाला केवळ पाने पुसली गेली. त्यामुळे कामगार संपालेले आहेत. दक्षिण मुंबईतील 5 लाख गिरणी कामगारांचे कुटुंबीय हद्दपार झालेले आहेत. त्यांचे मुंबईतच पुनर्वसन झाले पाहिजे. त्यांच्या जिल्ह्यात नाही. त्यांना मुंबईत घरे देणे शक्य आहे. ते देणार की नाही, हा खरा मुद्दा आहे. याबाबत राज्य शासनाने आपली भूमिका स्पष्ट केली पाहिजे आणि आश्वासित केले पाहिजे.

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, गिरणी कामगारांना घरे मिळाली पाहिजेत हीच भूमिका राज्य सरकारने स्वीकारलेली आहे. या संदर्भात सन्माननीय सदस्यांनी मुद्दा उपस्थित केलेला आहे. एमएमआरडीएची घरे आणि मील लँडवरील घरे या संदर्भातील कार्यवाही आपण आता पूर्ण केलेली आहे. एमएमआरडीएच्या घरांच्या संदर्भातील काही कार्यवाही बाकी होती. आपण ती कार्यवाही पूर्ण करुन ती घरे हॅन्डओव्हर करण्याच्या स्टेजला आणलेली आहेत. मागील शासनाने या संदर्भातील किंमत ठरविण्याकरिता मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली समिती नियुक्त केली होती. त्या समितीने गिरणी कामगारांच्या शिष्ट मंडळाबरोबर चर्चा केली. परंतु, समितीने सुचविलेली किंमत आणि गिरणी कामगारांनी मागितलेली किंमत यामध्ये फरक आहे. म्हणून समितीने या

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस.....

संदर्भात राज्य शासनाचे मार्गदर्शन मागितले आहे. आम्ही येत्या 15 दिवसाच्या काळात पुन्हा एकदा चर्चा करुन ती किंमत निश्चित करु. (...अडथळा...) सभापती महोदय, माझे बोलणे पूर्ण झालेले नाही. मी तेच सांगत आहे. मी किंमत सांगितली काय, नाही. किंमत कमी करतो किंवा वाढवितो असे म्हटले काय, नाही. तुम्हीच एक अरेंजमेंट तयार केली आणि त्यानुसार मागील सरकारच्या काळात आपण मुख्य सचिवांच्या समितीला हे अधिकार दिलेले आहेत. आता मुख्य सचिवांच्या समितीने जी कॉस्ट निगोशिएट केली ती त्यांना मान्य नाही. त्यामुळे आता पुन्हा त्यांनी ती कामच्याकडे रेफर केलेली आहे. आम्ही त्यांच्या बरोबर चर्चा करुन त्यांच्या संमतीनेच ती कॉस्ट ठरविणार आहोत. (...अडथळा...) दिड वर्ष वगैरे झालेले नाही. ती घरे ताब्यात केव्हा मिळाली ? ती घरे आता ताब्यात मिळालेली आहेत. ती घरे ताब्यात मिळाल्यानंतरच लॉटरीच्या आणि किंमतीच्या संदर्भात निर्णय घेतलेला आहे. आपण त्यातील 5 हजार घरे निश्चितपणे देऊ शकतो, अशी परिस्थिती आहे. आम्ही त्या घरांच्या संदर्भात येत्या 15 दिवसात किंमत ठरवू आणि त्याची लॉटरी राज्य सरकारच्या वतीने काढण्यात येईल. मी सांगू इच्छितो की, याच्या पलीकडचा काही रोडमॅप तयार झालेला आहे काय, याबाबत मी माहिती घेतलेली आहे. तर कोणताही रोडमॅप तयार केलेला नाही. सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांनी दिड लाख नावे वगैरे सांगितले. परंतु, कोणताही रोडमॅप तयार नाही. फक्त ॲप्लीकेशन मागविलेले आहेत. त्यामध्ये काहीही रोडमॅप तयार नाही. परंतु, राज्य सरकार निश्चितपणे याही संदर्भातील रोडमॅप तयार करीत आहे. आपण जो दिड लाखाचा आकडा सांगितला त्यामध्ये अनेक ड्युप्लीकेशन्स आहेत. त्यामुळे तो आकडा कमी होणार आहे. त्यामुळे ही यादी नीट करणे, आता त्यांच्या हरकती मागवून झालेल्या आहेत आणि आम्ही याचा पुढील रोडमॅप देखील तयार करीत आहोत. गिरणी कामगारांना घरे मिळाली पाहिजेत याकरिता टप्प्याटप्प्याने सन 2029 पर्यंतचा रोडमॅप तयार करुन आम्ही तो मांडू.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

सभापती : ठीक आहे, वरील विषय कामकाज पत्रिकेत समाविष्ट नाही, तसेच सदर विषयाबाबतीत आज सन्माननीय सदस्य श्री.जयवंतराव जाधव यांनी म.वि.प.नियम 93 अन्वये सूचना दिलेली आहे. त्यामुळे विषयाचे गांभीर्य लक्षात घेता सन्माननीय सदस्यांना दोन मिनिटे बोलण्याची संधी दिलेली आहे. आता ही सूचना मी अमान्य करीत आहे.

यानंतर सर्वश्री.शरद रणपिसे, माणिकराव ठाकरे, संजय दत्त आणि इतर यांनी "सिंधुदुर्ग जिल्ह्याधिकाऱ्यांनी पाच पट दंडासह जाचक अटी लावल्याच्या विरोधात सिंधुदूर्ग जिल्ह्यातील डंपरचालकांनी दिनांक 3 मार्च 2016 पासून आंदोलनाला सुरुवात करणे, आंदोलनकर्त्यांवर पोलीस अधिक्षकांनी कारवाई करणे, लाठीचार्ज करणे, सिंधुदुर्गच्या जिल्हाधिकारी यांनी लोकप्रतिनिधी यांना भेटण्यास नकार देणे, जिल्हाधिकारी यांची दडपशाही व पोलिसांच्या विरोधात जनतेत पसरलेला तीव्र असंतोष व त्यामुळे जिल्हाधिकारी व पोलीस अधिक्षक यांच्या विरोधात कारवाई करण्याची होत असलेली मागणी" या विषयाबाबत म.वि.प.नियम 289 अन्वये सूचना दिलेली आहे. महाराष्ट्र विधानपरिषद नियमातील एखादा नियम स्थगित करणे यासंबंधीचा नियम 289 आहे. कोणत्याही सदस्यांस माननीय सभापती यांच्या अनुमतीने कोणताही नियम स्थगित करण्याची सूचना देता येते. यावरुन असे दिसून येते की, प्रश्नोत्तराचा तास व इतर सर्व कामकाज स्थगित करण्यासाठी त्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात असे काम किंवा एखादा विशिष्ट असा प्रस्ताव सभागृहासमोर असणे आवश्यक आहे. वरील विषय कामकाज पत्रिकेत समाविष्ट नाही. त्यामुळे मी सूचना अमान्य करीत असलो तरी विषयाचे गांभीर्य लक्षात घेता सन्माननीय सदस्यांना दोन मिनिटे बोलण्यासाठी वेळ देत आहे.

श्री.शरद रणपिसे: सभापती महोदय, नियम 289 च्या सूचनेवर मला बोलण्याची संधी दिली त्याबाबत मी आपणाला धन्यवाद देतो.

सभापती : सन्माननीय सदस्यांनी आपले म्हणणे थोडक्यात मांडावे, यानंतर दुष्काळाच्या प्रस्तावावर चर्चा सुरु करावी अशी मागणी सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांनी केली आहे.

श्री.शरद रणपिसे : सभापती महोदय, सिंधुदुर्ग जिल्ह्यात जे आंदोलन झाले ते फक्त काँग्रेस पक्षाचे नव्हते. सर्वपक्षीय आंदोलन होते. त्या आंदोलनामध्ये राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष श्री.विठ्ठल डांटस् व माजी मंत्री श्री.प्रविण भोसले यांनी देखील सहभाग घेतला होता हे आंदोलन

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शरद रणपिसे.....

सर्वपक्षीय होते. आंदोलनाचे स्वरूप असे होते की, जांभा दगड, चिरे वाळू किंवा खडी हे छोट्या डंपरने व्यावसायिक वाहून नेतात, या व्यावसायिकांना ज्या अडचणी आल्या त्यासंदर्भात हे आंदोलन सुरु झाले होते. माननीय महसूल मंत्री सभागृहात उपस्थित आहेत. महसूल कायद्यात त्यांनी एक ते पाच पट दंड आकारण्याची दुरुस्ती केलेली आहे. एक ते पाच पट दंड असताना तो सरळसरळ पाच पट करण्यात आलेला आहे. अर्थमंत्री महोदय सभागृहात उपस्थित आहेत. तीन हजार रुपयाचा दंड झाला असेल तर मुख्यमंत्री महोदय काही प्रकरणे अशी आहेत की, छोटा व्यावसायिक किंवा डंपर मालकाला एक लाख रुपयाच्यावर दंड भरावा लागलेला आहे. अशी दंड आकारण्याची सुरुवात सिंधुदुर्ग जिल्ह्यात झालेली आहे. यासंदर्भात निवेदन देण्यात आले होते. सिंधुदुर्ग जिल्ह्यांच्या पालकमंत्री महोदयांनी आज सभागृहात उपस्थित राहायला पाहिजे होते. त्यांना निवेदन देण्यात आलेले आहे. शासनाला निवेदन देण्यात आलेले आहे. जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आलेले आहे. या निवेदनावर शासानाने कोणतीही कार्यवाही केलेली नाही. त्यानंतर 5 मार्च रोजी सर्व आंदोलनकर्त्यांनी आमरण उपोषणाचा निर्णय जाहीर केला व ते उपोषणाला बसले होते. त्यानंतर विधानसभेचे सन्मानीय सदस्य श्री.नितेश राणे यांनी जिल्हाधिकारी यांना फोन केला व सांगितले की, असे-असे घडले आहे मला तुम्हाला भेटावयाचे आहे, तुमच्याशी मला चर्चा करावयाची आहे, तुम्ही मला वेळ द्यावा. जिल्हाधिकारी यांनी वेळ देतो म्हणून सांगितले. त्यानंतर काय घडले मला माहिती नाही. कोणाचा फोन गेला याची मुख्यमंत्री महोदयांनी चौकशी करावी. त्यानंतर जिल्हाधिकारी यांनी लगेच असे कळविले की, मला भेटीसाठी वेळ देता येणार नाही. एवढेच नाही तर डीएसपी यांनी तातडीने रॅपिड ॲक्शन फोर्स पाठविली. रॅपिड ॲक्शन फोर्स पाठविण्याची काय आवश्यकता होती. या प्रश्नामुळे सर्व जिल्ह्यात वनवा पेटला होता. रस्त्यावर हजारो डंपर येऊन उभे राहिले होते. हा प्रश्न गहन व गंभीर आहे हे जिल्हाधिकारी यांना समजत नाही काय ? सन्माननीय सदस्यांना जिल्हाधिकारी यांनी भेटीसाठी वेळ दिली नाही. कोकणातील शेतकरी मोठ्या प्रमाणात सरकारवर नाराज आहे. सरकारने शेतकऱ्यांना काहीही दिले नाही, त्याच्यावर अन्याय चालू आहे. मच्छिमार लोकांची तीच परिस्थिती आहे. छोट्या व्यावसायिकांवर मोठ्या प्रमाणात अन्याय होत चालला आहे हे मी या निमित्ताने सभागृहाच्या निदर्शनास आणून देतो.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शरद रणपिसे....

सभापती महोदय, हा प्रश्न फक्त डंपर व्यावसायिकांपुरता मर्यादित नाही. या डंपरमधून खडी, जांभा दगड व इतर बांधकामाचे साहित्याची वाहतूक केली जाते. या कामावर जे मजूर अवलंबून आहेत त्यांचे पोट कसे भरणार ? हा विचार जिल्हाधिकारी यांनी का केलेला नाही. विशिष्ट वर्गाची ही भावना नव्हती. त्यांची ही संतप्त प्रतिक्रिया नव्हती. गरीब व बांधकाम क्षेत्रात जो गवंडी काम करतो, मजूराचे काम करतो त्या सर्वांवर हा अन्याय आहे. ज्या पध्दतीने पाचपट दंड आकारण्यात येतो, म्हणजे मोगलशाहीमध्ये जसा जिझिया कर होता तसा कर लावण्याचा हा प्रकार झालेला आहे. याची कृपया नोंद घ्यावी असे मी या ठिकाणी सांगू इच्छितो.

सभापती महोदय, या निमित्ताने मी आपणाला व सभागृहाला काही गोष्टी सांगू इच्छितो. माझ्या हातात राज्य शासनाने काढलेले परिपत्रक आहे, 27 जुलै 2015 रोजी सामान्य प्रशासन विभागाने एक परिपत्रक काढले आहे त्यामध्ये असे नमूद केले आहे की, विधिमंडळ सदस्य, संसद सदस्य यांना सन्मानाची व सौजन्यांची वागणूक देणे, त्यांच्याकडे आलेले अर्ज, विनंत्या, निवेदनावर सत्वर कार्यवाही करणे, हे सर्व परिपत्रक मी वाचत नाही यातील फक्त मी संदर्भ वाचत आहे. पुढे असे नमूद केले आहे की, मंत्रालयातील सर्व विभागांना कळविण्यात येते की, या मार्गदर्शक सूचना शासकीय व निमशासकीय कर्मचारी, अधिकारी, अखिल भारतीय सेवेतील अधिकारी, आयएएस व आयपीएस अधिकारी, अशा सर्वांना देण्यात याव्यात. या आदेशाचा भंग केला तर शिस्तभंग प्राधिकाऱ्यामार्फत कडक कारवाई करण्यात येईल हे त्यांच्या निदर्शनास आणले पाहिजे. असा सरकारचा शासन निर्णय आहे.

सभापती महोदय, खासदार, आमदार भेटावयास येते वेळी व भेट संपवून परत जाते वेळी अधिकाऱ्याने उत्थापन देऊन अभिवादन करावे, अधिकाऱ्यांनी उठून उभे राहिले पाहिजे, नमस्कार केला पाहिजे, जातांना देखील उठून उभे राहून नमस्कार केला पाहिजे. विधिमंडळ सदस्य व संसद सदस्य आणि इतर लोकप्रतिनिधी शासकीय कामानिमित्त कार्यालयांना भेट देतील त्यावेळी त्यांना आदराची व सौजन्यपूर्वक वागणूक दिली पाहिजे. त्यांचे म्हणणे शासकीय अधिकारी व कर्मचारी यांनी काळजीपूर्वक ऐकले पाहिजे. असे सर्व या शासन निर्णयात नमूद केले आहे. मुख्यमंत्री महोदय या शासन निर्णयाचे पालन जिल्हाधिकारी व जिल्हा पोलीस अधिक्षक यांनी केलेले नाही. त्यामुळे या शासन निर्णयानुसार जिल्हाधिकारी व जिल्हा पोलीस अधिक्षक यांच्यावर काय कारवाई

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

11-03-2016 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) I-4

VVK/ AKN/ MMP/ प्रथम श्री.बोरले.. 13:20

श्री.शरद रणपिसे....

करण्यात येणार आहे, असा माझा प्रश्न आहे. याबाबत आपण आता विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली समिती नियुक्त केली आहे. याबाबत चौकशी करण्यात येणार आहे. हेच काम पालकमंत्री महोदयांनी अगोदर केले असते तर हा विषय उपस्थित करावा लागला नसता. तुमच्या मंत्री मंडळातील मंत्री काय करीत आहेत. चिक्कीचा घोटाळा झाला तर त्याला उत्तर देण्यासाठी कोणी नाही. जे घोटाळे होत आहेत त्यावर चर्चा होत नाही. मुख्यमंत्री महोदयांनी या प्रश्नांची गंभीर दखल घेऊन कारवाई करावी अशी माझी विनंती आहे. मुख्यमंत्री महोदय विरोधी पक्षात असताना त्यांनी एक सूचना केली होती.

या नंतर श्री.सांगळे..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शरद रणपिसे....

अधिकाऱ्यांचा सी.आर. लिहिला जातो, परंतु त्यांच्या परफॉर्मन्सचे काय ? माझी अशी सूचना आहे की, लोकप्रतिनिधींकडून अधिकाऱ्यांचा परफॉर्मन्स मागवून त्यानंतर त्यांचा सी.आर. लिहिण्याची पध्दत राज्य शासनाने निर्माण केली पाहिजे, त्याशिवाय ते लोकप्रतिनिधींना सौजन्याची वागणूक देणार नाहीत. अधिकारी मंत्र्यांना देत असलेल्या वागणुकीबाबत अनेक मंत्री महोदय आम्हाला सांगत असतात की, आय.ए.एस. अधिकारी आमचे काही ऐकत नाहीत. काही अधिकारी चांगले आहेत. परंतु आय.ए.एस. किंवा आय.पी.एस. अधिकारी झाल्यानंतर ते राज्याचे मालक होत नाहीत. आपण घटनात्मक दृष्ट्या घटनेला बांधिल आहोत. विधिमंडळाचे काम आपण सर्वांनी करावे आणि प्रशासकीय काम त्यांनी करावे. आमदारांचा सन्मान राखला गेला नाही, यामुळे जिल्हाधिकारी आणि डीएसपी यांच्याविरुध्द कोणती कारवाई करणार आहात ? तसेच लोकप्रतिनिधींनी अधिकाऱ्यांच्या परफॉर्मन्सबद्दल संबंधित पालक मंत्र्यांना शिफारस करुन आय.ए.एस. आणि आय.पी.एस. अधिकाऱ्यांचा परफॉर्मन्स रिपोर्ट सी.आर.सोबत लिहिला जाणार आहे का ? या संदर्भात न्यायालयीन प्रक्रिया सुरु असल्यामुळे...

सभापती : आज दिनांक 11 मार्च, 2016 रोजी सर्वश्री धनंजय मुंडे....

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, मला या संदर्भात माझे म्हणणे मांडण्याची संधी द्यावी.

सभापती : सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, मी आता पुढे गेलो आहे. माननीय विरोधी पक्षनेते बोलण्यासाठी उभे आहेत. आपण कृपया खाली बसावे.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, या राज्यात सार्वजनिक विषयासंबंधी आंदोलने होत असतील, त्या आंदोलनात सन्माननीय लोकप्रतिनिधी सहभाग घेत असतील आणि त्या लोकप्रतिनिधींना तेथील जिल्हाधिकारी व जिल्हा पोलीस अधीक्षकांकडून चुकीची वागणूक मिळत असेल, एवढेच नाही तर ते त्यांच्या अधिकारांत सर्व पक्षांच्या लोकप्रतिनिधींना झोडपून काढत असतील, सभापती महोदय, आपण लोकप्रतिनिधी आहात, आम्हीही लोकप्रतिनिधी आहोत. उद्या ही वेळ आमच्यावर येईल. कदाचित आम्ही विरोधी पक्षात बसल्यामुळे आमच्यावर ही वेळ आली आहे. भविष्यात आपण विरोधी पक्षात बसल्यानंतर ही वेळ आपल्यावर सुध्दा येऊ शकते. सन्माननीय सदस्य श्री.शरद रणपिसे यांनी नियम 289 अन्वये यासंबंधी प्रस्ताव आणला व त्यावर चर्चा करणे

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे....

का आवश्यक आहे, याबाबत त्यांनी सदनाला माहिती दिली. सदर घटना कोकणात घडली. भविष्यात राज्यातील कोणत्याही जिल्ह्यात आंदोलनाच्या बाबतीत अशी घटना घडू शकते. अधिकारी एवढे मुजोर होत असतील तर लाखो मतांनी निवडून येणाऱ्या लोकप्रतिनिधींची किंमत होणार नसल्यास काय करायचे या न्यायमंडळाला, आम्ही या न्यायमंडळात कशासाठी यायचे ? आमच्या मतदार संघातील अधिकारी आमची किंमत करणार नसल्यास व ते अधिकारी स्वतःच्या ताकदीवर आंदोलने चिरडून काढत असतील, तसेच लोकप्रतिनिधी त्या आंदोलनात भाग घेत असतील तर लोकप्रतिनिधींना सुध्दा मारायचे. सभापती महोदय, काही गोष्टींची उघडपणे चर्चा झाली नाही. परंतु या प्रकरणी पोलिसांनी लोकप्रतिनिधींना मारहाण केली, ही सत्यता आहे. राज्याचे माननीय मुख्यमंत्री सदनात आहेत. माननीय मुख्यमंत्र्यांनी दोन्ही अधिकाऱ्यांना निलंबित करण्याचा निर्णय घ्यावा व या चर्चेला सुरुवात करावी. हा अतिशय गंभीर विषय आहे. उद्या रस्त्यात येऊन कोणीही आम्हाला मारीन. आज आझाद मैदानावर चार आंदोलने आहेत. आम्ही त्या आंदोलनात भाग घेतला व तेथील अधिकाऱ्यांना वाटले, हे कसे काय आले, सरकारच्या विरोधात आंदोलन करतात. सरकारच्या विरोधात कोणी बोलल्यास त्याला जेलमध्ये टाकले जाते. सत्तेत कोणीही असो, लोकशाहीमध्ये आवाज दाबण्याचा प्रयत्न करणे, ही बाब सत्तेतील माणसाला शोभत नाही. सत्ताधारी व्यवस्थित असतील आणि अधिकारी मुजोरपणा करीत असल्यास लोकप्रतिनिधींचा हक्क अबाधित ठेवायचा असल्यास माझी राज्याच्या मुख्यमंत्र्यांना विनंती आहे की, दोन्ही अधिकाऱ्यांविरुध्द प्रथम कारवाई करावी व या चर्चेला सुरुवात करावी.

सभापती : मी सदर चर्चा अमान्य केली आहे.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, आपण आम्हाला नेहमी न्याय देतात. आपण चेअरवरुन निदेश दिल्यानंतर आम्ही त्याचा सन्मान ठेवतो. परंतु एखादा विषय महत्त्वाचा असल्यास व त्याबाबतीत सदस्य उभे राहून मला बोलू द्यावे अशी आपल्याला विनंती करीत असल्यास त्यावेळी मी नव्हेतर इतर कोणी सन्माननीय सदस्य असल्यास आपण त्यांना बोलण्याची संधी द्यावी, अशी माझी आपल्याला विनंती आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

सभापती : ठीक आहे. आज दिनांक 11 मार्च, 2016 रोजी सर्वश्री धनंजय मुंडे, सुनिल तटकरे, संदिप बाजोरिया, वि.प.स. यांनी सकाळी 10 वाजून 50 वाजता वर्धा जिल्ह्यातील सेलू तालुक्यातील 400 शेतकऱ्यांच्या कापसाची... ...3

11-03-2016 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) J-3

MJS/ AKN/ MMP/ 13:30

अनेक सन्माननीय सदस्य : यापूर्वी उपस्थित केलेल्या विषयाच्या संदर्भात कोणता निर्णय झाला आहे ?

सभापती : मी मघाशी सदर स्थगन प्रस्तावाची सूचना नाकारलेली आहे. मुख्यमंत्री महोदय, या संदर्भात आपल्याला बोलायचे असल्यास आपण बोलावे.

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, झालेला प्रकार अत्यंत गंभीर आहे. आम्ही या संदर्भात तेथील सर्व घटनाक्रम जाणून घेतला आहे. तसेच या संदर्भात विभागीय आयुक्तांना तातडीने अहवाल सादर करण्यास सांगितले आहे. लोकप्रतिनिधींच्या हक्काचे निश्चितपणे रक्षण झाले पाहिजे, तेथील कायदा व सुव्यवस्था राखली गेली पाहिजे. कोणीही आपल्या अधिकारांचा गैरवापर करु नये, असे सरकारचे मत आहे. आम्ही या संबंधी तातडीने अहवाल मागविला आहे. तो अहवाल आल्यानंतर सरकारकडून या संदर्भात तातडीने कार्यवाही केली जाईल.

श्री.सुनिल तटकरे : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी शासनाचे म्हणणे मांडले. मुख्यमंत्री महोदय, हा प्रश्न एका व्यक्तीचा आहे, असे आपण मानण्याचे कारण नाही. सार्वभौम सदनाचे सदस्य होत असताना आपल्याला आपल्या आयुष्यात मोठे योगदान द्यावे लागते. अनेक वेळा टीकाटिप्पणी होत असते. परंतु आपण समाजाकरिता केलेले काम कधी कोणाच्या माध्यमातून पुसले जाऊ शकत नाही. सार्वभौम सदनाच्या सदस्याला जो हक्क आहे, तो राहिलाच पाहिजे. परंतु एखाद्या अधिकाऱ्याने कायद्याचा वेडावाकडा वापर करुन सार्वभौम सदनातील सन्माननीय सदस्यांच्या हक्कावर घाला घालण्याचा प्रयत्न केल्यास आपण सर्वांनी एकत्रितपणे त्याचा मुकाबला केला पाहिजे. त्यावेळी श्री.एकनाथराव खडसे माननीय विरोधी पक्षनेते होते, आपणही होता. औरंगाबाद जिल्ह्यातील एका आमदारांना मारहाण झाल्याबद्दल सर्व पक्षीय सदस्यांनी व विरोधी पक्षाने त्यावेळी कडक भूमिका घेतली होती. माझी माफक अपेक्षा आहे की, आज आपण ही भूमिका घेतल्यास त्यावेळी घेतलेली भूमिका योग्य होती असे निश्चितपणे म्हणता येईल. माझी माननीय मुख्यमंत्र्यांना विनंती आहे की, या संदर्भातील अहवाल पुढील आठवड्यात तातडीने मागवावा. सदर

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

अहवालावर सुध्दा चर्चा झाली पाहिजे. अहवाल दबावाखाली लिहिला जातो किंवा कसे, याबाबतची सत्यता तपासली पाहिजे. त्यात सर्व माहिती येणे आवश्यक आहे. अन्यथा जनतेच्या कोणत्याही

...4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुनिल तटकरे....

प्रश्नांवर लोकप्रतिनिधींना बोलता येणार नाही किंवा त्यांना बोलण्याचा हक्क राहू शकत नाही. यापूर्वी अशी घटना घडली होती, त्यावेळी खडसे साहेब, आपल्या नेतृत्वाखाली विधानसभेचे सर्व सभागृह उभे राहिले होते. त्यावेळी आपण स्वत: तसेच माननीय श्री.देवेंद्र फडणवीस तेथे होता. आज आपण सरकारमध्ये काम करीत आहात. आम्ही आज आपल्याकडून तशीच अपेक्षा करीत आहोत. हा एका घटनेचा प्रश्न नाही. पुढील काळात लोकप्रतिनिधींनी जनतेच्या प्रश्नासाठी उभे रहायचे की नाही, हा मूळ मुद्दा आहे. माननीय मुख्यमंत्री या संदर्भात बोलले आहेत. परंतु या संदर्भात त्यांनी आणखी भाष्य करणे आवश्यक आहे. एका अधिकाऱ्याकडून दुसऱ्या अधिकाऱ्याची चौकशी होत आहे. यामध्ये लोकप्रतिनिधींना सुध्दा नेमावे. अशा प्रकारचा अहवाल सादर करीत असताना काही वेळा काही गोष्टी मुद्दाम डावलण्याची शक्यता नाकारता येत नाही. म्हणून सदनातील दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्य एकत्रित असावे अशी माझी विनंती आहे. याबाबतीत कोणाचे काही म्हणणे असल्यास त्यांनी ते मांडावे.

यानंतर K-1....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, माननीय सभागृह नेते यांनी सांगितले की, ज्यांनी जिल्हाधिकारी कार्यालय फोडले त्याचे समर्थन अजिबात करीत नाही. त्या ठिकाणचे लोकप्रतिनिधी श्री.वैभव नाईक यांना मारहाण झाल्याचे आम्ही दूरदर्शनच्या वाहिनीवर पाहिले आहे. हा प्रकार लांछनास्पद आहे. जिल्हयाचे पोलीस अधीक्षक त्यांना म्हणाले की, 'जास्त बोललास तर गोळया झाडीन'. ही गंभीर बाब आहे. माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे म्हणाले ती गोष्ट खरी आहे. काळ सोकावत आहे. यामध्ये कोणतेही राजकारण नाही. भारतीय जनता पक्ष, शिवसेना पक्ष, राष्ट्रवादी पक्ष व काँग्रेस पक्षाचे नेते व कार्यकर्ते त्या ठिकाणी होते. शिवसेना पक्षाच्या आमदारांना मारहाण झाल्याबद्दल हे सभागृह गंभीर आहे हे आपण दाखवून दिले पाहिजे. जिल्हाधिकाऱ्यांनी कोणते आदेश दिले होते याची मला माहिती नाही. परंतु पोलीस अधीक्षकांनी जी भूमिका घेतली ती चुकीची होती, त्याचे समर्थन आपण करु नये.

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, या कारवाईचे समर्थन बिलकूलच केलेले नाही आणि करण्याचे कारणही नाही. माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांनी या ठिकाणी भावना मांडली आणि माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी देखील मत व्यक्त केले आहे. या घटनेला राजकारणाचा कोणताही गंध नाही. सर्व पक्षाचे लोक तेथे होते. ज्यांना मार लागला त्यात शिवसेना पक्षाचे आमदार श्री.वैभव नाईक व माजी आमदार आणि सध्याचे भारतीय जनता पक्षाचे स्थानिक नेते श्री.राजन तेली हेही आहेत. कोणत्याही पक्षाचा विषय म्हणून सरकार या घटनेकडे पहात नाही. ही संपूर्ण घटना गंभीर आहे. म्हणूनच मी सांगितले की, तातडीने अहवाल मागविण्यात येईल. या पलीकडे जाऊन सांगतो की, अहवालात त्रुटी आढळल्या तर माननीय सदस्यांची त्याबाबत समिती तयार करु यामध्ये कोणालाही पाठीशी घातले जाणार नाही. केवळ एकच गोष्ट मी माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांच्या निदर्शनास आणू इच्छितो. औरंगाबादच्या घटनेमध्ये संपूर्ण सभागृह एक होते, सगळयांचे मत सारखेच होते. परंतु कोणावरही कारवाई झालेली नाही. या प्रकरणी निश्चित कारवाई होईल. या सभागृहाचे जे मत आहे त्या मताचा सन्मान होईल आणि त्यानुसार कार्यवाही केली जाईल.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

सभापती : यानंतर सर्वश्री धनंजय मुंडे, सुनील तटकरे, संदीप बाजोरिया, वि.प.स. यांनी नियम 289 अन्वये "वर्धा जिल्हयातील सेलू तालुक्यातील 400 शेतकऱ्यांची कापसाची 6.40 कोटी रुपयांची रक्कम श्रीकृष्ण जिनिंग प्रेसिंग फॅक्टरी या सेलू येथील फॅक्टरीच्या मालकाने हडप केलेली असणे, सदर रक्कम परत मिळण्यासाठी शेतकरी आंदोलन करुन आमरण उपोषणास बसलेले असतानाही त्याची शासनाने दखल घेतलेली नसणे, उपोषणकर्त्या एका शेतकऱ्याची प्रकृती चिंताजनक होणे, जिनिंग मालक श्री.सुनील टाळाटोळे हे एक राजकीय पक्षाशी संबंधित असल्याने त्यांच्यावर कारवाई होण्यास विलंब होणे, शेतकऱ्यांना त्यांच्या कापसाचे तातडीने चुकारे देऊन या प्रकरणाची चौकशी करुन संबंधितांवर कारवाई करण्याची आवश्यकता" या अतिशय गंभीर व तातडीच्या विषयाबाबत चर्चा करण्यासाठी नियम 289 अन्वये सभागृहाचे कामकाज स्थगित करुन या अतिशय महत्वाच्या विषयावर चर्चा करण्यात यावी अशी सूचना दिलेली आहे.

नियम स्थगित करण्यासंदर्भात मे.कौल आणि शकधर यांच्या प्रॅक्टिस ॲण्ड प्रोसिजर ऑफ पार्लमेंट या ग्रंथात नमूद केल्याप्रमाणे सभागृहाचे सर्व कामकाज बाजूला ठेवण्यासाठी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात एखादा विशिष्ट असा प्रस्ताव सभागृहासमोर असणे आवश्यक आहे व तो विचारात घेण्यासाठी सर्व कामकाज स्थगित करण्यासंदर्भात प्रस्ताव देता येईल. सर्वश्री धनंजय मुंडे, सुनील तटकरे, संदीप बाजोरिया, वि.प.स.यांनी नियम 289 अन्वये उपस्थित केलेला विषय आजच्या दिवसाच्या कामकाज पत्रिकेवर समाविष्ट असलेल्या कोणत्याही बाबीसंबंधात नसल्याने नियम 289 च्या उपरोक्त सूचनेस मी अनुमती नाकारीत आहे.

यानंतर आज दिनांक 11 मार्च, 2016 रोजी माननीय सदस्य ॲड.राहुल नार्वेकर यांनी "दिनांक 9 मार्च, 2016 रोजी मुंबईतील षण्मुखानंद सभागृहात एका पक्षाच्या वर्धापन दिनाच्या कार्यक्रमात त्या पक्षाचे पक्षप्रमुख यांनी चिथावणी वजा भाषण करुन समाजात निर्माण केलेले तणावाचे वातावरण, सदर भाषणात त्यांनी "नव्याने देण्यात येणाऱ्या रिक्षा परवान्यांपैकी 70 टक्के रिक्षा परवाने परप्रांतीयांना देण्यात येणार असल्याने नवीन परवान्याच्या रिक्षा रस्त्यावर दिसल्यास त्यामधील प्रवाशांना उतरवून थेट रिक्षा जाळून टाका, असे आदेश आपल्या कार्यकर्त्यांना देऊन जनमानसात निर्माण केलेली भीती, तसेच "न्यायाधीश म्हणजे मोगलाई नाही, एखाद्या कार्यक्रमाचे

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

सभापती....

होर्डिंग लावले तर हरकत काय", अशी टीका करून न्यायालयाचा केलेला अवमान, समाजामध्ये अशा प्रकारे उघडपणे धमकीचे भाषण करूनही शासनाने अद्यापपर्यंत कोणतीही कारवाई न करणे, तसेच परप्रांतीय संघटनांकडून यावर कारवाईची होत असलेली मागणी परंतु त्याबाबत कोणतीही प्रतिक्रिया देण्यास शासनास आलेले अपयश, भारतीय संविधानानुसार नागरिकांना समान हक्क असून देखील जाहीरपणे असंविधानिक व गुंडगिरीची भाषा सर्रासपणे केली जात असणे, तरी शासनाकडून त्याबाबत कोणतेही ठोस पाऊल न उचलणे वा कोणतीही कार्यवाही न करणे, परिणामी जनतेत जात असलेला चुकीचा संदेश व पसरलेले संतापाचे वातावरण" या अतिशय गंभीर व तातडीच्या विषयाबाबत चर्चा करण्यासाठी नियम 289 अन्वये सभागृहाचे सर्व कामकाज बाजूला करून या अतिशय महत्वाच्या विषयावर चर्चा करण्यात यावी अशी सूचना दिली आहे.

महाराष्ट्र विधानपरिषद नियमातील एखादा नियम स्थगित करण्यासंबंधी नियम 289 आहे. मी सन्माननीय सदस्यांना दोन मिनिटे बोलण्यासाठी अनुमती देत आहे.

ॲड.राहुल नार्वेकर : सभापती महोदय, दोन दिवसांपूर्वी एका राजकीय पक्षाच्या प्रमुखांनी जे भाष्य केले त्यामुळे संपूर्ण मुंबईमध्ये असुरक्षिततेचे वातावरण निर्माण झाले आहे. काल अंधेरी येथे एका रिक्षा जाळण्यात आली. त्यानंतर भारतीय जनता पक्षाच्या आमदारांचे कार्यालय फोडण्यात आले. असे असतानाही सरकारकडून किंवा पोलिसांकडून कोणत्याही प्रकारची कार्यवाही करण्यात आलेली नाही. हे प्रकार हेतुपुरस्सर करण्यात येत आहेत अशी सर्वसामान्य जनतेमध्ये भावना निर्माण झालेली आहे. हे असुरक्षिततेचे वातावरण दूर करण्यासाठी योग्य ती कारवाई तातडीने होणे अपेक्षित होते. पण तसे न झाल्यामुळे समाजात तिढा निर्माण झाला आहे. आयपीसी कलम 153(अ) व सीआरपीसी कलम 151 लागू होतो. आजच्या टाईम्स ऑफ इंडिया या दैनिकामध्ये अनेक कायदे तज्ज्ञांनी याबाबत मत व्यक्त करून हा गुन्हा कसा होतो हे स्पष्ट केले आहे. मात्र पोलिसांकडून कोणतीही कारवाई झालेली नाही. सत्तेत असणाऱ्या पक्षापैकी राजकीय अडचण लक्षात घेऊन ही कारवाई केली जात नाही असा एक समज समाजात पसरत आहे. याबाबत सरकारकडून स्पष्टीकरण होणे अत्यावश्यक आहे. म्हणून माझी विनंती आहे की, या प्रश्नावर सभागृहात चर्चा घेण्यात यावी.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.जनार्दन चांदूरकर : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी अतिशय महत्वाचा विषय सभागृहात मांडला आहे. माझी आपल्याला विनंती आहे की, आपण याबाबत शासनाला आदेश द्यावेत.

सभापती : शासनाने या प्रकरणी लक्ष घालावे.

श्री.देवेंद्र फडणवीस : होय.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी./मु.शी.: नियम 93 अन्वये सूचना

सभापती : आता शुक्रवार, दिनांक 11 मार्च, 2016 रोजी माझ्याकडे प्राप्त झालेल्या नियम 93 अन्वयेच्या सूचनांबाबतचे माझे निर्णय सचिव वाचून दाखवतील.

सचिव : सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांनी "इयत्ता दहावी व बारावीच्या बोर्डाच्या परीक्षेमध्ये अभ्यासक्रमाबाहेरील प्रश्न विचारल्याने विद्यार्थी व शिक्षकांमध्ये गोंधळाची परिस्थिती निर्माण होणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनी "जॉन्सन ॲण्ड जॉन्सन या कंपनीच्या उत्पादनाचे नमुने मुंबई व ठाण्यातून तपासणीसाठी घेण्यात येणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री धनंजय मुंडे, सतीश चव्हाण यांनी "अन्न व औषध प्रशासन विभागाने केंद्र शासनाच्या कायद्यातील तरतुदींचे उल्लंघन करुन विशेष पथकाची स्थापना करण्याचा बेकायदेशीर निर्णय घेणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी "समुद्रात औद्योगिक प्रकल्पाचे प्रदूषण तसेच पर्ससीन नेटसह समुद्रात मासेमारी होत असल्याने मच्छीमार बांधवांवर उपासमारीची वेळ येणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकर यांनी "दिनांक 15 जानेवारी, 2016 रोजी मुंबई ओशिवरा येथील मोक्याच्या ठिकाणी असलेला 2000 चौ.फूट भूखंड एका राजकीय पक्षाच्या लोकप्रतिनिधींना केवळ रु70 हजारात वितरित करण्यात येणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

सचिव.....

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.अनिल भोसले यांनी "पुणे मेट्रो प्रकल्पाबाबत शासनाने निर्णय न घेतल्यामुळे तेथील जनतेने आंदोलन करण्याचा घेतलेला निर्णय" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश गजभिये यांनी "महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाकडे सरासरी 6 ते 8 टक्के वाढ करण्याचा प्रस्ताव महावितरणाने केल्याने विद्युत बिलाचा बोजा सर्वसामान्य नागरिकांवर पडणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.नरेंद्र पाटील यांनी "सुरक्षा रक्षक मंडळ, बृहन्मुंबई आणि ठाणे या नवी मुंबईच्या सानपाडा येथील कार्यालयामध्ये श्री.मोलनकुमार मिश्रा या सुरक्षा रक्षकाने नोकरीचे आमिष दाखवून अनेक तरुणांची केलेली फसवणूक" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

नंतर एल.1...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी. : डान्सबार बंदी कायम ठेवण्यासाठी कायद्यात बदल करणे

मु.शी. : डान्सबार बंदी कायम ठेवण्यासाठी कायद्यात बदल करणे यासंबंधी सर्वश्री धनजंय मुंडे,सतीश चव्हाण, नरेंद्र पाटील,हेमंत टकले, शरद रणपिसे, संजय दत्त, मुझफ्फर हुसैन, भाई जगाप, प्रकाश बिनसाळे, किरण पावसकर, आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर,सर्वश्री ख्वाजा बेग, प्रकाश गजभिये, अनिल भोसले, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.संदीप बाजोरिया, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.धनंजय मुंडे (विरोधी पक्ष नेता) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्यातील डान्सबारवरील बंदी मा.सर्वोच्च न्यायालयाने माहे नोव्हेंबर, 2015 मध्ये वा त्या दरम्यान स्थगिती उठविणे, यापूर्वी बंदी काळातही गृह विभागाच्या समाजसेवा शाखेच्या दुर्लक्षामुळे मुंबईतल्या मुलुंड, भांडुप, चेंबुर, वांद्रे, खार, अंधेरी, मालाड, बोरिवली, दहिसर, पनवेल आदि भागात ऑर्केस्ट्रा बारच्या नावाखाली डान्सबार राजरोस पध्दतीने सुरु असणे, डान्सबार सुरु असल्याने तरुण पिढीवर त्याचा विपरीत परिणाम होणे, राज्यात गुन्हेगारी कारवाया वाढण्याचा धोका निर्माण होऊन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणे, डान्सबार बंदीबाबत मा.सर्वोच्च न्यायालयात राज्य सरकारने भक्कम बाजू न मांडल्यामुळे डान्सबार बंदी कायम न राहिल्याची भावना जनतेमध्ये निर्माण होणे, पुन्हा डान्सबार बंदी करण्यासाठी कायद्यात बदल करण्याची आवश्यकता, ज्या पोलीस ठाण्यांच्या हद्दीत डान्सबार सुरू आहेत त्या पोलीस ठाण्यांच्या अधिकाऱ्यांवर याबाबत शासनाकडून कुठलीही कारवाई होत नसणे, त्यामुळे सरकारला पुन्हा डान्सबार सुरु करायचे आहेत की काय अशी नाराजीची भावना जनतेत निर्माण होणे, पूर्वीप्रमाणेच डान्सबार बंदी कायम ठेवण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." ..2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस (मुख्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

..3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, दहा वर्षापूर्वी राज्याचे तत्कालीन उपमुख्यमंत्री दिवंगत श्री.आर.आर.पाटील यांनी या राज्यातील डान्सबार बंदीवर कायदा आणला आणि या राज्यातील डान्सबार बंद केले. राज्यातील हजारो युवकांना व्यसनाधीन करणारे, शेकडो गरिबांचे कुटुंब उद्ध्वस्त करणारे, नवऱ्याला बायकोचे मंगळसूत्र विकायला भाग पाडणारे, पैशासाठी आईच्या डोक्यात हातोडा मारून तिला ठार मारे पर्यंत तरूण पिढीला गुन्हेगारीपर्यंत नेऊन पोहोचविणारे, गरीब गरजू घरातील मुलींना शरम सोडून पर पुरूषाच्या समोर नाचायला भाग पाडणारे, गुन्हेगारीला खतपाणी घालणारे, गुन्हेगारांचे अड्डे बनणारे, इत्यादी प्रकारचे कायदा व सुव्यवस्थेचे अनेक गंभीर प्रश्न मुंबईत आणि राज्यात डान्सबारमुळे निर्माण झाल्याचे अनेकदा पाहिलेले आहेत. ज्यावेळी या सर्व गोष्टी तत्कालीन उप मुख्यमंत्री दिवंगत श्री.आर.आर.पाटील यांच्या निदर्शनास आल्या त्यावेळी त्यांनी डान्सबार बंदीचा कायदा आणला. तेव्हा दोन्ही सदनातील सर्व पक्षाच्या लोकप्रतिनिधींनी डान्सबार बंदी कायद्याचे स्वागत केले. त्या कायद्याला हायकोर्टात, सुप्रीम कोर्टात आव्हान देण्यात आले. दहा वर्ष कोर्टामध्ये केस सुरू असताना सरकारची बाजू श्री.आर.आर.पाटील यांनी मंत्री या नात्याने भक्कमपणे मांडली. नेमके एका वर्षामध्ये काय झाले हेच लक्षात येत नाही. पुन्हा डान्सबार सुरू करण्यासंबंधी सुप्रीम कोर्टाने आदेश दिले. सुप्रीम कोर्टाच्या आदेशावर मी चर्चा करणार नाही. माझी एकच इच्छा आहे. अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला विरोधी पक्षाच्या पत्रकार परिषदेमध्ये आम्ही मागणी केली होती की, राज्याच्या माननीय मुख्यमंत्र्यांनी विरोधी पक्षाशी आणि सन्माननीय सदस्यांशी चर्चा करून डान्सबार बंदीचा कायदा येत्या 15 एप्रिलच्या आत आणावा. दोन्ही सदनातील आम्ही सर्व सन्माननीय सदस्य या डान्सबार बंदीच्या कायद्याला समर्थन देऊ असे सांगितले आहे. आपण सुप्रीम कोर्टाच्या आदेशाचे पालन केले पाहिजे. त्याचा आदर ठेवला पाहिजे. हा सन्मान, आदर ठेवत असताना या राज्यात डान्सबार सुरू होता कामा नये यासाठी नव्याने कायदा केला पाहिजे. लक्षवेधी सूचनेच्या लेखी उत्तरातून काही गोष्टी समोर आल्या आहेत. कायदा करण्यासंबंधात सरकारकडून विधेयक मांडण्यात येणार आहे. डान्सबारमधील महिला कर्मचाऱ्यांचे शारिरीक व आर्थिक शोषण थांबविणारे विधेयक असणार आहे. म्हणजेच डान्सबारमधील महिलांना किती पैसे मिळाले पाहिजेत हे आता सरकार ठरविणार आहे. यासाठीचे विधेयक येणार असेल तर त्या विधेयकाच्याबाबीत आम्हाला

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे...

विचार करावा लागेल. विधेयक हे डान्सबार बंदीच्या संबंधातील पाहिजे. त्यामुळे या लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून माझा स्पेसिफिक प्रश्न आहे की, 15 तारखेपर्यंत या अधिवेशनात राज्याचे सन्माननीय मुख्यमंत्री डान्सबार बंदीचे विधेयक आणणार आहेत काय, डान्सबार बंदीचा कायदा आणत असताना त्या कायद्यामध्ये कुठल्याही प्रकारची डान्सबार सुरू होण्याची पळवाट नसेल हे शासन पाहणार आहे काय ?

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी एक महत्त्वाची बाब आपल्या समोर मांडली आहे. ज्यावेळी आपण हा कायदा केला त्यावेळी सर्वांनीच त्याला मदत केली आहे. त्यावेळी हा कायदा एकमताने तयार केला होता. त्यावेळी आपण नवीन कायदा तयार केला नव्हता. त्यावेळी आपण महाराष्ट्र पोलीस अधिनियम 1951 मधील कलम 33 (अ), (ब) मध्ये सुधारणा केली व त्याची अंमलबजावणी केली. साधारणत: दिनांक 12.4.2006 रोजी म्हणजे लगेचच सहा महिन्यांमध्ये मुंबई उच्च न्यायालयाने आपण केलेला कायदा रद्दबातल ठरविला. मग आपण सर्वोच्च न्यायालयामध्ये गेलो. सुप्रीम कोर्टाने दिनांक 16.7.2013 रोजी हा कायदा पुन्हा रद्दबातल ठरविला. हा कायदा रद्दबातल ठरविल्यानंतर आपण नेमके काय केले पाहिजे असे पर्याय आपल्या समोर होते. त्यावेळी ॲड.गोपाल सुब्रमण्यम हे देशातील ॲडिशनल सॉलिसीटर जनरल होते. तेच नंतर आपले या केसमधील वकील देखील होते. ॲड.गोपाल सुब्रमण्यम साहेबांना आपण विनंती केली होती की, हा कायदा सर्वोच्च न्यायालयाने रद्दबातल ठरविला असल्यामुळे यासंबंधात रिव्हीजन रिटपिटीशन दाखल करायची की, पुन्हा काही सुधारणा करायची ते सांगावे. त्यांनी आपल्याला कायद्याचे अभिमत दिलेले आहे. त्यातील काही गोष्टी मी आपल्याला वाचून दाखवितो. कारण या सभागृहाला विचारपूर्वक सगळे निर्णय घ्यावे लागणार आहेत. ते म्हणतात की, "Although, I appreciate the sincerity and the sensitivity which propelled Hon'ble Minister Shri R.R. Patil to take forward this Legislative measure, I am sure that he will appreciate upon perusal of the Judgement that the Judgement has carefully considered all aspects, and obviously it is on the basis of,

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

11-03-2016 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) L-5

BGO/ AKN/ MMP/ भोगले... 13:50

श्री.देवेंद्र फडणवीस...

(a) Discriminatory impact of Section 33(b),

(b) Lack of empirical evidence to show the degree of harm,

(c) The lack of ability to show the lesser regulatory measures could have achieve the same purpose that the Court has felt that the provisions were unconstitutional.

The judgment if at all tribute to the entire argument of the State because it has examined all the arguments very closely and has indicated in very settled terms the areas that needs to be addressed."

ते पुढे असे म्हणतात की, "Under the above circumstances recommendation of filing a Review Petition is declined. The State of Maharashtra in the first instance would be well advised to undertake

(a) Dialogue with the stake holders,

(b) Frame a new regulatory framework,

(c) In the event of regulatory framework is unable to deliver ensure that adequate data is collected, and

(d) In the event of cumulative effect of (a), (b) and (c) fails, consider enactment of fresh Legislation."

त्यानंतर आपण आपले ॲडव्होकेट जनरल दारायस खंबाटा यांचा सल्ला घेतला. त्यांनी स्वत: आपल्याला कायद्याचा मसुदा करून पाठविला. त्यांनी आम्हाला असा असा कायदा तयार केला पाहिजे असे सांगितले. आता आपण जी सुधारणा केली आहे ती व्यवहार्य होणार नाही. पण आपण नवीन कायदा न करता पुन्हा कायद्यात सुधारणा करण्याचा निर्णय घेतला आणि पुन्हा आपण त्यांच्याकडे विचारणा केली. त्यावेळी त्यांनी सांगितले की, "The Original Draft prepared by me respect the dance bar judgement and adopted the suggestions of

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

Supreme Court. It was regulatory, progressive and balanced. It recognised the public nuisance and danger some time generated by dance bar and

..6/-

balance regulation improvement of condition under which such establishment could operate. Paramount was the safety and wellbeing of the women who are compelled to seek employment in such establishments. I did not incorporate any moral policing, if moral policing is to be introduced I can suggest several areas of our social, economic and political life where it is more necessary than the dance bars."

त्यांनी आपल्याकडे जो मसुदा पाठविला होता तो आपण स्वीकारला नाही. आपण पुन्हा नव्याने सुधारणा करण्याचे ठरविले व त्या सुधारणा त्यांच्याकडे पाठविल्या. त्यावर त्यांनी पुन्हा आपले मत दिले. त्यात ते असे म्हणतात की, "The new draft exemplifies the growing atmosphere of our nation of intolerance, derogatory and defiance of law. The need of the hour is to protect women not to subjudicate or suppress them.

...M-1

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस....

It is the duty of the State to do the right thing and respect the verdict of Supreme Court. It does not appear to have occurred to the draftsman... त्यांनी आपला ड्राफ्ट केला होता. that what is proposed in the new draft is the in essence, what has already been struck down by the Bombay High Court and Supreme Court. This is not the way the State of Maharashtra, मी हे म्हणत नाही, ते म्हणत आहेत,..of which we are all proud should be drafting a law which is amateurish moral policing आणि त्यानंतर त्यांनी स्पेसिफिकली त्यात लिहीले "Please bring this letter to the attention of Hon. Home Minister Shri R.R.Patil." त्यांनी दिलेला ड्राफ्ट आपण स्वीकारला नाही आणि आपण नवीन ड्राफ्ट तयार केला नाही. आपण पुन्हा एकदा त्याच अमेंडमेंड करण्याचे ठरविले. आपण त्या संदर्भात मंत्रिमंडळाची उप समिती केली. त्या उप समितीने निर्णय घेतला की, जे स्ट्रक डाऊन झाले होते त्यामध्ये फेरबदल करुन मुंबई पोलीस ॲक्टमध्ये बदल करावा. मला आठवते की, श्री.आर.आर.पाटील यांनी मला बोलावून सांगितले की, यामध्ये खूप अडचणी आहेत. ही बंदी असली पाहिजे असे आपल्या सभागृहाचे एकमत आहे. तेव्हा आम्ही असे असे प्रपोज करीत आहोत त्याला आपण समर्थन द्यावे. आम्ही त्यास एका पावलावर समर्थन दिले. आम्ही त्याबाबत मागे गेलो नाही. या प्रकरणामध्ये ॲडव्होकेट जनरल यांनी वेगळा सल्ला दिलेला आहे असे आम्ही त्यांना सांगितले नाही. देशाचे सॉलीसिटर जनरल आणि राज्याचे ॲडव्होकेट जनरल या दोघांचे असे मत होते की, आपण अशाप्रकारची अमेंडमेंड आणून बंदी आणू शकत नाही. आपल्याला रेग्युलेटरी ॲक्ट करावा लागेल. आपण दारुबंदी म्हणतो त्यावेळी प्रोहीबिशनचा कायदा तयार करतो. आपण त्यामध्ये रेग्युलेटरी फ्रेमवर्क तयार करतो. त्यांचे असे म्हणणे होते की, नवीन रेग्युलटरी कायदा तयार केला तरच यावर बंदी आणता येईल.

सभापती महोदय, सर्वोच्च न्यायालयाने दुसऱ्यांदा स्ट्रक डाऊन केल्यानंतर या सभागृहातील आणि राज्यातील 99.99 टक्के लोकांना डान्सबार सुरु होऊ नयेत असे वाटते तर फक्त ज्यांचे डान्सबार आहेत त्या अर्धा टक्का लोकांना ते सुरु व्हावेत असे वाटते. डान्सबार सुरु होऊ नयेत

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस....

नयेत आणि "to shame people" असा काही तरी मार्ग काढला तर लोक डान्सबारमध्ये जाणार नाहीत म्हणून आपण 22 कंडीशन्स टाकल्या. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचे पालनही होईल आणि कोणी डान्सबार सुरु करु शकणार नाही यासाठी खूप सल्लामसलत करुन वकिलांशी चर्चा करुन या अटी तयार केल्या होत्या. आपल्या ज्या अटी होत्या त्यामध्ये बारच्या आत सीसीटीव्ही कॅमेरे बसविले पाहिजेत अशी एक अट होतीत. त्यामुळे आपल्याकडे कोणतीच ॲप्लीकेशन्स आली नाहीत. परंतु ती अट सर्वोच्च न्यायालयात चॅलेंज झाली. सर्वोच्च न्यायालयाने 22 अटींपैकी 7 अटींवर आक्षेप घेतला. आपण खूप स्ट्रॉन्गली कॉन्टेस्ट केले. आपण ॲड.हरीष साळवे सारखे वकील नेमले होते. आपण न्यायालयात चांगल्या प्रकारे कॉन्टेस्ट केल्यामुळे आपल्या सहा ऑडर्स मान्य करण्यात आल्या. आपण नॉन ट्रान्सफरन्स सेपरेशन असावे असे म्हटले होते. परंतु आपणास नॉन ट्रान्सफरन्स ठेवता येणार नाही असे सांगण्यात आले. आपणास केज तयार करता येणार नाही,कोणालाही जेलमध्ये ठेवता येणार नाही. ते त्यांनी स्ट्रकडाऊन केले.

सभापती महोदय, बार आणि परफॉर्मन्स एरिया हे दोन्ही पूर्ण सेपरेट असले पाहिजेत असे आपण म्हटले होते. ते न्यायालयाने मान्य केले. पण न्यायालयाने असे सांगितले की, महिलांना ग्रीन रुम दिली पाहिजे. आपण सांगितले होते की, there shall not be any cavity म्हणजे जागाच असू नये. न्यायालयाने सांगितले की, किमान त्या महिलांकरिता ग्रीनरुम दिली पाहिजे. आपला शेवटचा मुद्दा स्ट्रकडाऊन केला. न्यायालयाने सांगितले की, आतमध्ये कॅमेरे लावता येणार नाहीत, आपणास दरवाज्यावर कॅमेरे लावावे लागतील. शेवटी सर्वोच्च न्यायालयाने जे शब्दप्रयोग वापरले ते मला येथे सांगायचे आहेत. आपण कायदेमंडळ आहोत. आपणास न्यायालयाशी भांडण करायचे नाही. पण आपले अधिकार देखील महत्वाचे आहेत. सर्वोच्च न्यायालयाने शेवटी असे म्हटले आहे की, "We are sure that the Authorities shall act in accordance with the command of this court and not venture to deviate." इतकी स्ट्रॉंग वर्डेड ऑर्डर त्यांनी दिली आहे. आपल्या सर्वांची इच्छा आहे की, डान्सबार सुरु होऊ नयेत. राज्य सरकारची देखील तीच इच्छा आहे. डान्सबार सुरु होऊ नयेत आणि आमची पिढी अडचणीत येऊ नये.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस....

त्यावेळच्या सॉलीसीटर जनरल आणि ॲडव्होकेट जनरल यांनी जो ड्राफ्ट तयार करुन दिला होता त्याचा आणि इतर बाबींचा परामर्ष घेऊन आणि आताच्या ॲडव्होकेट जनरल यांचा सल्ला घेऊन आपण एक ड्राफ्ट तयार केला आहे. माझी अशी इच्छा आहे की, दोन्ही सभागृहातील नेत्यांची एक समिती गठीत करावी. ती समिती दोन दिवसांत त्या ड्राफ्टचा परामर्ष घेऊ शकते. फार काळ लागणार नाही. आपले अधिवेशन मोठे आहे.मी पुन्हा एकदा सांगतो की, आपणास यावर रेग्युलेशन करायचे असेल तर भावनेत जाऊन चालणार नाही. आता लढाई कायद्याची आहे आणि कायद्याची लढाई कायद्याने लढावी लागेल. त्यामुळे संविधान आणि सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशातून मार्ग काढून आपल्या सभागृहाची जी इच्छा आहे, ती आपणास पूर्ण करावी लागेल आणि हे केले पाहिजे या मताचा मी आहे. याच अधिवेशनामध्ये हा कायदा मंजूर केला पाहिजे असे माझे मत आहे. मी खालच्या सभागृहात देखील विनंती करणार आहे की, त्या सभागृहाचे सदस्य आणि या सभागृहाचे सदस्य यांची एक समिती तयार करावी. हा कायदा खूप मोठा नाही. तीन ते पाच दिवसांच्या आत त्या कायद्याचा परामर्ष समिती घेऊ शकते. आपणास आवश्यक वाटेल तेव्हा ॲडव्होकट जनरल यांना देखील आपण बोलावू शकतो आणि त्या संदर्भातील कार्यवाही करु शकतो. कै.आर.आर.पाटील यांच्या हेतूबद्दल कधीच कोणी शंका घेतली नाही आणि तशी शंका घेतली जाऊ शकत नाही. तशाचप्रकारे आमच्या हेतूबद्दल देखील शंका घेऊ नका अशी विनंती आहे. या विषयावर सभागृहाने योग्य कायदा आणला तर ती के.आर.आर.पाटील यांना खरी श्रद्धांजली असेल. या ठिकाणी योग्य कायदा आणून राज्यामध्ये जी काही प्रवृत्ती आहे ती आपणास मोडून काढता येईल.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, एक अतिशय संवेदशनील आणि गंभीर विषय आहे. कायद्याच्या कचाटयात सापडलेला आपला कायदा पुनर्जीवित करीत असताना कोणत्या प्रकारची काळजी घेतली पाहिजे याबाबत माननीय मुख्यमंत्र्यांनी निवेदन केले आणि त्यांचे निवेदन आम्हाला पूर्णत: मान्य आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी येथे दोन-तीन गोष्टींचा उल्लेख केला. समजा आपण आयपीसीमधील सेक्शन 33 (बी) असेल किंवा तत्सम दुसरा सेक्शन असेल त्याला अनुसरुन

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.भाई जगताप....

अमेंडमेड करण्याचा प्रयत्न केला म्हणूनच कदाचित सर्वोच्च न्यायालयाने शेवटच्या वाक्यामध्ये स्ट्रॉंग वर्डेड ऑडर्र दिली असण्याची शक्यता आहे. यामधून दोन गोष्टी ध्वनित होतात.

यानंतर श्री.बोर्डे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.भाई जगताप....

एकतर या कायदे मंडळाने कोणता कायदा करावा या बाबतचे डायरेक्शन सर्वोच्च न्यायालय देऊ शकणार नाही. हा पूर्णत: विधिमंडळ आणि कायदे मंडळाचा अधिकार आहे. परंतु कदाचित कलम 33 (बी) किंवा तत्सम कलमाला अमेंडमेंड करण्याचा प्रयत्न केल्यामुळेच त्यांना ही संधी मिळाली असावी असा माझा स्वत:चा समज आहे. हे करीत असताना न्यू रेग्युलेटरी फ्रेमवर्क करण्यासंदर्भात कोणत्याही प्रकारचे बंधन येऊ शकत नाही. कारण तो आपला अधिकार आहे. वास्तविक पाहता लक्षवेधी सूचनेवर चर्चा करताना प्रश्नोत्तरे होत असतात. परंतु माननीय मुख्यमंत्र्यांनी लक्षवेधी सूचनेला उत्तर देताना निवेदन केले. त्यांनी केलेले निवेदन हे अतिशय योग्य, सुयोग्य आणि वस्तुस्थितीला धरून होते, हे मला मनापासून सांगावेसे वाटते. हे करीत असताना नवीन कायदाच तयार करण्याचे आपण जे तत्त्व मान्य केले आहे ते खरोखरच आवश्यक आहे. यामध्ये सर्वोच्च न्यायालयाचा अवमान होण्याचे काहीही कारण नाही. कारण आपले विधिमंडळ हे कायदे मंडळ आहे आणि या कायदे मंडळाला पूर्ण अधिकार क्षेत्र आहे. दोन्ही सभागृहाच्या सन्माननीय सदस्यांची समिती गठीत केल्यानंतर ते या विषयाचा अभ्यास करण्यासाठी एकत्रित चर्चा करतील.

सभापती : मी सन्माननीय सदस्यांना सांगतो की, माननीय मुख्यमंत्र्यांनी इच्छा व्यक्त केली आहे. त्यामुळे पुढच्या आठवड्यात समिती गठीत करून, त्यापुढील आठवड्यात या विषयी कायदा करु या.

श्री.भाई जगताप : महोदय, या कायद्याची फ्रेमवर्क तयार करीत असताना ॲडव्होकेट जनरल यांचे आणि सर्वोच्च न्यायालयाचे मत घ्यावयास पाहिजे. कारण अगोदर सर्व प्रक्रियेतून जाऊन सुध्दा सर्वोच्च न्यायालयाने आपला कायदा स्टक डाऊन केला आहे. त्यामुळे ही बाब लक्षात घेऊन सन्माननीय सदस्य दोन-तीन दिवसात कायदा वाचतील. त्यामुळे मी सांगितल्यानुसार दोघांचे मत घेऊन या विधेयकाचा गोषवारा तयार करण्याच्या दृष्टीने पावले उचलावीत अशी माझी विनंती आहे. सभापती महोदय, डान्सबार बंदीच्या कायद्याबाबत बरेच बोलले आणि ऐकले गेले. माननीय मुख्यमंत्र्यांनी या बाबत जी क्रुनॉलॉजी सांगितली ती वस्तुस्थिती आहे. या माध्यमातून हे दाखविण्याची गरज आहे की, राज्याच्या विधिमंडळाला या विषयी पूर्णत: अधिकार आहे आणि

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.भाई जगताप....

आमच्या घटनेने आम्हाला आमचे कायदे करण्याचा अधिकार दिला आहे. त्यामुळे अशा प्रकारचा मेसेज देणे आवश्यक आहे.

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, या विषयी आर.आर.पाटील फाऊंडेशनच्या वतीने सर्वोच्च न्यायालयात इंटरव्हेन्शन करण्यात आले होते. आर.आर.पाटील फाऊंडेशनचे प्रमुख श्री.विनोद पाटील आहेत. परंतु त्यांना फोनवरून सातत्याने धमक्यांचे मेसेज येत आहेत. त्यांना फोनवर मेसेजच्या माध्यमातून आलेल्या धमक्यांची प्रिंट आऊट आम्ही 12 सन्माननीय सदस्यांनी माननीय मंत्र्यांना दिली होती. त्या माध्यमातून आम्ही विनंती केली होती की, श्री.विनोद पाटील यांना पोलीस संरक्षण देणे गरजेचे आहे. माननीय मंत्र्यांनी खाली आदेश देऊन सुध्दा अजूनपर्यंत या विषयी निर्णय झालेला नाही. त्यांना दररोज तुझे देखा जाएगा, तू कहां है, अशा आशयाच्या धमकीचा मेसेज येत आहे. या माध्यमातून मी माननीय मुख्यमंत्र्यांकडे विनंती करतो की, आर.आर.फाऊंडेशनचे प्रमुख श्री.विनोद पाटील यांना तातडीने पोलीस संरक्षण द्यावे.

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, या विषयी तातडीने माहिती घेण्यात येईल आणि त्यांना जे काही पोलीस संरक्षण पुरविण्याची आवश्यकता आहे त्याची काळजी घेण्यात येईल.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी. : पर्ससीन जाळ्यांमुळे पारंपरिक मच्छीमार व्यवसाय धोक्यात आल्यामुळे पर्ससीन जाळ्यांवर बंदी घालण्याची आवश्यकता

मु.शी. : पर्ससीन जाळ्यांमुळे पारंपरिक मच्छीमार व्यवसाय धोक्यात आल्यामुळे पर्ससीन जाळ्यांवर बंदी घालण्याची आवश्यकता, या संबंधी सर्वश्री शरद रणपिसे, संजय दत्त, मुझफ्फर हुसैन सय्यद, अशोक उर्फ भाई जगताप, ॲड.हुस्नबानू खलिफे, प्रा.जनार्दन चांदूरकर, प्रा.जोगेंद्र कवाडे, सर्वश्री आनंद ठाकूर, नरेंद्र पाटील, हेमंत टकले, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.ख्वाजा बेग, श्रीमती विद्या चव्हाण, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री.शरद रणपिसे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मत्स्यव्यवसाय मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"महाराष्ट्राच्या कोकण किनारपट्टीच्या भागात सुमारे 30 लाख लोक प्रत्यक्षात मासेमारीच्या व्यवसायात असून मासेमारीच्या अनुषंगिक व्यवसायात जवळपास 45 लाख लोक असणे, गेल्या काही वर्षापासून विविध कारणांनी मासेमारीचा व्यवसाय अडचणीत सापडलेला असणे, पर्ससीन जाळ्यामुळे पारंपरिक मच्छीमार धोक्यात येणे, त्यामुळे पर्ससीन जाळ्यांवर बंदी घालण्याची आवश्यकता, या व्यवसायाशी संबंधित पर्ससीन नेटचा अभ्यास करण्यासाठी राज्य शासनाने नियुक्त केलेल्या डॉ.सोमवंशी आणि डॉ.विनय देशमुख समितीने सन २०१२ मध्ये सादर केलेला अहवाल व त्यावर सुयोग्य असा निर्णय घेऊन मच्छीमार व्यावसायिकांना दिलासा देण्याची आवश्यकता, या व्यवसायाला सुमारे 70 टक्के परप्रांतिय मच्छीमारांचे झालेले अतिक्रमण, त्याकडे होत असलेले दुर्लक्ष, अनधिकृत मच्छीमारी, राज्यातील सागरी मच्छीमारी व गोड्या पाण्यातील मासेमारी व्यवसाय वृद्धींगत व्हावा, पारंपरिक मासेमारीला संरक्षण मिळावे पारंपरिक मच्छीमारी करणाऱ्या मच्छीमारांच्या आर्थिक प्रश्नांची तात्काळ सोडवणूक करण्याची गरज, तसेच या व्यवसायात रोजगाराच्या संधी निर्माण व्हाव्यात यासाठी तातडीने विचार करुन सर्वंकष धोरण आखण्याची गरज व यावर शासनाची प्रतिक्रिया."

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.एकनाथराव खडसे (मत्स्यव्यवसाय मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शरद रणपिसे : सभापती महोदय, पारंपरिक पध्दतीने मासेमारी करणाऱ्यांचा आणि पर्ससीन जाळ्यांमुळे मासेमारी करणाऱ्यांचा प्रश्न बऱ्याच काळापासून प्रलंबित आहे. शासनाने या संदर्भात डॉ.व्ही.एस.सोमवंशी समिती गठीत केली होती. त्या समितीने अहवाल सादर केल्यानंतर राज्य शासनाने त्या समितीच्या शिफारशी सुध्दा स्वीकारलेल्या आहेत. तसेच त्या अनुषंगाने काही आदेश सुध्दा निर्गमित केले आहेत. हे सर्व केल्यानंतर सुध्दा पारंपरिक मासेमारी करणाऱ्यांना संरक्षण आहे असे त्यांना वाटत नाही, किंबहुना त्यांच्या व्यवसायाला संरक्षण आहे असे वाटत नाही. या निमित्ताने मी विचारु इच्छितो की, राज्य सरकार पारंपरिक मासेमारीला संरक्षण देण्याच्या दृष्टीने आणखी काही सुधारित धोरण करणार आहे काय ?

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, गेल्या काही वर्षांपासून पर्ससीन नेट मासेमारीवर बंदी घालावी अशी मागणी पारंपरिक मासेमारी करणाऱ्यांकडून येत होती. मध्यंतरीच्या कालखंडात या संदर्भातील निर्णय घेण्यासाठी राज्य सरकारने डॉ.सोमवंशी समितीची नेमणूक केली होती. त्या तज्ज्ञ समितीचा अहवाल मागच्या वर्षी प्राप्त झाला. त्या अहवालातील शिफारशींवर काय कार्यवाही करावी याची छाननी राज्य सरकारच्या माध्यमातून करण्यात आली. पारंपरिक मासेमारीचा व्यवसाय करणाऱ्यांनी सोमवंशी समितीच्या अहवालातील शिफारशी जशाच्या तशा स्वीकाराव्यात अशा प्रकारची मागणी केली. तसेच पर्सनेट मासेमारी करणाऱ्यांनी सुध्दा डॉ.सोमवंशी समितीच्या अहवालातील शिफारशी स्वीकारण्यास त्या कालखंडात पाठिंबा दिला होता. त्यानुसार राज्य सरकारने त्या समितीच्या शिफारशी जशाच्या तशा स्वीकारल्या व त्यानुसार कार्यवाही करण्यास सुरुवात केली. राज्यामध्ये पारंपरिक मासेमारी व्यवसाय करणाऱ्यांची संख्या जवळपास 80 टक्क्यांच्या वर आहे. राज्यभरात समुद्रकिनाऱ्यावर प्रामुख्याने पर्सनेटच्या माध्यमातून मासेमारी करणाऱ्या 425 व्यक्तींना परवाने दिले आहेत. या व्यवसायावर अवलंबून असणारे हे लोक आहेत. वास्तविक पाहता यामध्ये दोन बाजू आहेत. पारंपरिक व्यवसाय करणाऱ्यांची मागणी आहे की, पर्सनेटने मासेमारी करण्यास परवानगी देऊ नये. परंतु पर्सनेटने मासेमारी करणाऱ्यांचे म्हणणे आहे की, डॉ.सोमवंशी समितीने आपल्या अहवालात डिसेंबरच्या शेवटपर्यंत पर्सनेटने मासेमारी करण्यास परवानगी दिलेली आहे. परंतु आम्हाला जून महिन्यापर्यंत मासेमारी करण्याची परवानगी द्यावी

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

अशी त्यांची मागणी आहे. महोदय, सोमवंशी समितीने डिसेंबर महिन्याच्या शेवटपर्यंत यासाठी

श्री.एकनाथराव खडसे....

परवानगी दिली होती की, बांगडा आणि तारली या जातीचे मासे डिसेंबरच्या शेवटपर्यंत समुद्रात असतात आणि त्यानंतर ते तेथून अन्यत्र स्थलांतरित होतात. त्यामुळे अशा स्वरूपाची मासेमारी करीत असताना त्यांना नंतरच्या काळात मासेमारी करण्याची परवानगी देण्याची आवश्यकता नाही अशी डॉ.सोमवंशी समितीने शिफारस केल्यामुळे पर्सनेट पध्दतीच्या मासेमारीवर डिसेंबरच्या पुढे बंदी घातली. परंतु पर्सनेटने मासेमारी करणाऱ्यांकडून मागणी आली की, ही मुदत दोन-तीन महिने वाढवून द्यावी. त्यांचे म्हणणे आहे की, आमचा रोजगार मोठ्या प्रमाणावर यावर अवलंबून आहे. राज्य सरकारने सांगितले की, येत्या 8 दिवसांत पुन्हा या संदर्भातील माहिती घेऊ आणि आवश्यकता असल्यास त्यासंदर्भात मुदतवाढ दिल्यानंतर काय परिणाम होतात, या बाबतची तपासणी करून निर्णय घेण्यात येईल. कोणत्याही परिस्थितीत पारंपरिक व्यवसाय करणाऱ्यांना धक्का लागता कामा नये ही राज्य सरकारची भूमिका आहे.

ॲड.राहुल नार्वेकर : सभापती महोदय, डॉ.सोमवंशी समितीने आपला अहवाल सादर केला आहे. त्यांचे ज्युरिसडीक्शन टेरीटोरीयल वॉटर्सबद्दल स्टडी करून त्याचा फिशींगवर किती इम्पॅक्ट होतो हे शोधून काढणे हा होता. एवढ्यापुरतीच ही बाब मर्यादित होती. टेरीटोरीयल वॉटर हे 12 नॉटीकल माईल्सपर्यंत असते. 12 नॉटीकल माईल्सच्या बाहेर राज्य सरकारचे ज्युरिसडीक्शन नसते. टेरीटोरीयल वॉटरच्या बाहेर इतर राज्यातील मत्सव्यवसायातील लोक फिशींगसाठी जातात. टेरीटोरीयल वॉटरच्या बाहेर मायग्रेटरी फिशींग होते. म्हणजे परदेशातून थंडीच्या काळात तिवना सारखे मासे आपल्या देशाच्या पाण्यात येतात आणि त्या माशांचे फिशींग केले जाते. या माशांचे फिशींग केले नाही तर ते मासे सिझननंतर निघून जातात. त्यामुळे केंद्र शासनाने टेरीटोरीयल वॉटरच्या बाहेर पर्सनेट फिशींगवर कोणतेही बंधन आणलेले नाही. असे असताना आज या टेरीटोरीयल वॉटरच्या बाहेर पर्सनेट फिशींग होते त्यावर सुध्दा बंदी आणली आहे. त्यामुळे मी स्पेसिफिक विचारतो की यावर शासन काय कार्यवाही करणार आहे आणि पर्सनेट डीप वॉटर फिशींगसाठी कोणत्या प्रकारचा रिलीफ देणार आहे ?

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ओ....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. एकनाथराव खडसे : सभापती महोदय, शासनाला 12 नॉटिकल मैलापर्यंत मासेमारीच्या संदर्भातील नियमन करण्याचे अधिकार आहेत. 12 नॉटिकल मैलापुढे केंद्र सरकारच्या अखत्यारित येते. त्याचे कुशन आहे. आंतरराष्ट्रीय व केंद्र सरकार यामधील जो पट्टा आहे, त्यामध्ये मासेमारी करण्यासंदर्भात आजही त्यांच्यावर निर्बंध घालण्यात आलेले नाहीत. परंतु आवश्यक बाबींची केंद्र सरकारकडून त्यांनी परवानगी घेणे या संदर्भातील बाबी त्यांनी पूर्ण करायच्या आहेत. आपल्याकडील पारंपरिक मासेमारीचा व्यवसाय करणारे लहान आहेत, त्यांच्याकडे लहन बोटी आहेत, त्यांच्याकडे एवढ्या स्पीड बोटी नाहीत की ज्यांच्या सहाय्याने ते 12 नॉटिकल माईलच्या पुढे जाऊन मासेमारी करू शकतील. त्यांचे म्हणणे असे आहे की, 12 नॉटिकल माईलच्या आतमध्ये जर आता पर्सनेटवाल्यांनी मासेमारी केली तर मग मोठ्या प्रमाणावर मासे त्यांच्याकडे जातात आणि छोटे पारंपरिक व्यवसाय करणारे आहेत त्यांना माशांचे प्रमाण कमी मिळते. पर्सनेट मासेमारी करणारे आहेत त्यांना डिसेंबरपर्यंत येथे परवानगी दिलेलीच आहे. मघाशी मी सांगितले की, 3-4 जातींचे मासे जसे की, तार्ली, बांगडा यांच्या संदर्भात वस्तुस्थिती आहे की, हे मासे डिसेंबरपर्यंत तेथे असतात आणि नंतर ते वेगाने स्थलांतरित होतात. हा एक भाग आहे. दुसरा भाग असा आहे की, या कालखंडात अशा मासेमारीला मोठ्या प्रमाणावर परवानगी दिली तर माशांची प्रजनन क्षमता कमी होते. माशांची छोटी पिल्ले आणि अंडी सुध्दा पर्सनेटमध्ये येत असल्यामुळे नंतर ती अंडी आणि पिल्ले बाहेर फेकतात असा आजवरचा अनुभव आहे. इतक्या मोठ्या प्रमाणात ते लहान मासे म्हणजे छोटी पिल्ले व अंडी बाहेर जातात की, माशांचा दुष्काळ पडेल की काय अशी स्थिती आहे. मागच्या कालखंडापेक्षा यावेळी 4-5 वर्षांचा अनुभव पाहिला तर पूर्वीइतके मासे आता समुद्रात राहिलेले नाहीत असे वारंवार वेगवेगळ्या समितीने रिपोर्ट दिले आहेत. त्यामुळे येथे माशांची प्रजनन क्षमता राहिली पाहिजे, माशांचा व्यवसायही चालला पाहिजे, म्हणून यावर काही नियमन करण्याच्या संदर्भात शासनने भूमिका घेतली आहे. 12 नॉटिकल माईलपुढे जाऊन मासेमारी करण्याच्या संदर्भात शासन विचार करीत आहे. मी मघाशीही सांगितले आहे. परंतु शासनाने हा विचार केला काय किंवा केला नाही काय, तो आमचा अधिकार नाही. त्यामुळे या संदर्भात त्यांनी केंद्र सरकारकडे जावे, केंद्र सरकारकडे जात असताना, शासन त्यांना आवश्यकता असेल तर मदत करेल.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

11-03-2016 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) O.2

MSK/ KTG/ AKN/ 14:20

श्री. राहुल नार्वेकर : सभापती महोदय, केंद्र सरकारने डीप वॉटर फिशिंगसाठी कोणतेही बंधन टाकलेले नाही. शासनाचे तर डीप वॉटर फिशिंगसाठी नियम करण्यासाठी ज्युरिसडिक्शनच येत नाही. आज जेव्हा हे पर्सनेट डीप वॉटर फिशिंगसाठी जातात, त्यावरही त्यांच्यावर रोख टाकली जाते. गेले 6 महिने ससून डॉक बंद आहे, जेथे डीप वॉटर फिशिंगसाठी पर्सनेट फिशिंग करणाऱ्यांवर बंदी टाकली गेली आहे. हे गैरकानुनी आहे. हे ॲब्सोल्युटली अनकॉल्ड फॉर आहे, अनवॉरंटेड आहे. त्यामुळे शासनाने त्वरित आदेश द्यावेत की, फिशिंगसाठी डीप वॉटरमध्ये जाणारे पर्सनेट यांच्यावर कोणत्याही प्रकारची बंदी टाकू नये. अधिकाऱ्यांचे असे म्हणणे आहे की, या बोटी जातात, मात्र त्या डीप वॉटर फिशिंगसाठी जातात की टेरिटोरियल वॉटरमध्ये फिशिंग करतात हे आम्हाला समजत नाही म्हणून आम्ही बंदी घातली आहे. तुम्हाला समजत नसेल तर तुम्ही त्याची उपाययोजना करा. उपाययोजना नाही म्हणून बंदी घालणे हे अनकॉन्स्टिट्युशनल आहे, अनवॉरंटेड आहे. त्यामुळे शासनाने यावर त्वरित योग्य ती कार्यवाही करावी.

श्री. एकनाथराव खडसे : सभापती महोदय, 12 नॉटिकल माईलच्या पुढे डीप सीमध्ये जायचे असेल तर मघाशी मी संगितले की, केंद्र सरकारकडून एलओपीची परवानगी घ्यावी आणि त्यांनी जावे याबद्दल वाद नाही. ही गोष्ट खरी आहे की, नेमके ते 12 नॉटिकल माईलच्या पुढे आहेत की आत आहेत हे समजण्यास मार्ग नाही. शासनाचा विचार आहे की, बोट ओळखण्याच्या दृष्टीकोनातून त्याला व्हीटीएमएसची सिस्टिम किंवा जीपीएस सिस्टिम बाहेरच्या बाजूला लावतो त्याप्रमाणे एआयसीची सिस्टिम आहे, जी आयडेंटिफाय करू शकेल की, आता नेमकी ही बोट कुठे आहे, 12 नॉटिकल माईलच्या आत आहे की बाहेर आहे, असे काही करून त्यावर नियंत्रण आणता येईल का याचा अभ्यास करावा. शासन याचा अभ्यास करीत आहे. पर्सनेटच्या संदर्भात बोटींचे रंग बदलविणे, त्यांना दिलेला ध्वज एकसारखा करणे जेणेकरून लांबून सुध्दा दुर्बिणीने पाहता आले पाहिजे की ही पर्सनेटची बोट आहे किंवा बिगर पर्सनेटची बोट आहे याचा विचार करीत आहे. नेमका एक रंग त्यांना आयडेंटिफाय करण्यासाठी देणे आहे. आपल्याला त्यामुळे समजेल की, अमुक रंगाची पर्सनेटची बोट आहे. दुसरे असे की, त्याला जीपीएससारखी एआयएसची सिस्टिम

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

11-03-2016 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) O.3

MSK/ KTG/ AKN/ 14:20

श्री. एकनाथराव खडसे ....

बसविणे हा एक भाग आहे, जेणेकरून ती कुठेही गेली तर आमच्या यंत्रावर दिसली पाहिजे की, ही बोट येथे आहे, 12 नॉटिकल माईलच्यावर आहे की खाली आहे. आपल्याला त्यामध्ये हे करता येईल आणि त्या संदर्भात निर्णय घेता येईल.

सभापती महोदय, मोठ्या प्रमाणात स्पीड बोटी आहेत, त्यांचा पाठलाग करण्यासाठी आमच्याकडे त्या दर्जाच्या स्पीड बोट नाहीत. काही जण बाहेरच्या राज्यांतून येतात आणि पळून जातात. त्यामुळे त्या बोटीही आता खरेदी करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. एकंदरित दोन्हीही व्यवसाय चालले पाहिजेत अशी शासनाची भूमिका आहे. पारंपरिक व्यवसाय करणाऱ्यांची संख्या मोठी आहे, तो दुर्बल वर्ग आहे, छोटा आहे, तो जगला पाहिजे. वर्षानुवर्षे तो समाज तो व्यवसाय करीत आहे. त्यासाठी काही प्रमाणात यावर बंधने आणणे हे शासनाला अनिवार्य आहे. आपण पर्सनेटला डिसेंबरपर्यंत जशी परवानगी देतो तशी डिसेंबरच्या पुढेही देण्याच्या संदर्भात उपायोजना करून त्यांना परवानगी देण्याच्या संदर्भात शासन विचार करेल.

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, उत्तर तपशीलवार आहे. परंतु काही गोष्टी स्पष्ट होणे आवश्यक आहे. माननीय मंत्री श्री. एकनाथराव खडसे साहेबांनी या गोष्टींचे अतिशय डिटेल उत्तर दिले आहे. अधिकाऱ्यांनी त्यांना डिटेल माहिती दिली आहे. परंतु ही माहिती परंपरागतच आहे. हे सर्व पारंपरिक व्यवसाय करणारे आहेत. आपण आपली समाज रचना पहावी. आपल्याला तेही बघणे गरजचे आहे. मच्छिमार समाजाचे आयुष्य, उदरनिर्वाह त्यावर आहे. तो इतका श्रीमंत नाही की, तो पर्सनेट किंवा स्पीड बोट घेऊ शकेल. आपण अनेक वेळा त्यासाठी प्रयत्न करतो हे कबूल आहे आणि ते करणेही आवश्यक आहे. वारंवार प्रत्येक सरकारने काही ना काही प्रयत्न केले आहेत, मात्र त्याने हा प्रश्न सुटणार नाही. 12 नॉटिकल माईलचा पूर्वीचा नियम आज नियमबाह्य झाला. कारण पूर्वी किनाऱ्यावर मिळणारी आता मिळत नाही. परंपरागत मच्छिमारी करणाऱ्यांना स्वतःचा जीव धोक्यात घालून आज डीप सीमध्ये जावे लागते. आपण शेतीच्या दुष्काळाची चर्चा करतो. समुद्रातील मच्छिमारीच्या संदर्भातही फार मोठी समस्या निर्माण झाली

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

आहे. ही वस्तुस्थिती आहे, भाषण नाही. 12 नॉटिकल माईलचा विषय आहे. मात्र आपण त्याच्यापुढे जाऊन विचार करणे गरजेचे आहे. आमचा विरोध आजिबात नाही. आपण नवीन तंत्रज्ञान, नवीन

..4

11-03-2016 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) O.4

MSK/ KTG/ AKN/ 14:20

श्री. भाई जगताप ....

गोष्टी स्वीकारल्या पाहिजेत. परंतु त्या गरीब घटकाला केंद्रिभूत ठेवून प्रश्न कसे सॉल्व्ह करता येतील, तो कसा उभा राहील हा पहिला विचार करणे आवश्यक आहे. नवीन येणाऱ्या 10-20 टक्के लोकांकडे ताकद, शक्ती आहे. ते आणखी डीप सीमध्ये जातील, 15-25 नॉटिकल माईलमध्ये जातील. सभापती महोदय, आपल्या अनेक मच्छिमाऱ्यांना श्रीलंकेने, पाकिस्तानने पकडले आहे, इतक्या डीप सीमध्ये जाऊन ते मच्छिमारी करतात. त्यामुळे हा 12 नॉटिकल माईलचा विषय आहे. हा कालबाह्य झाला आहे. सोमवंशी कमिटीने आपल्या फ्रेममध्ये वर्कआऊट केले आहे. त्यांनी सांगितले पाहिजे की, 12 नॉटिकल माईलमध्ये आता किती मत्स्य उत्पादन होते. जे पूर्वी होते तसे होत नाही ही वस्तुस्थिती आहे. माझी विनंती राहील की, या पारंपरिक मच्छिमारांना सांभाळत असताना नवीन तंत्रज्ञानाचे स्वागत करू आणि यास काहीही हरकत नाही. मी आता एकच गोष्ट सांगतो. आपल्याला माहीत आहे की, रेतीच्या बाबतीत निर्णय घेतला आहे. डुबकी मारून रेती काढणारे परंपरागत आहेत, आज त्यांची काय अवस्था आहे हे आपल्याला माहीत आहे. या दोन गोष्टी रिलेटेड आहेत. इको सिस्टिमचा बॅलन्स रिलेटेड आहे आणि तो जेव्हा बिघडतो तेव्हा अस्तित्वात असलेली मच्छी आणि त्याचे संवर्धन या दोन गोष्टी त्यामध्ये येतात. आज रेतीच्या संदर्भात आपल्याला अतिशय वाईट अनुभव आहे. सक्शन पंप लावून ती उपसली जात आहोत. आपण ते थांबवत आहोत. आपलयाला हाच दृष्टीकोन मच्छिमारांच्या संदर्भातही घ्यावा लागेल. पर्सनेटच्या बाबतीत विरोध असण्याचे कारण नाही. परंतु माझी विनंती राहील की, हे आधुनिक मच्छिमार, पारंपरिक मच्छिमार यांची एक समिती असावी आणि मग अशा पध्दतीने हा विषय निकालात निघू शकेल. आज जर आपण बंधने टाकायचे म्हटले तर आज आपल्याकडे बंधने आहेत. आम्हाला 12 नॉटिकल माईल माहीत नाही. हे बरोबर आहे की, आपल्याला त्यात फरक करण्यासाठी एका रंगाच्या बोटी असतील, एका झेंड्याच्या बोटी असतील हे पहावे लागेल. हाही

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

मुद्दा बरोबर आहे. परंतु 12 नॉटिकल माईलमध्ये मिळणारी मच्छी आणि 12 नॉटिकल माईलच्या बाहेर मिळणारी मच्छी यामध्ये फरक आहे.

....P

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.भाई जगताप.....

12 नॉटिकल मैल अंतरात परंपरागत मत्सव्यवसाय करीत असणाऱ्या लोकांची अवस्था अतिशय वाईट आहे, हे सरकारने लक्षात घेणे गरजेचे आहे. सोमवंशी समितीने अतिशय चांगले काम केले आहे. त्यांच्या कामकाजाबाबत वक्तव्य करण्याचा माझा हेतू नाही. परंतु, वस्तुस्थिती लक्षात घेऊन आज जे वास्तव आहे, त्यानुसार मच्छिमार व्यवसायायिकांच्या बाबतीत, समुद्रात मिळणाऱ्या माशांच्या बाबतीत, इको सिस्टिमच्या बाबतीत आपण विचार केला पाहिजे. हेही खरे आहे की, पर्ससीन नेट मुळे छोटे मासे आणि अंडी उद्ध्वस्त होतात व त्यामुळे इको सिस्टिमला धोका निर्माण होतो. परंपरागत व्यवसायामध्ये हे होत नाही, ही वस्तुस्थिती आहे. सोमवंशी समितीने 12 नॉटिकल मैलबाबत विचार मांडले आहेत. परंपरागत मच्छिमारांच्या दृष्टीने 12 नॉटिकल मैलची हद्द वाढविण्याचा शासन विचार करणार आहे का आणि या दोन्ही तंत्रांना एकत्र आणण्याच्या दृष्टीने सरकार काही नवीन मॅकॅनिझम तयार करणार आहे का ?

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, या दोन्ही तंत्रांबाबत शासनाकडे माहिती आहे. शाश्वत मासेमारी टिकली पाहिजे, ही शासनाची भूमिका आहे. आज अशी स्थिती आहे की, आपल्याला 620 किलो मिटरचा समुद्र किनारा लाभला आहे. या समुद्र किनाऱ्यांवरील मत्स्य शेतीचा भाग दुष्काळग्रस्त जाहीर करावा लागेल की काय, अशी चिंता आहे. सन्माननीय सदस्यांनी माशांची आकडेवारी दिलेली आहे, ती शासनाकडेही आहे. पूर्वीच्या 20 वर्षातील आकडेवारी आपल्याकडे उपलब्ध आहे. पूर्वी किती मासे उपलब्ध होते, आता किती मासे आहेत, ही माहितीही आहे. आता अत्याधुनिक तंत्रज्ञान विकसित झाले असून उपग्रहाच्या माध्यमातून कोणत्या जातीचे, कोणते मासे, किती उपलब्ध आहेत, कोणत्या भागात आहेत, मच्छिमारांनी कोणत्या भागात गेले पाहिजे, याची सूचना मच्छिमारांना देण्याची व्यवस्था देखील आपल्याकडे आहे. माशांचा समुह कोणत्या बाजूला आहे, कोणत्या बाजूला मासेमारी करण्यासाठी गेले पाहिजे, याच्या सूचनाही आपण या तंत्रज्ञानाच्या माध्यमातून देत आहोत.

सभापती महोदय, महत्वाचा प्रश्न हा निर्माण झाला की, पर्ससीन नेटला परवानगी दिल्यानंतर माशांची अंडी व छोटी पिल्ले मरावयास लागली व एकप्रकारे हानी होऊ लागली.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

त्यामुळे परंपरागत मासेमारी करणाऱ्यांकडून अशी मागणी आली की, पर्ससीन नेटच्या जाळ्यांची

श्री.एकनाथराव खडसे.....

छिद्रे मोठी करण्यात यावीत. सोमवंशी समितीचा अहवाल विचारात घेत असताना तारली माशांसाठी 25 मि.मि. आणि बांगडा माशांसाठी 45 मि.मि.जाडी निश्चित करण्यासंबंधी शासनाने निर्णय घेतला आहे. आता ही जाडी 45 मि.मि.पर्यंत वाढविल्यामुळे माशांची अंडी व छोटी पिल्ले जाळ्यांमधून खाली पडतात व प्रजनन वाढण्यास मदत होते.

सभापती महोदय, पर्ससीन नेट व्यावसायिकांना 12 नॉटिकल मैलपर्यंत जाण्यास परवानगी आहे किंवा नाही, हा शेवटी देशाचा प्रश्न आहे. या संदर्भात राज्य सरकारकडून केंद्र सरकारकडे मागणी करण्यात येईल. परवा केंद्रीय कृषी मंत्री श्री.राधा मोहन सिंग यांच्या अध्यक्षतेखाली एक बैठक झाली. परंपरागत मच्छिमारांना सक्षम करण्यासाठी व त्यांना खोल समुद्रात मच्छिमारी करता यावी यासाठी बोटी घेण्याकरिता 1 कोटी रुपयांपर्यंतचे वित्तीय सहाय्य देण्याबाबतचा प्रस्ताव तयार करण्यात आलेला आहे. छोट्या मच्छिमारांना सबसिडी देऊन बोटी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न आपण करीत आहोत. लांब अंतरापर्यंत मच्छिमारीसाठी जावयाचे असेल तर मोठ्या, हायस्पीड व जास्त हॉर्सपॉवरच्या बोटी लागतात. परंतु, या बोटी विकत घेणे छोट्या मच्छिमारांच्या आर्थिक आवाक्यातील नाही. त्यामुळे केंद्रीय कृषी मंत्री यांनी बैठकीत असे सांगितले आहे की, परंपरागत व्यवसाय करणाऱ्यांना बोटी घेण्यासाठी 1 कोटी रुपयांपर्यंत नाममात्र व्याजदराने दीर्घ मुदतीचे कर्ज उपलब्ध करून देण्याबाबत विचार करीत आहोत. आता केंद्रात अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरु आहे. त्यामध्ये परंपरागत व्यवसायीकांसाठी कमी व्याजदराने, दीर्घ कालावधीत कर्ज उपलब्ध करून देण्याबाबतची नवीन योजना येण्याची अपेक्षा आहे. डिझेलच्या दरातील सबसिडी, विक्रीकरामध्ये सुट त्यांना यापूर्वीच दिलेली आहे. मासे विक्रीसाठी मत्स्य विक्री केंद्र उभारण्यासाठी 2 कोटी रुपये बांधकामासाठी आपण देत आहोत. परंपरागत मत्स्य व्यवसाय आणि पर्ससीन नेट व्यवसायाचे बळकटीकरण करण्यासाठी प्रयत्न होत आहेत. शेवटी टंचाई निर्माण होऊ नये, यासाठी खोल समुद्रात जाऊन मच्छिमारी करणारेही टिकले पाहिजेत. या संबंधी राज्य सरकारचे प्रयत्न आहेत.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी.: बी.टी.कापूस बियाण्यांच्या दर निश्चितीबाबत

मु.शी.: बी.टी.कापूस बियाण्यांच्या दर निश्चितीबाबत माननीय कृषी मंत्र्यांचे निवेदन

श्री.एकनाथ खडसे (कृषी मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 46 अन्वये पुढील निवेदन करतो :-

बी.टी.कापूस बियाण्यांच्या दर निश्चितीबाबत खालच्या सभागृहामध्ये मागणी करण्यात आली होती. बागायती क्षेत्राच्या बाबतीत याच महिन्यात किंवा पुढील महिन्यापासून पेरणीला सुरुवात होते. त्यामुळे त्यापूर्वी राज्य सरकारने बी.टी.कॉटनचे दर जाहीर करावेत, अशा प्रकारची मागणी सन्माननीय सदस्य श्री.अजित दादा पवार आणि अन्य सन्माननीय सदस्यांनी केली होती. या संदर्भातील प्रक्रिया 15-20 दिवसांपूर्वीच सुरु झाली होती. मागील वर्षी बी.टी.कॉटन बियाणांच्या संदर्भात काही निर्णय राज्य सरकारने घेतले होते. त्यामध्ये आपण 100 रुपये भाव कमी केलेले होते.

महाराष्ट्र कापूस बी-बियाणे (पुरवठा, वितरण, विक्री व विक्रीच्या किंमतीचे निश्चितीकरण यांचे विनियमन) अधिनियम, 2009 मधील कलम 10 मधील तरतुदीनुसार राज्यास बी.टी.कापूस बियाण्यांचे दर ठरविण्याचे अधिकार होते. त्यानुसार राज्य शासन बी.टी.कापूस बियाणांचे दर वेळोवेळी निश्चित करत होते.

महाराष्ट्रात बी.टी.कापूस पेरणी क्षेत्र साधारणत: 38 लाख हेक्टर आहे. याकरिता सर्वसाधारण 1.5 कोटी पाकिटे प्रतिवर्षी विक्री होते. यापैकी बी.टी.कापूस बोलगार्ड-2 ची विक्री 95 टक्के व उर्वरित बी.टी.कापूस बोलगार्ड-1 ची विक्री होते.

दिनांक 8 जून, 2015 च्या अधिसूचनेनुसार महाराष्ट्र शासनाने बी.टी.कापूस बोलगार्ड-1 चे दर रुपये 730/- प्रति पाकीट आणि बी.टी.कापूस बोलगार्ड-2 चे दर रुपये 830/- प्रति पाकीट असे निश्चित केले होते. ते आपण मागील वर्षी प्रति पाकीट 830 रुपयांवरुन 730 रुपयांवर आणले होते आणि 930 वरुन 830 रुपयांवर आणले होते. दिनांक 8 जून, 2015 पूर्वी सदर दर बोलगार्ड-1

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

करिता रुपये 830/- प्रति पाकिट आणि बी.टी.कापूस बोलगार्ड-2 करिता 930/- प्रति पाकीट असे

श्री.एकनाथराव खडसे.....

होते. अशा प्रकारे 100 रुपये भाव कमी केला. त्यामुळे शेतकऱ्यांच्या उत्पादन खर्चात सुमारे 150 कोटी रुपयांची बचत झाली. सदर दर निश्चिती मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने सुध्दा वैध ठरविली आहे. ते लोक न्यायालयात गेले होते. न्यायालयाने शिक्कामोर्तब केले आहे की, आपण योग्य रितीने दर कमी केले आहेत.

तद्नंतर केंद्र शासनाने दिनांक 7 डिसेंबर, 2015 च्या अधिसूचनेन्वये संपूर्ण देशातील बी.टी.कापूस बियाणांचे दर निश्चित करण्याचे अधिकार केंद्र शासनास असल्याचे धोरण ठरविले. त्या अनुषंगाने केंद्र शासनाच्या दिनांक 8 मार्च, 2016 च्या अधिसूचनेन्वये संपूर्ण देशाकरिता बी.टी.कापूस बोलगार्ड-1 चे दर रुपये 635/- प्रति पाकिट व बोलगार्ड-2 चे दर रुपये 800/- प्रति पाकिट असे निश्चित केले आहेत. यामुळे शेतकऱ्यांच्या उत्पादन खर्चात आणखी घट होण्यास मदत होईल.

बी.टी. कापूस बियाणे महत्तम विक्री किंमत तुलना करावयाची झाल्यास दिनांक 8-6-2015 पूर्वी दिनांक 17/8/2012 च्या अधिसूचनेअन्वये बी.जी.-1 चे रुपये 830/- प्रति पाकिट असे दर होते. आपण नंतर 100 रुपये दर कमी केल्यामुळे कालपर्यंतचा दर रुपये 730/- प्रति पाकिट असा होता. आता यापुढे या राज्यामध्ये 635 रुपये प्रति पाकिट प्रमाणे दर राहील. म्हणजे मागील वर्षी आणि या वर्षी 195 रुपये प्रति पाकिट किंमत कमी करण्यात आलेली आहे. बी.जी.-1 चे बियाणे आपल्याकडे फक्त 20 टक्के लोक वापरतात. यामध्ये प्रति पाकिट 930 रुपये किंमत होती. ती पूर्वी 100 रुपयाने कमी करुन 830 रुपये केली होती. आता यावर्षी आणखी 30 रुपये कमी करुन 800 रुपये प्रति पाकिट एवढी करण्यात आली आहे. नॉन बी.टी.कॉटन जे साधारणपणे 700 ते 800 रुपयांपर्यंत विकले जात होते त्याचे सरसकट दर 500 रुपये प्रति पाकिट एवढे खाली आणण्यात आले आहेत. यापुढे नॉन बी.टीचे बियाणे 500 रुपये प्रति पाकिट या दराने उपलब्ध होईल.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

यानंतर श्री.बोरले.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी. : खामगांव जि.बुलडाणा नगर परिषद वाढीव पाणीपुरवठा योजनेचे काम खाजगी ठेकेदाराला जास्त दराने नियमबाह्य पद्धतीने देणे.

मु.शी. : खामगांव जि.बुलडाणा नगर परिषद वाढीव पाणीपुरवठा योजनेचे काम खाजगी ठेकेदाराला जास्त दराने नियमबाह्य पद्धतीने देणे यासंबंधी श्री.पांडुरंग फुंडकर, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.पांडुरंग फुंडकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"खामगाव जि. बुलडाणा येथिल नगर परिषदेला वाढीव पाणी पुरवठा करण्याच्या केंद्र शासनाच्या योजनेअंतर्गत रु. 43.22 कोटी रकमेच्या कामास दिनांक 01 मार्च, 2008 ला मान्यता मिळणे, दिनांक 29 जुलै, 2009 रोजी नगराध्यक्ष खामगाव यांनी सदरची योजना रु. 58.32 कोटी असल्याचे दाखवून त्यापेक्षा 9.13 टक्के जास्त दराची रु. 63.65 कोटी ठेकेदारास गैरकायदेशीरपणे देणे, आजपावेतो रु. 63.65 कोटीचे देयके अदा करणे, दर करारा प्रमाणे दर कमी असून सुद्धा 25 टक्के जास्त दराने पाईप खरेदी करणे, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अंदाजपत्रकीय दराने काम करण्यास तयार असतांना व तसे त्यांनी लेखी कळविलेले असतानाही खाजगी ठेकेदाराला जास्त दराने नियमबाह्य पद्धतीने काम देणे,विमा रकमेची कपात न करणे, इत्यादी बाबत लेखा परीक्षणात गंभीर आक्षेप असणे,कामाची मुदत 24 महिने असून न.प. व संबंधित ठेकेदाराचे संगनमत असल्यामुळे गेल्या सहा वर्षापासून अद्यापही काम पूर्ण न होणे, याकरीता लोकप्रतिनीधी यांनी मा. मुख्यमंत्री महोदयांना दिनांक 16 जून, 2015 रोजी सविस्तर पत्राने कळविलेले असणे, या गंभीर प्रकाराबाबत उच्चस्तरीय चौकशी करून संबंधितांवर कडक कारवाई करण्याची आवश्यकता व सदर काम पूर्ण होण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कारवाई व उपाययोजना."

..2...

UNCORRECTED COPY - NOT FOR PUBLICATION

डॉ.रणजित देशमुख (नगर विकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

..3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, खामगांव नगर परिषद पाणी पुरवठा योजना ही केंद्र शासनाच्या योजने अंतर्गत मंजूर झालेली योजना आहे. मी आता पर्यंत हा विषय तीन वेळा सभागृहात उपस्थित केलेला आहे. सन 2008 मध्ये या योजनेला मान्यता मिळाली आणि सन 2009 मध्ये निविदा प्रसिद्ध झाली. आता 6 वर्षाचा कालावधी झालेला आहे. परंतु, अद्याप या योजनेचे 50 टक्केच काम झालेले आहे. या योजनेची निविदा प्रक्रिया होताना काही ऑडिट ऑब्जेक्शन काढण्यात आलेले आहेत. ऑडिटने काही गंभीर आक्षेप नोंदविलेले आहेत. शासनाने पाईप खरेदी करण्यासाठी दर करार केला होता. परंतु, त्यानुसार पाईप खरेदी न करता निविदा मागविण्यात आल्या आणि शासनाच्या दर करारापेक्षा 25 टक्के जास्त दराने पाईप खरेदी करण्यात आले. निविदेमध्ये देखील त्याच पद्धतीने झालेले आहे. सदर योजनेचा पहिला प्रस्ताव 43 कोटी रुपयांचा होता. सन 2009-10 च्या दर कराराप्रमाणे तो 52 कोटी रुपये झाला आणि मूळ योजना 58 कोटी 32 लाख रुपयांची दाखवून 9.13 टक्के जास्त दराने निविदा दिली आणि 63 कोटी रुपये खर्च दाखविण्यात आला. एवढी गुंतागुंत आणि ऑडिट ऑब्जेक्शन असताना सुद्धा अजूनही या योजनेचे 50 टक्केच काम पूर्ण झालेले आहे. या योजनेवर 63 कोटी रुपये खर्च झालेले आहेत. खाजगांव हे 1 लाख लोकसंख्येचे शहर आहे. आजही या शहराला 8-10 दिवस पाणी मिळत नाही. या योजनेचे काम रखडलेले आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने या योजनेचे काम करण्याचे मान्य करुन तसे पत्र दिलेले असताना सुद्धा नगरपालिकेने त्या पत्राला केराची टोपली दाखविली आणि स्वत: निविदा काढलेल्या आहेत. माझी अशी मागणी आहे की, आपण ही योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे सोपविणार आहात काय आणि जनतेला लवकरात लवकर पाणी देण्यासंदर्भात कार्यवाही करणार आहे काय ? मी 8 महिन्यांपूर्वी मुख्यमंत्री महोदयांना पत्र दिले होते की, या योजनेच्या कामाची संपूर्ण चौकशी करण्यात यावी. मुख्यमंत्री महोदयांनी चौकशी समिती नियुक्त केली आणि आता लक्षवेधी सूचनेच्या लेखी निवेदनामध्ये नमूद केलेले आहे की, चौकशीचा अहवाल प्राप्त झालेला असून कार्यवाही प्रस्तावित आहे. मग 8-8 महिने कार्यवाही प्रस्तावित राहणार असेल तर कसे होईल ? म्हणून शासनाने याची फेर चौकशी किंवा जे काही करावयाचे आहे ते करावे. शासन ही योजना कार्यान्वित करण्यासाठी ती महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे सुपूर्द करणार आहे काय ?

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, ही गोष्ट सत्य आहे की, सन 2009 मध्ये निविदा प्रक्रिया पूर्ण होऊन दोन वर्षात काम होणे अपेक्षित होते. परंतु, त्यानंतर सुद्धा हे काम झालेले नाही. त्यामध्ये अनेक अडथळे आलेले आहेत. सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर साहेबांनी दिनांक 16.06.2015 रोजी तशा प्रकारची तक्रारही दिली होती. आपण सभागृहात याबाबतीत आश्वासनही दिले हाते की, आपण याची चौकशी करु. 25 टक्के जास्त दराने पाईप खरेदी करणे, एमजेपी काम करण्यास तयार असताना अंदाजपत्रकीय खर्चापेक्षा जास्त खर्चाची निविदा देणे, 24 महिने उलटून सुद्धा विम्याची रक्कम कपात न करणे, असे मुद्दे त्यांनी त्या पत्रात मांडले होते. सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर साहेबांनी सांगितले की, या योजनेच्या कामावर आता पर्यंत 63 कोटी रुपये खर्च झालेले आहेत. परंतु, मी सांगू इच्छितो की, आता पर्यंत या योजनेसाठी केवळ 46.73 कोटी रुपये खर्च झालेले आहेत आणि चौकशी अहवाल शासनाला प्राप्त झालेला आहे. तो अहवाल ज्या प्रमाणे असेल त्या प्रमाणे आपण पुढील कार्यवाही सुद्धा नियमानुसार प्रस्तावित केलेली आहे.

सभापती महोदय, या योजनेचे काम एमजेपीकडे वर्ग करता येईल काय, असा त्यांचा दुसरा प्रश्न आहे. या योजनेचे जवळपास 60 टक्के काम पूर्ण झालेले आहे. पुन्हा ठेकेदार बदली करावा लागेल. हे काम अर्धवट आहे आणि जे काम पूर्ण झालेले आहे, उदाहरणार्थ पाईप लाईन टाकण्याचे काम पूर्ण झालेले आहे. ज्या कामासाठी लोक उड्या घेतात, कदाचित त्या कामात जास्त नफा असल्यामुळे ते काम पूर्ण झाले. परंतु, ही गोष्ट सत्य आहे की, निपक्षपातीपणे, पारदर्शकपणे आणि स्टीप्युलेटेड टाईममध्ये हे काम पूर्ण करावयाचे असेल तर आपल्याला काही ना काही रायडर द्यावे लागतील. एमजेपीला जर पीएमसी म्हणून नेमता आले तर आपण त्याचा विचार करु.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मी ऑडिट आक्षेप संदर्भात प्रश्न उपस्थित केलेला आहे. ऑडिटर शासनाचा असतो. ऑडिटरने प्रत्येक बाबी संदर्भात गंभीर आक्षेप नोंदविलेले आहत, त्या संदर्भात शासन कोणती कार्यवाही करणार आहे ?

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, जे ऑडिट ऑब्जेक्शन आहे त्याचे आपण स्पेशल ऑडिट करण्याचे ठरविले आहे. सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर साहेबांचे त्याबाबत विभागाला पत्र प्राप्त झालेले आहे आणि याबाबत निर्णय झालेला आहे. आपण याचे स्पेशल ऑडिट सुद्धा करणार आहोत.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

11-03-2016 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) Q-5

GRB/ KTG/ AKN/ 14:40

श्री.चंद्रकांत रघुवंशी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, त्या गावांना पाणी मिळत नाही. शासन 31 डिसेंबर पर्यंत ही योजना कशी पूर्ण होईल, यासाठी प्रयत्न करणार आहे काय ? आपण 31 डिसेंबर पर्यंत योजना पूर्ण करण्याबाबत सूचना दिलेल्या आहेत. एमजेपी पूर्वी 17.5 टक्के एजन्सी चार्जेस मागत होती. त्यामुळे योजनेची किंमत वाढत होती आणि लोक एमजेपीला नाकारत होते. आता पीएमसी एमजेपीला देण्यासंदर्भात शासनाने आदेश काढलेला आहे. अमूक एवढ्या कोटी रुपयांचे काम असेल तर अमूक एवढी फी द्यावी, असे शासनाने आदेश काढलेले आहेत. त्या गावांचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न तत्काळ सोडविण्यासाठी ही योजना यावर्षी पूर्ण करण्याचा शासन निर्णय घेईल काय ?

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, मी अगोदरच सांगितले की, ही योजना पूर्ण करण्यासाठी जे अडथळे असतील आणि ते दूर करण्यासाठी ज्या उपाययोजना करावयाच्या असतील त्या निश्चितपणे प्राथमिकतेने केल्या जातील. सन्माननीय सदस्यांनी स्पेशल ऑडिटची मागणी केलेली आहे. आपण ते केल्यानंतर त्याचे जे रिपोर्ट येतील त्यानुसार कार्यवाही करु.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी. : कल्याण (जि.ठाणे) तालुक्यातून वाहणाऱ्या वालधुनी नदी विकासाचा डीपीआर जिल्हाधिकाऱ्यांनी शासनास सादर केलेला असून त्यावर अद्याप ठोस कारवाई झालेली नसणे.

मु.शी. : कल्याण (जि.ठाणे) तालुक्यातून वाहणाऱ्या वालधुनी नदी विकासाचा डीपीआर जिल्हाधिकाऱ्यांनी शासनास सादर केलेला असून त्यावर अद्याप ठोस कारवाई झालेली नसणे यासंबंधी श्री.जगन्नाथ शिंदे, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.जगन्नाथ शिंदे (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"कल्याण (जि.ठाणे) तालुक्यातून वाहणाऱ्या वालधुनी नदीला दिनांक २६ जुलै, २००५ रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे आलेल्या महापुरात अतोनात आर्थिक नुकसान झालेले असणे, भविष्यात अशाप्रकारचे नुकसान होऊ नये यासाठी तत्कालीन मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांनी वालधुनी विकास प्राधिकरणाची जिल्हाधिकारी, ठाणे यांच्या अध्यक्षतेखाली स्थापना केलेली असणे, एम.एम.आर.डी. ए.ने. सुमारे ७५ लाख रुपये खर्च करून नाशिकच्या मेरी या संस्थेकडून वालधुनी नदीचे सर्वेक्षण करून घेतलेले असणे, सदरहू सर्वेक्षणाच्या अहवालाचे सादरीकरण जिल्हाधिकारी ठाणे व ठाणे जिल्ह्यातील संबंधित सर्व प्राधिकरणांचे प्रमुख व काही लोकप्रतिनिधींच्या उपस्थितीत दि. ३० जुलै, २०११ रोजी ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयात करण्यात येऊन त्यावेळी सदरहू नदी पात्राच्या संवर्धन व संरक्षणासाठी सुमारे ६५० कोटी रुपयांचा खर्च अपेक्षीत धरलेला असणे, सदरहू सर्वेक्षण अहवाल व या नदी विकासाचा डी.पी.आर. जिल्हाधिकारी यांनी दिनांक ३ ऑगस्ट, २०११ रोजी शासनास सादर केलेला असून, त्यावर अद्याप ठोस कारवाई झालेली नसणे, याबाबत अनेकदा स्थानिक लोकप्रतीनिधिंनी शासनाकडे व एम.एम.आर.डी.ए. कडे निधीची मागणी केली असता संबंधित महानगरपालिकांनी हा खर्च विभागून करावा किंवा एम.एम.आर.डी.ए. कडून कर्ज घ्यावे असे कळविण्यात आलेले असणे, मात्र या

..7...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जगन्नाथ शिंदे.....

नदीलगतच्या महानगरपालिकांची आर्थिक स्थिती शासनास ज्ञात असतानाही अशा प्रकारे दिलेले उत्तर येथील जनतेच्या भावनांवर मीठ चोळल्यासारखे असणे, आजमितीस कल्याण-डोंबिवली, उल्हासनगर शहरांना पाणी टंचाईमुळे अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत असताना, वालधुनी नदी विकसित झाल्यास या दोन्ही शहरांचा पाणी प्रश्न कायमस्वरूपी निकालात निघून आजूबाजूच्या गावांतील शेती आणि मत्स्यव्यवसायालाही प्रोत्साहन मिळून स्थानिक नागरिकांना रोजगार संधी उपलब्ध होण्याची संधी असल्याने या नदीपात्राच्या संवर्धनाची नितांत आवश्यकता, याप्रकरणी शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

डॉ.रणजित पाटील (नगर विकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जगन्नाथ शिंदे : सभापती महोदय, वालधुनी नदीवरील प्रकल्प सन 2005 पासून प्रलंबित आहे. मी मागील 3-4 वर्षापासून यासाठी सातत्याने प्रयत्न करीत आहे. दिनांक 26 जुलै, 2005 रोजी कल्याण शहरात महापूर आला होता. त्यावेळी अतोनात नुकसान झाले होते. हे लक्षात घेऊन तत्कालीन मुख्यमंत्री महोदयांनी जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नियुक्त केली होती. एमएमआरडीएने या कामासाठी 75 लाख रुपये देऊन मेरी संस्थेमार्फत सर्वेक्षण केलेले आहे. दिनांक 30 जुलै, 2011 रोजी जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखालील समितीने 620 कोटी रुपये किंमतीच्या योजनेचा प्रस्ताव शासनाला सादर केलेला आहे. सध्या एमएमआरडीए म्हणते की, आम्ही निधी देऊ शकत नाही. आम्ही तुम्हाला कर्ज देऊ. आज कल्याण महानगरपालिकेची आर्थिक स्थिती अत्यंत खराब आहे. आज कल्याण महानगरपालिका क्षेत्रात 2-3 दिवस पाणी येत नाही. मे आणि जून महिन्यात साधारणत: 3-4 दिवस पाणी येणार नाही, अशी शक्यता आहे. म्हणून वालधुनी नदीवरील या प्रोजेक्टचे काम झाले तर अंबरनाथ, उल्हासनगर, कल्याण आणि डोंबिवली या शहरांना याचा लाभ होईल. म्हणून शासन या प्रोजेक्टसाठी एमएमआरडीए आणि शासनाच्या माध्यमातून निधी देऊन हा प्रकल्प किती दिवसात पूर्ण करणार आहे ?

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जगन्नाथ शिंदे यांनी दोन प्रश्न उपस्थित केलेले आहेत. त्यांचा पहिला प्रश्न असा आहे की, या संदर्भात जो अहवाल आलेला आहे आणि समितीने दिलेल्या अहवालाप्रमाणे जो काही खर्च प्रस्तावित आहे तो करणार काय ? डीपीआरसाठी जो खर्च येणार होता तो एमएमआरडीएने केलेला आहे. सन 2005 मध्ये वालधुनी नदीला पूर आला होता आणि कल्याण, अंबरनाथ, बदलापूर, उल्हासनगरचे नुकसान झाले होते. त्याच प्रमाणे मिठी नदीला पूर येऊन मुंबई शहरात देखील तशीच परिस्थिती निर्माण झाली होती. आपण त्यावेळी मिठी नदीच्या बाबतीत सुद्धा असेच प्राधिकरण तयार केले होते. आपण शासन निर्णय निर्गमित करुन यासाठी काही निकष देखील निश्चित केले होते.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.रणजित पाटील....

नदीचे पात्र ज्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या जागेतून वाहत असेल त्या जागेवरील खर्च तेथील स्थानिक प्राधिकरण करेल असे एका शासन निर्णयामार्फत निश्चित करण्यात आले होते. तरी देखील सन्माननीय सदस्यांनी म्हटल्याप्रमाणे येथील स्थानिक स्वराज्य संस्था हा खर्च करु शकणार नाहीत. त्या दृष्टीकोनातून काही सहानुभूतीपूर्वक विचार करीत असताना यासाठी काही लॉंगटर्म व शॉर्टटर्म सोल्यूशन काढायला पाहिजे. यामध्ये नदीपात्र रुंदीकरणाचे काम असेल, तेथील पुनर्वसनाची कामे असतील, तेथील औद्योगिकीकरण व शहरीकरण होत असताना तेथे झालेली अनधिकृत बांधकामे त्या नदीपात्रात असतील या सर्व बाबींच्या संदर्भात आपणाला काम करावे लागणार आहे. त्यामुळे त्या ठिकाणी निधीपेक्षा कामाचे नियोजन करावे लागणार आहे. तेथील अतिक्रमण व पुनर्वसनाच्या कामाची जबाबदारी महानगरपालिकेची आहे ती कामे महानगरपालिका करेल. नदी पात्राचे रुंदीकरण व खोलीकरणाची कामे जलसंपदा व नगर विकास विभागाने समन्वयाने करावी असे काम त्या समितीला देण्यात आलेले होते. आता नदीपात्राच्या खोलीकरणाचे काम करण्यात येत आहे त्यासाठी काही ठिकाणी लोकसहभाग घेण्यात येत आहे. याबाबत जलसंपदा विभागाला सूचना देऊन त्या विभागाकडे जी मशीनरी व इतर साहित्य सामग्री असेल ती या कामासाठी वापरण्यात यावी. पेट्रोल किंवा डिझेलचा खर्च नगर विकास विभाग करेल. जलसंपदा विभागाकडून मशीनरी व इतर साहित्य सामग्री मिळते किंवा कसे याबाबत शासन स्तरावर विचारविनियम करण्यात येईल.

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी दिलेले उत्तर समाधानकारक आहे तरी देखील मिठी नदीच्या संदर्भात प्राधिकरण स्थापन करण्यात आलेले आहे. त्याप्रमाणे वालधुनी नदीच्या संवर्धनाची कार्यवाही संबंधित स्थानिक स्वराज्य संस्था यांच्याकडून होणे अपेक्षित आहे असे मंत्री महोदयांनी सांगितले आहे. नागरी क्षेत्रातील नदीच्या संवर्धनाबाबत संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांनी सुयोग्य आर्थिक माध्यमाद्वारे निधी उपलब्ध करावा. स्थानिक स्वराज्य संस्थांनी कोठून निधी उपलब्ध करावा. सरकारने या स्थानिक स्वराज्य संस्थांना आर्थिक मदत केल्याशिवाय स्थानिक स्वराज्य संस्था असा निधी उभारु शकणार नाही. यासंदर्भात सरकार स्थानिक स्वराज्य संस्थांना विशेष मदत करणार आहे काय ? असा माझा प्रश्न आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी अतिशय स्पष्ट प्रश्न विचारलेला आहे, ज्यांचा प्रपंच छोटा आहे त्यांना इतका मोठा खर्च कसा काय झेपेल. यामध्ये नगरपालिका किंवा छोट्या महानगरपालिका इतका मोठा खर्च कशा काय करु शकतील. शासन स्तरावर एमएमआरडीए किंवा एखादी वित्तीय संस्था असा निधी उपलब्ध करुन देऊ शकते. यामध्ये अडचण अशी आहे की, शासन एखादे धोरण जाहीर करते व मग तो प्रेसिडंट ठरतो. मोठ्या प्रमाणात खर्च करताना त्यासंदर्भातील शासन निर्णयानुसार कार्यवाही करण्यात येते. एखादे वेळी शासन निर्णयानुसार कार्यवाही करता आली नाही तरी यासंदर्भात नियोजन व्यवस्थित केले पाहिजे. महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात जलयुक्त शिवार योजनेची कामे करण्यात येत आहेत. या कामांसाठी काही ठिकाणी लोकसहभाग घेण्यात येणार आहे. अनेक ठिकाणी शासनाकडून डिझेलचा खर्च केला जात आहे. जलसंपदा विभागाचे साहित्य व इतर रिसोर्सेस वापरुन काम करता येईल. केवळ पैसे देऊन काम भागणार नाही. यामध्ये इच्छाशक्ती व नियोजन देखील करावे लागणार आहे. म्हणून मी मघाशी म्हटले की, यामध्ये काही लॉगटर्म व शॉटटर्म कार्यवाही करावी लागणार आहे. त्यासंदर्भातील नियोजन करावे लागणार आहे. यासंदर्भात सर्व संबंधित विभागांनी एकत्रित बसून समित्याने ज्या सूचना केलेल्या आहेत त्याचप्रमाणे कार्यवाही करण्यात येणार आहे. यामध्ये एक महानगरपालिका व दोन नगरपालिका आहेत या सर्वांचा समन्वय करुन एकत्रित निर्णय घेण्यात येतील. या कामासाठी एखादा कॉर्पस फंड निर्माण करुन मार्ग काढता येईल.

श्री.जगन्नाथ शिंदे : सभापती महोदय, मी मंत्री महोदयांना विनंती करतो की, या विषयाबाबत जिल्हाधिकारी, आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका व आपला विभाग आणि इतर संबंधित विभागाचे अधिकारी व तेथील स्थानिक लोकप्रतिनिधी यांची एक संयुक्त बैठक कल्याण किंवा मुंबई येथे आयोजित केली तर या विषयाला चालना मिळेल, त्यासाठी अशा प्रकारची कार्यवाही करण्यात येईल काय ?

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, वालधुनी विकास समन्वय समिती जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षेखाली अस्तित्वात आहे, या समितीमध्ये आयुक्त, मुख्याधिकारी, पाटबंधारे विभागाचे अधिकारी, मेरी व एमएमआरडीए यांचे अधिकारी आहेत. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे तेथील स्थानिक लोकप्रतिनिधी यांना देखील बैठकीला बोलावून त्यांची मते जाणून घेण्यात येतील.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.रणजित पाटील...

कालबध्द वेळेत या बैठकी झाल्या तर यातून काही तरी मार्ग निघेल. अशा प्रकारचे निदेश समितीला देण्यात येतील.

लक्षवेधी सूचना क्रमांक 5,6 व 7 बाबत

सभापती : लक्षवेधी सूचना क्रमांक 5 - माननीय मंत्री महोदयांनी पुढे ढकलण्याची विनंती केलेली असल्यामुळे ती मान्य करण्यात येत आहे.

त्याचप्रमाणे लक्षवेधी सूचना क्रमांक 6 - सन्माननीय सदस्य डॉ.सुधीर तांबे यांनी पुढे ढकलण्याची विनंती केलेली असल्यामुळे ती मान्य करण्यात येत आहे.

त्याचप्रमाणे लक्षवेधी सूचना क्रमांक 7 - सन्माननीय मंत्री महोदयांनी पुढे ढकलण्याची विनंती केलली असल्यामुळे ती मान्य करण्यात येत आहे.

....4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी./मु.शी.: औचित्याचे मुद्दे

सभापती : सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील औचित्याचा मुद्दा मांडतो.

सभापती महोदय, सिध्दार्थ उद्यान व प्राणी संग्रहालय औरंगाबाद येथे हेमलकसा येथून रेणू नावाची मादी बिपट्या अलिकडे आणण्यात आली होती. ही मादी बिपट्या डॉ.प्रकाश आमटे यांच्या आनंदवनातून आणण्यात आली होती. वास्तविक पाहता डॉ. प्रकाश आमटे यांनी सांगितले होते की, या मादी बिपट्याने गर्भधारणा केलेली आहे. त्यामुळे या मादीची अधिक काळजी घेणे गरजेचे आहे. ही मादी बिपट्या अतिशय माणसाळलेली होती. हे हिंस्त्र स्वापद असले तरी ती अतिशय माणसाळलेली मादी होती. औरंगाबाद येथे आणल्यानंतर या मादीने तीन बछड्यांना जन्मा दिला होता. तेथील प्राणी संग्रहालयातील लोकांनी या बछड्यांना सांभाळण्याकरिता व त्यांची काळजी घेण्याकरिता वन विभागातील अधिकाऱ्यांची मदत घेणे आवश्यक होते. अशी काळजी न घेतल्यामुळे हे तिन्ही बछडे मरण पावली आहेत, एबीपी न्यूजवर यासंदर्भातील क्लीप व्हायरल झालेली आहे. ती मादी अत्यंत अस्वस्थ झालेली आहे. शेवटी प्राणी संग्रहालयातील लोकांना डॉ.बाबा आमटे यांना फोन करावा लागला होता. फोन वरुन डॉ.प्रकाश आमटे त्या मादीशी बोलत होते रेणू रेणू असा आवाज काढत होते, मादी बिबट्या अत्यंत अस्वस्थ झालेली आहे. डॉ.प्रकाश आमटे यांचा आवाज ऐकल्यावर देखील ती मादी अस्वस्थ असल्याचे जाणवत होती. कालच्या व आजच्या दैनिक सकाळमध्ये ही मादी अस्वस्थ असल्याची बातमी छापून आलेली आहे. मी या औचित्याच्या मुद्यांद्वारे मंत्री महोदयांना मी सांगू इच्छितो की, अस्वस्थ असलेली ही मादी देखील मरण पावेल की, काय अशी शंका वाटत आहे. हा विषय फक्त निवेदन करण्या इतकाच महत्वाचा नाही. यासंदर्भातील निर्णय मंत्री महोदयांना करावा लागणार आहे. यासंदर्भात मी वन मंत्री महोदयांची भेट घेतली होती

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

त्यावेळी त्यांनी सांगितले की, माझ्या खात्याच्या अखत्यारित हा विषय येत नाही. हा विषय नगर विकास विभागाच्या अखत्यारितील आहे.

या नंतर श्री.सांगळे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अमरसिंह पंडित....

मी माननीय नगरविकास मंत्र्यांना नम्र विनंती करतो की, त्या बिबट्या मादीला आज किंवा उद्या सकाळी प्रकाश आमटे यांच्या आनंदवनात सोडणे गरजेचे आहे. आपण त्या मादीकडे हिंस्त्र श्वापद म्हणून बघता कामा नये. त्या मादी बिबट्याला तातडीने आनंदवानात पाठविण्याची कार्यवाही करावी, अशी मी माननीय नगरविकास मंत्र्यांना नम्र विनंती करतो.

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, या संबंधी माहिती घेतली जाईल. परंतु त्या मादी बिबट्याची तब्येत बरोबर नाही, अशी माहिती आहे. म्हणून या संबंधी भावनेच्या भरात तातडीने निर्णय घेणे योग्य होणार नाही.

सभापती : या संदर्भात माहिती घेऊन कार्यवाही करावी.

डॉ.रणजित पाटील : ठीक आहे.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, मी हेमलकसा येथे नेहमी जात असते. हेमलकसा येथे अनेक जनावरे व प्राणी आहेत, त्यात साप वगैरे आहेत. त्यांचे व श्री.प्रकाश आमटे यांचे नेहमीचे संबंध आहेत. श्री.प्रकाश आमटे यांनी ही वाघिणी लहानपणापासून पाळली आहे. त्यांचे त्या वाघिणीसमवेत आपल्या मुलांसारखे संबंध आहेत. आपण एखादा कुत्रा पाळला आणि त्याला आठ दिवस दुसऱ्याच्या घरी ठेवल्यास तो तेथे राहू शकत नाही. हा बिबट्या त्यांच्या घराण्यात वाढला आहे, त्यांच्या मुलांसोबत खेळला आहे. अशा वेळी त्याला दुसरीकडे हलविल्यामुळे हा परिणाम होऊ शकतो. सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित यांनी सदर बिबट्याला आनंदवन येथे पाठविण्याची मागणी केली आहे, यात काही गैर नाही. तो बिबट्या परत तेथे गेल्यास त्याचे आयुष्य वाढू शकते.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जगन्नाथ शिंदे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

राज्यात मुत्रपिंड विकाराच्या रुग्णांची संख्या दिवसेंदिवस वाढत असताना अनेक रुग्णांना औषधी व आहार न मिळाल्यामुळे त्यांच्या दोन्ही किडण्या निकामी होवून अनेक रुग्ण दगावल्याच्या घटना घडत असतात. सबब राज्यातील सर्व शासकीय, निमशासकीय, महानगरपालिका व नगरपरिषदा रुग्णालयांच्या रुग्णालयांमध्ये अल्पदरात डायलेसिस व औषधे उपलब्धे करुन द्यावेत. तसेच दारिद्रय रेषेखालील रुग्णांना या सुविधा मोफत उपलब्ध करुन देण्यात याव्यात अशी मागणी या औचित्याच्या मुद्याद्वारे मी शासनास करीत आहे.

सभापती : यासंबंधी शासनाने दखल घ्यावी.

...3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.ख्वाजा बेग : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

श्रीमती विद्या प्रविण मेश्राम यांचे पती कै.प्रविण हरिभाऊ मेश्राम हे जवान राज्य उत्पादन शुल्क, मंगरुळपीर, जिल्हा वाशिम विभागात पोलीस पदावर कार्यरत असताना त्यांचे दिनांक 26/10/2009 रोजी निधन झाले असता त्यांची पत्नी श्रीमती विद्या प्रविण मेश्राम यांनी दिनांक 20/11/2009 रोजी अनुकंपा तत्वावर नोकरी मिळण्याबाबत अर्ज करुन अद्याप त्यांना नोकरी न मिळाल्याने कै.प्रविण मेश्राम यांची पत्नी आणि मुलांना उपासमारीत दिवस काढावे लागत आहेत. याबाबत श्रीमती विद्या प्रविण मेश्राम यांना तातडीने नोकरी देण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी, अशी मागणी औचित्याच्या मुद्याद्वारे शासनास करीत आहे.

...4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

नाशिक जिल्ह्यातील नंदुरबार येथील कजारभार समाजाच्या जात पंचायत समितीने एका विधवा महिलेला चारित्र्य सिध्द करण्यासाठी नग्न अंघोळ करण्याची शिक्षा केली तसेच तिच्या बारा वर्षांच्या मुलाच्या हातात गरम केलेली कुऱ्हाड ठेवण्याची शिक्षा करणे, अशा प्रकारे त्यांचा अमानवीय छळ करण्याचा प्रकार घडला असणे, या संदर्भात संबंधित महिलेने पोलीस अधीक्षक, नाशिक यांच्याकडे तक्रार केली असणे, परंतु अद्याप त्यावर न झालेली कार्यवाही, अशा अमानुष प्रकाराला आळा घालण्याची आवश्यकता, शासनाने यावर तातडीने करायची कार्यवाही. तसेच ही जात पंचायतीची प्रथा बंद करण्यासाठी शासनाने कायदा करावा अशी मी या निमित्ताने शासनाला विनंती करीत आहे.

...5

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.प्रकाश गजभिये : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

राज्यात बंदी असलेल्या "मनस्मृती" या संस्कृत ग्रंथाचे मराठीत भाषांतर करुन त्याची विक्री सुरु असल्याचा प्रकार उघडकीस येणे. यामुळे राज्यातील वातावरण तापले असताना संबंधित पुस्तक प्रकाशनाने "मनस्मृती" या पुस्तकाला बंदी नसून कायदेशीररित्या पुस्तक प्रकाशन करण्याचा दावा करणे. अशा प्रकारच्या दाव्यात नेमके किती तथ्य आहे, या संदर्भात राज्य शासनाची नेमकी भूमिका काय आहे ? महिलांबाबत विक्षिप्त लिखाण असलेल्या ग्रंथाच्या प्रकाशनामुळे राज्यात संताप निर्माण होणे, ग्रंथाचे भाषांतरकार, प्रकाशक, मुख्य वितरक आणि विक्रेता यांच्याविरुध्द फौजदारी गुन्हा दाखल करण्याची मागणी केली असणे. राज्यात महिलांबाबत विक्षिप्त लिखाण असलेल्या "मनस्मृती" या ग्रंथाच्या प्रकाशनावर बंदी असताना 15 वर्षांपेक्षा जास्त काळापासून "मनस्मृती" या संस्कृत ग्रंथाचे मराठी भाषांतर असलेल्या पुस्तकाच्या प्रकाशनास बंदी असताना शासनाने सदर ग्रंथाचे प्रकाशन करण्याचा निर्णय घेणे. मात्र इस्लामच्या शरीयत असो की हिंदुची "मनस्मृती" देशाने राज्यघटना स्वीकारल्यानंतर आपोआप हे ग्रंथ गैरलागू ठरतात. सामाजिक हित लक्षात घेऊन पुस्तक विक्रेत्यांनी "मनस्मृती" ग्रंथाची विक्री करु नये. तसेच शासनाने सदर ग्रंथास बंदी घालावी, अशी मागणी या औचित्याच्या मुद्याद्वारे मी शासनास करीत आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत प्र.पाटीन : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

नागपूर जिल्ह्यातील काटोल नगरपरिषदेच्या रस्ते विकास प्रकल्पासाठी केंद्र शासन पुरस्कृत यु.आय.डी.एस.एस.एम.टी. योजनेअंतर्गत 28 कोटी 50 लक्ष रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला होता. सदर निधीतून काटोल शहरातील सर्व अंतर्गत रस्त्यांची कामे, मजबुतीकरण इत्यादी कामे शासनाने निर्देशित केलेल्या नियमानुसार केली जाणार होती.

काटोल नगरपरिषदेने कामे पूर्ण करण्यासाठी सात वेळा निविदा नोटीस प्रसिध्द करुन निविदा मागविण्यात आल्या होत्या. परंतु परिसरातील ठेकेदारांनी निविदा प्रक्रियेत भाग घेतला नाही. परंतु आठव्यांदा निविदा नोटीस जाहीर केल्यानंतर निविदा सादर करण्यात आल्या होत्या. सदर निविदा प्रकियेनुसार निविदा अंतिम करण्याचे काम काटोल नगरपरिषद प्रशासन करीत होते. परंतु दिनांक 6 नोव्हेंबर, 2015 रोजी नगरविकास विभागाकडून कळविण्यात आले की, केंद्र शासन पुरस्कृत निधी खर्च करु नये.

सदर निधी अखर्चित राहिल्याने काटोल नगरपरिषदेला सव्याज परत करण्याबाबत नगरविकास विभागाने पत्रही दिले होते. सदर नगरपरिषद शेतकरी कामगार पक्षाच्या नेतृत्वाखाली कार्यान्वित होती. परंतु शासनाने दिनांक 20 फेब्रुवारी, 2016 रोजी शेतकरी कामगार पक्षाच्या नगराध्यक्ष व उपाध्यक्ष तसेच नगरसेवकांना अपात्र घोषित केल्याचे लेखी कळविण्यात आले. तात्पर्य सदर अखर्चित रक्कम काटोल नगरपरिषदेकडून सव्याज वसूल करण्याबाबत नोटीसही बजावण्यात आली.

परंतु शासनाने सदर रक्कम वसूल करु नये व उपलब्ध निधी वापरण्यास शासन स्तरावर कार्यवाही सुरु असल्याने या निधीमध्ये शेतकरी कामगार पक्षाची सत्ता असल्याने शासनाने मंजूर निधी वापरास मनाई केली वा आता सदर निधी काटोल नगरपरिषदेमधील शेतकरी कामगार पक्षाच्या नगरसेवकांना अपात्र ठरविल्याने सदर रक्कम खर्च करण्यास परवानगी देण्याच्या मनस्थितीत असल्याने याबाबत शासन पक्षभेद करुन निधीचा गैरवापर करणार असल्याचे स्पष्ट होते. यापूर्वी शासनाने निधीचा वापर करु नये व सव्याज निधी शासनाकडे परत करावा, अशी माझी या औचित्याच्या मुद्याद्वारे मागणी आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

गडचिरोली हा राज्यातील अतिशय मागासलेला जिल्हा व नव्याने निर्माण झालेल्या तेलंगणा राज्याशी संलग्न असलेला जिल्हा आहे. गडचिरोली जिल्ह्यातील प्राणहिता नदीवरील चेवेल्ला धरण तसेच कालेश्वर मेडीगेट्टा धरण या प्रकल्पांसाठी महाराष्ट्र आणि तेलंगणा राज्यातील मुख्यमंत्र्यांचा सामंजस्य करार झाल्याचे काल परवा टी.व्ही. वर पाहिले, वर्तमानपत्रात वाचले. गडचिरोली जिल्ह्यातून वाहणाऱ्या वैनगंगा, वर्धा, गोदावरी व प्राणहिता नद्यांचा संगम आहे. प्राणहिता नदी पुढे गोदावरी नदीला जाऊन मिळते.

यानंतर T-1.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.जोगेंद्र कवाडे.....

त्या प्राणहिता नदीवर चेविला प्रकल्प तसेच काळेश्वर प्रकल्प उभारला जाणार आहे. त्या चेविला प्रकल्पाचे काम सुरु आहे. 2015 च्या नागपूर अधिवेशनामध्ये मी विशेष उल्लेखाद्वारे हा प्रश्न मांडून शासनाचे या विषयाकडे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला होता. या प्रकल्पामुळे गडचिरोली जिल्हयातील अहेरी, सिरोंचा, गोंडपिंपरी व चामोर्शी तालुक्यातील शेकडो गावे बुडित क्षेत्रात जाणार असल्यामुळे हजारो कुटुंबे विस्थापित होण्याची भीती निर्माण झाली आहे. या प्रकल्पातून पाण्याचा व सिंचना जास्तीत जास्त फायदा तेलंगणा राज्याला होणार आहे. या प्रकल्पासाठी तेथील बुडित क्षेत्रातील जनतेला विश्वासात घेण्यात आले नाही. त्यामुळे गडचिरोली जिल्हयातील जनतेमध्ये प्रचंड असंतोष निर्माण झाला आहे. या प्रकल्पाविरुध्द आंदोलन सुरु झाले आहे. हे असेच सुरु राहिले तर त्या परिसरात नक्षलवाद फोफावण्याची शक्यता नाकारता येत नाही. म्हणून सरकारने या प्रकल्पाबाबत फेरविचार करावा अशी मी या माध्यमातून सरकारला विनंती करतो.

...2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी./मु.शी. : विशेष उल्लेखाच्या सूचना

सभापती : आता विशेष उल्लेखाच्या सूचना घेण्यात येतील.

श्री.अमरसिंह पंडित (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

सभापती महोदय, मौजे नाथापूर, ता. व जि.बीड येथे गावगुंडांच्या त्रासाला कंटाळून अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थीनीवर शिक्षण अर्धवट सोडण्याची दुर्दैवी वेळ येणे, गावगुंडाने मुलीची सतत छेड काढून तिला तिच्या घरात घुसून जिवे मारण्याची धमकी देणे, यामुळे तिच्यासह कुटुंबियांमध्ये दहशत व भीतीचे वातावरण पसरणे, कुटुंबियांनी पोलिसांकडे तक्रार देऊनही गावगुंडांच्या विरोधात कोणतीही कारवाई न होणे, या गावगुंडांकडून अवैध दारु विक्रीसह अनेक बेकायदेशीर व्यवसाय गावात चालविण्यात येणे, विद्यार्थीनीवर अत्याचार करणाऱ्या या गावगुंडास हद्दपार करुन त्याचे विरुध्द कडक कारवाई करावी अशी मागणी मी या विशेष उल्लेखाद्वारे शासनास करीत आहे.

...3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.ख्वाजा बेग (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

सभापती महोदय, अरुणावती प्रकल्पासाठी शासनाने सन 1996-97 साली शेतकऱ्यांच्या जमिनी अल्प किंमतीत संपादन करण्यात येणे व सिंचनाचा फायदा आपणास मिळेल या आशेवर शेतक-यांकडून आपल्या जमिनी संपादनास अनुमती देण्यात येणे, मात्र 20 वर्षाचा काळ संपुष्टात येउुनही अरुणावती प्रकल्पाच्या उजव्या कालव्याचे काम अपूर्ण असल्याने पूर्ण क्षमतेने सिंचन होत नसल्याने स्थानिक शेतकऱ्यांकडून सदर कालव्यातून पाणी सोडण्याची मागणी माननीय मुख्यमंत्री यांच्याकडे करुनही अद्याप कोणतीच कार्यवाही झालेली नसल्याने शेतकऱ्यांमध्ये पसरलेला असंतोष व निराशेचे वातावरण, याबाबत अरुणावती प्रकल्पाचे उजव्या कालव्यातून पाणी सोडण्यात यावी, अशी मागणी मी या विशेष उल्लेखाद्वारे शासनास करीत आहे.

...4..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती शोभा फडणवीस (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडते.

सभापती महोदय, राज्यात यावर्षी अपुरा पाऊस पडल्याने पाणी टंचाई निर्माण होण्याची भीती, त्यातच पश्चिम विदर्भात 3548 गावांमध्ये पाण्याची टंचाई निर्माण होणे, त्यामुळे पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निर्माण होणे, यावर्षी चंद्रपूर जिल्हयात सरासरी 9.60 टक्के पर्जन्यमान कमी होणे, त्यामुळे भूजल पातळी 0.57 मीटरने घट होणे, त्यामुळे जिल्हयात 183 गावांना पाणी संकटाचा सामना करण्याची वेळ भूजल सर्वेक्षणाच्या अहवालावरुन दिसून येणे, शासनाने पाणी टंचाई निवारणार्थ उपाययोजना म्हणून राज्यात 70.59 कोटी रुपयाचा प्रस्ताव मांडण्यात येणे, परंतु दरवर्षी पाणी टंचाई निवारणासाठी उपाययोजना राबविण्यात येऊनही त्याचा कायमस्वरुपी तोडगा न निघणे, शासनाने पाणी टंचाईवर मात करण्यासाठी लाखो रुपये खर्च करुन नियोजनशून्य धोरणामुळे नागरिकांना त्रास सहन करावा लागणे, त्यामुळे यावर्षी विदर्भात पाणी टंचाई व दुष्काळी परिस्थिती निर्माण होत असल्याने ठोस उपाययोजना करण्याची आवश्यकता, या विषयावर मी मुद्दा उपस्थित करीत आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.प्रकाश गजभिये (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

सभापती महोदय, राज्यात शासनाकडून हेल्मेट सक्ती नुकतीच करण्यात येणे, मात्र हेल्मेट सक्ती करणे परत उठविणे, या शासनाच्या धरसोड धोरणामुळे नागपूर शहरात हेल्मेट विक्री जोमाने सुरु असणे, त्यातच आयएसआय, ईसीई प्रमाणपत्र असलेल्या हेल्मेटची किंमत बाजारात 540 रुपये असताना नागपूरमध्ये रस्तोरस्ती 200 रुपयांपासून हेल्मेटची विक्री होत असणे, तसेच हेल्मेट एलएस-2 सुरक्षिततेच्या दृष्टीने सुरक्षित असताना नागपूरमध्ये सुरक्षिततेच्या दृष्टीने उपयुक्त नसलेल्या हेल्मेटची विक्री होत असल्याने अनधिकृतरित्या रस्त्यावर होणाऱ्या हेल्मेट विक्रीला प्रतिबंध करण्यात यावा, अशी शिफारस या विशेष उल्लेखाद्वारे मी शासनास करीत आहे.

...6...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी.: राज्यातील मराठवाडा, विदर्भ, पश्चिम महाराष्ट्रासह अनेक भागात दुष्काळाची गंभीर परिस्थिती निर्माण होणे

मु.शी.: राज्यातील मराठवाडा, विदर्भ, पश्चिम महाराष्ट्रासह अनेक भागात दुष्काळाची गंभीर परिस्थिती निर्माण होणे या विषयावर सर्वश्री धनंजय मुंडे, शरद रणपिसे, सुनील तटकरे, माणिकराव ठाकरे, जयंत प्र. पाटील, हेमंत टकले, संजय दत्त, कपिल पाटील, अमरसिंह पंडित, अमरनाथ राजूरकर, सतिश चव्हाण, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.संदीप बाजोरिया, ॲड.रामहरी रुपनवर, सर्वश्री अब्दुल्ला खान दुर्राणी, सुभाष झांबड, अशोक ऊर्फ भाई जगताप, आनंदराव पाटील, हरिसिंग राठोड, चंद्रकात रघुवंशी, डॉ.सुधीर तांबे, वि.प.स. यांचा प्रस्ताव

(प्रस्ताव पुनः प्रस्तुत झाला)

प्रा.जोंगेंद्र कवाडे (नामनियुक्त) : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेते श्री.धनंजय मुंडे यांनी म.वि.प.नियम 260 अन्वये दुष्काळाच्या संदर्भात जो प्रस्ताव मांडला आहे त्यावर माझे विचार मांडण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्रामध्ये जी अभूतपूर्व पाणी टंचाई निर्माण झाली आहे, दुष्काळ पडला आहे ही निसर्गाची अवकृपा आहे. त्यासाठी सत्ताधारी पक्ष जबाबदार नाही. सत्ताधारी पक्ष आघाडी सरकारवर आरोप करीत आहे. त्यांनी योग्य ते उपाय केले नाही म्हणून ही परिस्थिती ओढवलेली आहे. वास्तविक यामध्ये त्यांचाही काही दोष नाही. निसर्गाचे हे रौद्र रुप आहे. गारपीट झाली, अवकाळी पाऊस आला, अतिवृष्टी झाली, पर्जन्यमान कमी झाले, जनावरांना चारा उपलब्ध नाही, पिण्याच्या पाण्याचे दुर्भिक्ष निर्माण झाले यामध्ये कोणाचा दोष आहे हे शोधण्यापेक्षा सरकारने विद्यमान परिस्थितीत युध्द पातळीवर प्रयत्न केले तर राज्यातील दुष्काळग्रस्त जनतेला न्याय मिळू शकतो, दिलासा मिळू शकतो हे मला आवर्जून सांगावेसे वाटते.

(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)

सभापती महोदय, यंदाच्या दुष्काळाची तीव्रता मराठवाड्यामध्ये अधिक आहे. पश्चिम विदर्भाचा काही भाग, खानदेशमधील काही जिल्हे या ठिकाणी देखील दुष्काळ आणि टंचाईमुळे

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.जोगेंद्र कवाडे.....

भयावह परिस्थिती निर्माण झाली आहे. माननीय विरोधी पक्षनेते, माननीय सदस्य सर्वश्री सुनील तटकरे, शरद रणपिसे, माणिकराव ठाकरे, जयंत प्र.पाटील यांनी दुष्काळाबाबत अत्यंत विदारक चित्र सभागृहापुढे मांडले आहे. ही विदारक स्थिती पाहून सरकार जे प्रयत्न करीत आहे ते पुरेसे आहेत की नाही अशी शंका मनामध्ये निर्माण होते. यंदाच्या दुष्काळापेक्षा 1972 च्या दुष्काळाची तीव्रता भयंकर होती. तत्कालीन सरकारने इच्छाशक्तीच्या बळावर दुष्काळाशी सामना केला, मुकाबला केला आणि दुष्काळावर नियंत्रण ठेवण्याचे काम केले. त्या काळात दुष्काळी परिस्थितीत इच्छाशक्तीचा सुकाळ निर्माण झालेला होता. आमच्या सरकारमध्ये इच्छाशक्तीचा अभाव आहे की नाही हे आपण ठरवावे.

नंतर यू.1....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.जोगेंद्र कवाडे...

पण तुलनात्मक विचार करतो तेव्हा 1972 मध्ये या काळापेक्षाही भयंकर दुष्काळ पडला होता. त्यावेळी ज्या उपाययोजना करण्यात आल्या होत्या, शेतकऱ्यांना मदत करण्यात आली होती त्याचे अनुकरण केले तर चांगले होईल. दुष्काळी परिस्थिती असतानाच काल परवा राज्यात अवकाळी पाऊस झाला, गारपीट झाली. त्यामुळे कापूस गेला, सोयाबीन गेले, गारपीटीमुळे नागपूर, अमरावतीमधील संत्रा पीक गेले. नाशिकमधील आमची द्राक्षे गेली, कांदा गेला. जळगावमधील आमची केळी गेली. अवकाळी पावसामुळे गहू झोपून गेला. अशा प्रकारे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान गारपीटीमुळे, अवकाळी पावसामुळे झालेले आहे. पाण्याच्या कमतरतेमुळे आज संपूर्ण राज्य हवालदिल झालेले आहे. दुष्काळाची तीव्रता मराठवाडा, विदर्भ, खान्देशमध्ये असली तरी एक गोष्ट निश्चित आहे की, यासंबंधी सरकारने ताबडतोब कारवाई करणे गरजेचे आहे.

सभापती महोदय, आम्ही वारंवार आकडेवारी देतो. आमच्या काळामध्ये, आपल्या काळामध्ये अमुक एवढ्या शेतकऱ्यांच्या आत्महत्या झाल्या. हा काही गौरवाचा विषय नाही. आपले राज्य पुरोगामी आहे. संपूर्ण देश महाराष्ट्राकडे पुरोगामी राज्य म्हणून बघतो. संपूर्ण देश आपल्या राज्यापासून प्रेरणा घेत असतो. फुले, शाहू, आंबेडकर, शिवाजी महाराजांच्या पुरोगामी राज्यात शेतकऱ्यांनी आत्महत्या कराव्यात ही बाब आपल्याला शोभणारी नाही. आपण अमुक केले नाही म्हणून आम्ही तमुक करीत आहोत असे म्हणून हा प्रश्न टाळण्याचा प्रयत्न थांबला पाहिजे. आपल्या राज्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे प्रमाण वाढत चालले आहे. मी आकडेवारीमध्ये जाणार नाही. पण 15 वर्षामध्ये सर्वात जास्त आत्महत्या 2015 या एकाच वर्षामध्ये झाल्या आहेत. या वर्षी जवळ जवळ 3228 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. न्यायालयाने दुष्काळासंबंधी निदेश देणे ही बाब देखील अत्यंत चिंताजनक आहे. याबद्दल गंभीरपणे विचार करणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहेत. शेतकरी आत्महत्या का करीत आहेत ? सरकार संवेदनशीलतेने, करुणेने शेतकऱ्यांना जवळ करीत नाही. बेजार झालेला शेतकरी आत्महत्येला प्रवृत्त होत आहे. सरकार शेतकऱ्यांना करुणेने जवळ करीत नाही. ..2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.जोगेंद्र कवाडे...

माणुसकीने जवळ करीत नाही त्यामुळे निराश, हताश, बेजार झालेला शेतकरी गळफास जवळ करीत आहे, अशी परिस्थिती आहे. आज चाऱ्या छावण्या वाढविण्याची गरज आहे. शेतकऱ्यांची कर्जमाफी करणे गरजेचे आहे. आपण स्वामीनाथन कमिशन लागू केले तर दुष्काळी आणि टंचाई परिस्थितीवर नियंत्रण आणता येईल. स्वामीनाथन कमिशनने शेतकऱ्यांना नवजीवन प्रदान करण्यासाठी चांगल्या शिफारशी केलेल्या आहेत. त्यासंबंधातील शासनाचे धोरण काहीच कळलेले नाही. स्वामीनाथन समितीने सुंदर अशा शिफारशी केलेल्या आहेत. त्या लागू केल्या तर मला वाटते की, आमच्या राज्यातील शेतकऱ्यांना नवजीवन प्राप्त होईल, नवीन ऊर्जा प्राप्त होईल. अशाने शेतकऱ्यांचे जीवन सुखी झाल्याशिवाय राहणार नाही हे या ठिकाणी सांगावेसे वाटते.

सभापती महोदय, मागेल त्याला शेततळे देण्यात येईल असे माननीय राज्यपालांनी आपल्या अभिभाषणातून सांगितले आहे. यामध्ये देखील विशिष्ट असा कोटा दिलेला आहे. आपण 9000 शेततळी देण्याचे ठरविले आहे आणि दहा हजार लोकांनी मागणी केली तर मग आपण काय करणार आहात ? याला दोलायमान स्थिती म्हणतात. आपली भूमिका ही स्पष्ट असली पाहिजे होती. आपण आकडेवारी न देता आम्ही मागेल त्याला शेततळे देऊ अशा प्रकारची स्पष्ट भूमिका घ्यायला पाहिजे होती. ज्या शेतकऱ्यांना आपण शेततळी देणार आहात त्या लाभार्थी शेतकऱ्याला 50 टक्के रक्कम भरावी लागणार आहे. दुष्काळामुळे पीडित, हताश झालेला शेतकरी ही 50 टक्के रक्कम कुठून आणणार हा ही मोठा प्रश्न आहे. तेव्हा शेततळी निर्माण करण्यासाठी शेतकऱ्यांवर कमीतकमी भूर्दंड बसावा अशी व्यवस्था आपण करावी अशी माझी मागणी आहे.

सभापती महोदय, कर्ज मुक्ती करणे, कर्ज माफी करणे महत्त्वाचे आहे. मेलेल्या कोंबड्याला आगीचे भय नसते हे खरे आहे. पण संवेदन हरवलेल्या सरकारला शेतकऱ्यांच्या मरणाची भीती नसावी. शेतकऱ्यांच्या भरवशावर आपण सरकार चालवितो. राज्य चालते. शेतकऱ्यांच्या भरवशावर आम्ही देशाचा, राज्याचा गाडा हाकतो. त्या शेतकऱ्यांच्या मृत्युची जराही

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

भीती आम्हाला वाटू नये ही बाब काही बरोबर नाही. काल-परवा जेव्हा निवडणुका होत्या तेव्हा आम्ही टीव्हीवर कुठे नेऊन ठेवला माझा महाराष्ट्र ही घोषणा बघत होतो. काल ते म्हणत होते. आज आपण सत्तेवर आल्यावर आम्हाला म्हणावे लागते की, कुठे नेऊन ठेवला महाराष्ट्र माझा. कुठे नेऊन ठेवला मराठवाडा माझा, कुठे नेऊन ठेवला विदर्भ माझा, कुठे नेऊन ठेवला उत्तर महाराष्ट्र माझा अशी विचारण्याची पाळी आज आमच्यावर आलेली आहे.

सभापती महोदय, शेतकऱ्याला आत्महत्या करताना आनंद होतो काय ? त्याला आत्महत्या करण्याचा शौक असतो काय ? एक खासदार अशा प्रकारचे वक्तव्य करतो आणि शेतकऱ्यांच्या आत्महत्येवर मीठ चोळतो. महाराष्ट्रातील शेतकरी हा अपमान कदापिही खपवून घेणार नाही. फॅशन म्हणून शेतकरी आत्महत्या करतात अशा प्रकारे वक्तव्य सत्ताधारी पक्षाचा सन्माननीय खासदार करतो या पेक्षा दुर्दैवी दुसरी कोणती गोष्ट आहे. अर्थात ही बाब काही बरोबर नाही. लोकप्रतिनिधीने अत्यंत जबाबदारीने बोलले पाहिजे. आताच माझ्या एका मित्राने मुद्दा मांडला. काल-परवा एक स्टेटमेंट आले की, रिक्षा जाळून टाका, अमुक करा तमुक करा. आम्ही मंत्र्यांना मारा, अमुक करा, तमुक करा, सरकारला झोडपा असे म्हणत नाही. आमचे म्हणणे एवढेच आहे की, ज्या संकटात आज शेतकरी सापडला आहे त्यातून त्याला आपण कसे काय वाचविणार आहात. त्याला आपण दिलासा दिला पाहिजे. शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे आहे हे आपण सांगितले पाहिजे. पश्चिम महाराष्ट्रात फिरताना सोलापूर-सांगली येथे जाताना वाहनांच्या मागे अक्कलकोट येथील स्वामी समर्थांची घाबरू नकोस मी तुझ्या पाठीशी आहे ही स्लोगन असते. सरकार एवढे तरी म्हणावे की, शेतकऱ्यांनो आपण घाबरण्याचे काहीच कारण नाही, कर्ज असो, नापिकी असो, दुष्काळ असो, गारपीट असो, पाऊस असो, आम्ही मात्र आपल्या पाठीशी आहोत. काहीही काळजी करण्याचे कारण नाही. मुलांचे लग्न, शिक्षण करायचे असेल तर सरकार आपल्याला सर्व प्रकारची मदत करेल. हा आत्मविश्वास आमच्या सरकारने शेतकऱ्यांना दिला तर मला वाटते की, शेतकऱ्यांच्या आत्महत्या 99 टक्के थांबल्याशिवाय राहणार नाही. पण आज काय होत आहे.

...4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.जोगेंद्र कवाडे...

सन्मानाने जगण्याचा अधिकार माणूस जेव्हा गमावून बसतो तेव्हा माणूस मृत्युला जवळ करत असतो. शेतकऱ्यांचे देखील असेच आहे. वर्तमानपत्रात बातमी आली की, आपल्या देशातील सरकारी बँका, शेड्युल्ड बँकांचे 1400 लक्ष कोटी रुपयांचे कर्ज उद्योगपतींनी, भांडवलदारांनी, पुंजीपतींनी बुडविले आहे. हे सर्व सरकारने राईट ऑफ करून टाकले. ही सर्व रक्कम बुडित खात्यात गेली. तरी देखील ते आज बंगल्यामध्ये राहात आहेत. 10-10 मोटारीतून फिरत आहेत. त्यांच्या कुत्र्यांसाठी, मांजरीसाठी, नोकरांसाठी, लेकरांसाठी स्वतंत्र मोटारगाड्या आहेत. त्या जप्त केल्या नाहीत. आमचा शेतकरी बँकांकडून 2-4 लाख रुपयांचे कर्ज घेतो. तो जर दुष्काळामुळे, टंचाईमुळे, धानाला भाव न मिळाल्यामुळे, अनेक नैसर्गिक संकटांमुळे तो कर्ज फेडू शकला नाही तर बँका, सावकार मात्र त्याच्या घरावर जप्ती घेऊन जातात. त्याची बैलजोडी जप्त करतात.

यानंतर श्री.अजित....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.जोगेंद्र कवाडे.....

त्यांची बैलजोडी जप्त करतात, त्यांच्या घरावर जप्ती आणतात, त्यांचे ट्रॅक्टर जप्त करतात, त्यांची भांडी जप्त केली जातात. अशा परिस्थितीमध्ये जगाला कसे तोंड दाखवावयाचे म्हणून हताश झालेला शेतकरी शेवटी आत्महत्या करतो. प्रश्न असा निर्माण होतो की, एखाद्या उद्योजकाचे 17 हजार कोटी रुपये माफ होऊ शकतात तर आपल्या छोट्या शेतकऱ्यांचे एक-दोन लाखांचे कर्ज सरकार माफ का करीत नाही ? हा जो विरोधाभास आहे तो आपण संपवावा] अशी माझी मागणी आहे.

सभापती महोदय, अच्छे दिनावर मी बोलणार नाही. सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप त्यांच्या भाषणात सहज बोलता बोलता म्हणाले की, "कोई लौटा दे मेरे बिते हुऐ दिन" आपण आम्हाला अच्छे दिन देऊ नका. परंतु आम्हाला वाईट दिवस तरी देऊ नका. आपणास लोकांचे चांगले करता येत नसेल तर त्यांचे वाईट कशाला करता, हा खरा प्रश्न आहे. आमचा शेतकरी सन्मानाने जगण्याचा अधिकार गमावतो तेव्हा त्याला आत्महत्या करण्यावाचून पर्याय नसतो. तेव्हा सरकारने त्यांना दुसरा पर्याय दिला पाहिजे.

सभापती महोदय, आज राज्यात दुष्काळी परिस्थिती असल्यामुळे चारा टंचाई, पाणी टंचाई निर्माण झालेली आहे. जनावरे पाण्यावाचून तडफडत आहेत. आपण त्यांना मरु द्यायचे काय ? आपल्या चुकीमुळे त्यांना मरणाच्या दारामध्ये सोडावे लागत आहे याबद्दल सरकारने गंभीरपणे विचार करण्याची गरज आहे. सुरु असलेल्या चारा छावण्या बंद करण्यात आल्या. परंतु माननीय मुख्यमंत्र्यांनी मध्यस्थी करुन पुन्हा त्या चारा छावण्या सुरु केल्या.

सभापती महोदय, ज्या शेतकऱ्यांनी बँकांकडून कर्ज घेतले आणि ते कर्जाची परतफेड करु शकले नाहीत अशा शेतकऱ्यांच्या मुलांनी उच्च शिक्षणासाठी शैक्षणिक कर्जाची मागणी केल्यानंतर त्यांना कर्ज नाकारण्यात आले, अशाप्रकारच्या तक्रारी माझ्याकडे आलेल्या आहेत. उच्च शिक्षण घेणाऱ्या शेतकऱ्यांच्या विद्यार्थ्यांचा यामध्ये काय दोष आहे ? त्याच्या वडिलांनी कर्ज घेतले परंतु त्यांना दुष्काळी परिस्थितीमुळे ते फेडता आले नाही आणि सरकारने देखील त्यांना काही मदत केलेली नाही. तेव्हा अशा शेतकऱ्यांच्या मुलांना शैक्षणिक कर्ज नाकारणे ही अतिशय गंभीर बाब

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.जोगेंद्र कवाडे.....

आहे. वड्याचे तेल वांग्यावर काढण्याचा हा प्रकार आहे. एकीकडे शेतकरी दुष्काळामुळे हवालदिल झालेला आहे आणि दुसरीकडे आपा त्यांच्या मुलांच्या उच्च शिक्षणाच्या बाबतीत काही करु शकलो नाही. तेव्हा माझी आपल्यामार्फत सरकारला विनंती आहे की, शेतकऱ्यांच्या परिवारातील मुलामुलींनी शैक्षणिक कर्जाकरिता मागणी केल्यास बँकांनी त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा अडथळा आणू नयेत अशाप्रकारे आदेश सरकारने बँकांना द्यावेत.

सभापती महोदय, दुष्काळ हे एक संकट आहे आणि संकटाचा मुकाबला करणे हे आपले नैतिक कर्तव्य आहे. दुष्काळाच्या झंझावातामध्ये सापडलेल्या आमच्या शेतकऱ्यांना उठाव कसा मिळेल, त्यांना मानसिक आधार कसा मिळेल, नैतिक आधार कसा मिळेल, त्यांना आत्महत्यापासून कसे परावृत्त करता येईल, याबाबत शासनाने गंभीरपणे विचार करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, राज्याच्या मंत्रिमंडळाने मराठवाड्याचा दौऱ्यावर जाऊन तेथील भागांची पाहणी केली, ही चांगली गोष्ट आहे. एक कवी असे म्हणतो की, "जरी संकटाची काळरात्र होती, तरी भीमराया तुझी साथ होती." हजारो वर्षापासून अंधारात भटकणाऱ्या अस्पृश्य समाजाला बाबासाहेबांनी साथ दिली आणि त्याला खंबीरपणे, स्वाभिमानाने जगण्याचा अधिकार मिळवून दिला. या समाजाच्यामागे बाबासाहेब खंबीरपणे उभे राहिले. बाबासाहेब देशातील कोट्यवधी दलित लोकांच्या उद्धारासाठी उभे राहू शकतात तर आपले राज्यातील आणि दिल्लीतील सरकार अतिशय शक्तीशाली आहे. तेव्हा आपण शेतकऱ्यांच्या पाठीमागे खंबीरपणे उभे राहिले पाहिजे, अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, मी काही सूचना करणार आहे. आपण शेतक-यांना विहीर आणि विहिरीवर पंप व वीज उपलब्ध करुन दिली पाहिजे. ज्या भागात दुष्काळ असेल त्या भागातील शेतकऱ्यांची विजेची बिले माफ केली पाहिजेत. जलयुक्त शिवार योजना परिणामकारक कशी होईल आणि त्यामध्ये जास्तीत जास्त लोकांचा सहभाग कसा होईल यादृष्टीने प्रयत्न केला पाहिजे. आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या परिवारातील विद्यार्थ्यांची फी-माफ केली पाहिजे आणि सरकारला शक्य असल्यास त्यांच्या परिवारातील मुलांना दत्तक घ्यावे. कर्जबाजारी शेतकऱ्यांच्या मुलांना उच्च

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.जोगेंद्र कवाडे.....

शिक्षणासाठी बँकाकडून शैक्षणिक कर्ज उपलब्ध करुन द्यावे. पाण्याची पातळी वाढविण्यासाठी रेन हार्वेस्टींग करावे. पाणी टंचाईच्या काळामध्ये बंद बाटल्यातील पाण्याचा धंदा जोरात सुरु आहे. एकीकडे लोकांना पिण्यासाठी पाणी मिळत नाहीत, जनावरांना पाणी मिळत नाही, काही शहरांमध्ये 15-20 दिवसांनी नळाला पाणी येते, लातूर शहरामध्ये 28 दिवसांनी पाणी येते, तर दुसरीकडे बंद बाटल्यातील पाणी भरपूर प्रमाणात उपलब्ध होत आहे. या बाटल्यामध्ये पाणी भरण्यासाठी कोठून पाणी मिळते ? आज शेतीसाठी पाणी नाही, पिण्यासाठी पाणी नाही, जनावरांसाठी पाणी नाही, झोपडपट्टीमध्ये पाणी नाही, कष्टकऱ्यांसाठी पाणी नाही, परंतु पाण्याचा धंदा करणाऱ्यांना मात्र मोठ्या प्रमाणात पाणी उपलब्ध होत आहे, हा जो गोरखधंदा सुरु आहे त्याकडे सरकारने गंभीरपणे लक्ष देण्याची गरज आहे.

सभापती महोदय, हे सरकार शक्तीमान आहे असा माझा समज आहे. दिल्लीतील सरकार अत्यंत शक्तीशाली आहे. संपूर्ण जग त्यांच्या शक्तीशालीमुळे प्रभावित झालेले आहे. राज्याचे मुख्यमंत्री आणि ज्येष्ठ मंत्री श्री.एकनाथराव खडसे साहेब हे देखील शक्तीशाली आहेत. परंतु आपण शक्तीहीन होता कामा नये. दुष्काळामुळे महाराष्ट्र शक्तीहीन होत आहे. तेव्हा मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र, खानदेशन, विदर्भ हे भाग शक्तीहीन होणार नाहीत याची दक्षता घेणे आवश्यक आहे.

यानंतर श्री.बोर्डे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.जोगेंद्र कवाडे....

मी विचारु इच्छितो की, आपण नक्षलवाद्यांच्या कारवाया अडवू शकता, मग शेतकऱ्यांच्या आत्महत्या का थांबवू शकत नाहीत ? नक्षलवाद्यांना अडविण्यासाठी आपण वाटेल ते करु शकता, मग शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना का करु शकत नाही ? महोदय, माझी विनंती आहे की, राज्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्याची भूमिका या शासनाच्या माध्यमातून घेणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या व्यथा आणि वेदना शासनाने समजून घ्यावयास पाहिजेत. तसेच राज्यातील शेतकऱ्यांना युध्दपातळीवर कशा प्रकारे दिलासा देता येईल या दृष्टीने प्रयत्न करावयास पाहिजेत.

सभापती महोदय, इंद्रजित भालेराव नावाचा कवी म्हणतो की,

शिक पोरा शिक,
शेतकऱ्याच्या पोरा आता लढायला शिक,
मरु नको, आता मारायला शिक,
शिक पोरा शिक,
शेतकऱ्याच्या पोरा आता लढायला शिक,
ज्याला दिले निवडून, त्याला पाडायला शिक,
शिक पोरा शिक,
शेतकऱ्याच्या पोरा आता लढायला शिक.

सभापती महोदय, आमच्या शेतकऱ्यावर असे म्हणण्याची वेळ येऊ नये याची दखल राज्य सरकारने घ्यावी, एवढेच या निमित्ताने सांगतो.

सभापती महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल आपल्याला धन्यवाद देतो व माझे भाषण संपवितो.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.भाई जगताप (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, नियम 260 अन्वये मांडलेल्या प्रस्तावावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, शहरातील लोकांना शेती समजत नाही असा गैरसमज आहे. मी तर म्हणेन की, शहरातील लोकांनी दुष्काळावर बोलावे काय, येथपासून सुरुवात असते. मी सांगू इच्छितो की, शहरात आलेली मुले ही शेतकऱ्यांचीच आहेत, हे सोयीस्करपणे विसरले जाते. माझे सातवीपर्यंतचे शिक्षण हे जिल्हा परिषदेच्या शाळेत झाले. कोण कोणत्या भागातून येतो आणि जातो हा गौण भाग आहे.

सभापती महोदय, सातत्याने गेल्या चार वर्षांपासून निसर्ग कोपला आहे. सातत्याने चार वर्षे या राज्यातील बळीराजा हा बळी जात आहे. सरकारी यंत्रणेच्या नाकर्तेपणामुळे जास्त बळी जातात याचे दु:ख मनामध्ये आहे आणि ते दु:ख या चर्चेच्या माध्यमातून व्यक्त करण्याचा मी प्रयत्न करणार आहे. या प्रस्तावावर बोलत असताना कदाचित आमची काही शेरेबाजी किंवा बोलणे हे राजकीय वाटत असले तरी आपण जर त्याकडे राजकीय हेतूने बघितले तर तो तुमचा प्रश्न आहे. परंतु या अतिमहत्त्वाच्या आणि संवेदनशील प्रश्नाच्या किंवा जीवन-मरणाच्या प्रश्नाच्या बाबतीत आमच्याकडे राजकीय विरोधक म्हणून पहावयाचे की खऱ्या अर्थाने राज्यातील कष्टकऱ्यांच्या, बळीराजाच्या वेदनेमध्ये आपल्या संवेदना कुठे तरी दाखविण्याचा विचार मात्र आपल्याला करावा लागेल.

सभापती महोदय, माझ्या अगोदरच्या अनेक सन्माननीय सदस्यांनी या प्रस्तावावर आपले विचार व्यक्त केले. सुरुवातीला माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी दीड तास अतिशय सुंदर आणि अतिशय प्रभावीपणे राज्यातील दुष्काळी विदारक परिस्थिती आकडेवारीसह विशद केली. त्यामुळे या प्रस्तावावर बोलताना मी पुन्हा त्या आकडेवारीत जात नाही. मी पुन्हा पुन्हा तीच आकडेवारी सांगणार नाही. सरकारी आकडेवारी नुसार आज 15 हजार गावामध्ये दुष्काळ वा दुष्काळसदृश परिस्थिती जाहीर करण्यात आली आहे. परंतु वस्तुस्थिती अशी आहे की, राज्यातील शेतकरी केवळ हवालदिल झाला नाही तर तो सरकारकडे आत्महत्या करण्यासाठी आर्जव करु लागला आहे. अशा प्रकारची परिस्थिती या राज्यात कधीही निर्माण झाली नव्हती. परंतु याचा संपूर्ण दोष मी

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.भाई जगताप....

सरकारला देणार नाही. गेली तीन-चार वर्षे आम्ही या ठिकाणी अस्मानी संकटाला सामोरे जात असताना केवळ घोषणा करून थांबणार का, हा सर्वात महत्त्वाचा प्रश्न आहे. या सरकारला सत्तेवर येऊन जवळजवळ दीड वर्षे होत आली आहेत. मला आठवते की, या सरकारच्या स्थापनेनंतर राज्य सरकारचे पहिले अधिवेशन नागपूर येथे झाले होते. नागपूरच्या अधिवेशनात याच दुष्काळाच्या प्रश्नावर आम्ही विरोधकांनी सरकारला घेरले होते. त्या अधिवेशनात सरकारने अनेक घोषणा केल्या होत्या. त्या घोषणा करीत असताना अमुक घोषणा ऐतिहासिक आहे, हे इतिहासात कधीही झाले नाही, हे पहिल्या प्रथम झाले, असे सांगितले गेले. या सरकारने ऐतिहासिक घोषणा करून जवळजवळ 16 महिने उलटून गेले आहेत. सरकारने अगोदर केलेल्या घोषणांपैकी नक्की किती घोषणा अस्तित्वात आल्या, किती घोषणांची खऱ्या अर्थाने अंमलबजावणी झाली आणि शेतकऱ्यांना किती फायदा झाला याचा आढावा घेण्याची आवश्यकता आहे. नेमेचि येतो पावसाळा, अशी म्हण आहे. त्यानुसार या सरकारकडून घोषणा केल्या जातात. आपण गेल्या चार वर्षात दुष्काळावर इतक्या सहजपणे बोलून जातो. जे आत्महत्या करतात, जे होरपळत आहेत त्यांच्या मनाचा कधी तरी विचार करण्याचा प्रयत्न केला आहे काय, हा प्रश्न माझ्यासारख्या संवेदनशील सदस्याच्या मनामध्ये येतो.

सभापती महोदय, मी गेल्या 30-35 वर्षांपासून कष्टकऱ्यांचे नेतृत्व करीत आहे. सामाजिक बांधिलकी म्हणून मी अख्ख्या महाराष्ट्राभर वावरत असतो. राज्यभर वावरत असताना ज्या गोष्टी दृष्टीस पडतात त्याबद्दल बोलले पाहिजे आणि ते बोलत असताना त्याचा कोणी राजकीय अर्थ काढला तर मनाला वेदना होतील. हे खरे आहे की, तुम्हा-आम्हाला एकत्र येऊन या प्रश्नाला सामोरे जाणे आवश्यक आहे. परंतु यासाठी कुठे तरी आम्हाला विश्वासात घ्यावयास पाहिजे. या ठिकाणी अनेक वेळा सिंहगर्जना, भिमगर्जना होतात. आम्ही ज्यावेळी बोलतो त्यावेळी आम्हालाच विचारले जाते की, तुम्ही गेल्या 10-15 वर्षात काय केले ? माझा सांगण्याचा हेतू एवढाच आहे की, ज्यावेळी सिंहगर्जना केल्या जातात त्यावेळी सरकारसमोर दीशादर्शक कार्यक्रम असावयास पाहिजे. या सरकारकडून सांगण्यात आले की, आमच्या सरकारने ऐतिहासिक पॅकेज दिले आहे. यापूर्वी कोणत्याही सरकारने दिले नव्हते तेवढे पॅकेज आम्ही दिले आहे, असे सांगितले जाते.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

मागे माननीय केंद्रीय कृषी मंत्र्यांनी सांगितले होते की, अद्यापपर्यंत राज्य सरकारला किती मदत

श्री.भाई जगताप....

पाहिजे या संदर्भातील मागणीच आमच्याकडे आलेली नाही. तद्नंतर पुन्हा राज्य सरकारकडून घोषणा करण्यात आली की, केंद्राकडून अद्यापपर्यंत जेवढी मदत झाली नाही तेवढी मदत म्हणजे 3 हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त मदत आपल्या राज्याला मिळाली आहे. महोदय, माझ्यासारख्या सर्वसामान्य कार्यकर्त्याला प्रश्न पडला की, माननीय कृषी मंत्री तथा सभागृहाच्या नेत्यांनी सांगितले होते की, राज्य सरकारने पॅकेजच्या माध्यमातून 7 हजार कोटी रुपये दिले आहेत. तसेच केंद्र सरकारने 3 हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त मदत दिली आहे. महोदय, जर राज्य सरकारने 7 हजार कोटी रुपये आणि केंद्र सरकारने 3 हजार कोटी रुपये पॅकेजच्या माध्यमातून दिले असतील तर हे 10 हजार कोटी रुपये कुठे गेले ? या 10 हजार कोटी रुपयांचा विनियोग दुष्काळ निवारणासाठी कसा आणि कुठे झाला याबाबत आम्ही विचारणा केली तर आम्ही विरोधक असल्याचे बोलले जाते आणि उलट तुमच्या काळात काय झाले असे विचारले जाते.

सभापती महोदय, सावकारांचे कर्ज भरण्याचा ऐतिहासिक निर्णय यापूर्वी राज्यात किंवा देशात घेतल्याचे मला माहीत नाही. सावकारांना त्यांच्या कर्जाचे 371 कोटी रुपये थेट देऊन त्याचे श्रेय राज्य सरकारकडून घेण्यात आले. असा प्रकार प्रथमच झाला. अशा प्रकारे सिंहगर्जना प्रथमच होते.

एक्स....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. भाई जगताप ....

मला खूप आश्चर्य वाटते. आपल्याकडे कायदा आहे. सावकारी कायदा असे सांगतो की, सावकाराला शेतकऱ्याला शेतीसाठी कर्जच देता येत नाही. शासनाने 371 कोटी रुपये जाहीर केले, ते डायरेक्ट सावकारांना देण्याचे पवित्र काम सरकार का करीत आहे, हे कोणाचे सरकार आहे, सावकारांचे आहे का, शेतकऱ्यांच्या खात्यावर ते पैसे का गेले नाहीत ? ते पैसे त्यांच्या खात्यावर जाऊ द्या, तसे गेले असते तर बरे झाले असते. 371 कोटी रुपयांचा आकडा त्यावेळी ऐतिहासिक म्हणून सांगितला गेला, त्यापैकी 47 कोटी एवढ्या लोकांची कर्जमाफी झाली आहे. किती शेतकऱ्यांनी सावकारांकडून कर्ज घेतले होते ? सभापती महोदय, 5811 शेतकरी सावकारी कर्जवाले होते. 371 कोटी रुपयांपैकी फक्त 89 हजार इतकेच कर्ज आतापर्यंत माफ झाले आहे. ही आकडेवारी सरकारची आहे. ही आकडेवारी काही आमच्या घरातून आणलेली नाही. ही सरकारच्याच उपलब्ध असलेल्या कागदापत्रांवरून सांगत आहे. सावकाराला डायरेक्ट सरकारच्या तिजोरीतून पैसे देण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला, तो निर्णय तरी पूर्ण करा. निदान त्या 5811 शेतकऱ्यांना तरी मोकळे करा. ते मोकळे झालेले नाहीत. कदाचित त्या अधिवेशनात सिंहगर्जना केली होती तसे झाले असते तर आज आत्महत्यांचे प्रमाण काही अंशी कमी सुध्दा झाले असते. मी त्याच अधिवेशनाचा परत एकदा दाखला देतो. सभागृहाचे माननीय नेते श्री. खडसे साहेबांनी तर त्यांच्या अतिशय धुआंधार भाषणात हे सर्व सांगितले आहे. आम्ही सर्व विरोधक उभे राहिलो आणि म्हटले की, तुम्ही हे सर्व फसवे आकडे सांगत आहात. तेव्हा माननीय मुख्यमंत्री उपस्थित होते, त्यांनी उठून सांगितले की, खोदा पहाड़ और निकला चुँहा भी नहीं. ही त्यांची वाक्ये आहेत, माझी वाक्ये नाहीत. सातत्याने 3 वर्षे पडणारा दुष्काळ, त्यामध्ये पिचला जाणारा, भरडला जाणारा, आत्महत्या करणारा शेतकरी त्याबद्दल आम्ही विरोधक बोलत आहोत. आम्ही काही आकडेवारी सांगत आहोत, वस्तुस्थिती सांगत आहोत, त्याबाबतीत उल्लेख नाही. उल्लेख कशाचा तर, खोदा पहाड़ और निकला चूँहा भी नहीं. काही हरकत नाही. चूँहा भी नहीं निकला, कोई बात नहीं, मगर उसके बाद क्या हुआ ? सभापती महोदय, त्यानंतरची माननीय मुख्यमंत्र्यांची आणि माननीय

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. भाई जगताप ....

कृषीमंत्र्यांची काय वाक्ये आहेत ते पहा. ते म्हणाले की, अशी कर्जमाफी करून आत्महत्या थांबतात का ? सभापती महोदय, आम्ही असा कधीही दावा केलेला नाही की, कर्जमाफी झाल्यानंतर 100 टक्के आत्महत्या थांबल्या. परंतु, आपल्याला आठवत असेल की, सन 2007 ते सन 2008 च्या दरम्यान केंद्र सरकारने 72 हजार कोटी रूपयांच्या कर्जमाफीचा निर्णय घेतला, राज्याला त्याचा मेजर वाटा आला. हा तत्कालीन आघाडी सरकारने घेतलेला निर्णय होय. त्या 3 वर्षांत आत्महत्या कमी झाल्या. मी आकडेवारीमध्ये जात नाही. माझ्याकडे सर्व आकडेवारी आहे. तुमच्याकडेही ती आहे. आत्महत्या कमी झाल्या. कोणत्या आधारे राज्याचे प्रमुख असे म्हणतात की, कर्जमाफी केल्याने आत्महत्या थांबत नाहीत ? पण तरीही आम्ही तुमच्या बोलण्यावर विश्वास ठेवला. तुम्ही शेतकऱ्यांच्या बांधावर गेलात, शेतकऱ्यांबरोबर गप्पा मारल्या. राज्याचा प्रमुख म्हणून आता त्याचा उल्लेख झाला. भीऊ नकोस मी तुझ्या पाठीशी आहे हे सांगण्याचा प्रयत्न केला, आम्ही त्याचे स्वागत केले. आम्हाला त्याबद्दल काही वाईट वाटण्याचे कारण नाही. पण तुम्ही नेमके काय केले ? शेतकऱ्यांच्या बांधावर गेलात आणि हे सर्व सांगितले. पण नेमके तुम्ही काय केले, ते आम्हाला सांगावे. त्यावेळी तुम्ही एक वाक्य आणखी सांगितले होते की, कर्जमाफीने काहीही होणार नाही. आता तत्काळ काही मदत आणि दीर्घ काळाची योजना करू जेणेकरून हा शेतकरी स्व: बळावर उभा राहिला पाहिजे आणि आत्महत्या करण्याचा विचारच त्याच्या मनात येता कामा नये. तुमचीच ही वाक्ये आहेत. ही राज्याच्या प्रमुखांची माननीय मुख्यमंत्र्यांची व माननीय कृषी मंत्र्यांची वाक्ये आहेत. तुम्ही असे म्हणाला, त्यानंतर या दीड वर्षांत काय नेमके राज्याचे चित्र आहे ? आम्ही दुष्काळाच्या बाबतीत खाली बसलो हातो, तेव्हा काही लोक कुत्सितपणे टिप्पणी करीत होते की, काय दुष्काळाचे बोलत आहेत. मला कमाल वाटते. जर त्या सर्व उपाययोजना दुष्काळाच्या निवारणासाठी योग्य रितीने केल्या असत्या, कर्जमाफी केली असती तर कदाचित असे घडले नसते. आज चौथ्या वर्षी सुध्दा आपण अस्मानी संकटाला सामोरे जात आहोत. तुम्ही-आम्ही सर्वच सामोरे जात आहोत. तो तुमचा दोष नाही. परंतु कदाचित ही दाहकता तुमच्या आमच्या समोर दररोज काही ना काही रूपाने येत आहे. आम्ही आकडेवारीवर खरोखर जोर देणार नाही. 30 दिवसांत, 40 दिवसांत

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. भाई जगताप ....

एवढ्या आत्महत्या झाल्या ही सर्व आकडेवारी माझ्याकडे असताना सुध्दा मी सांगणार नाही. आपण कधी तरी राजकारणाच्या पलीकडे जाऊन पाहणार की नाही ? शेतकरी ज्याच्यासाठी येथे भाषणे करतो, अगदी निवडणुकीच्या काळात भडाभडा बोलतो, सर्व सांगतो, तुमच्यामुळे आमचे सरकार आले असे सांगतो. मात्र ज्यावेळी त्याला देण्याची वेळ येते किंवा त्याला संकटकाळी मदत करण्याची वेळ येते, त्यावेळी नुसत्या घोषणा करतो, त्या घोषणा तरी किती अंमलात आल्या आहेत याचा कधी तरी विचार करणार आहोत की नाही ? मला खरोखर अनेक गोष्टींचे आश्चर्य वाटते. मला वाटते की, सरकारच्या उत्तरात याला स्पर्श होणे किंवा याचा उल्लेख होणे आवश्यक आहे. परवा अधिवेशन सुरू झाले. कालच माननीय कृषी मंत्री म्हणाले की, रब्बी हंगामाचा दुष्काळ जाहीर केला ही ऐतिहासिक अशी पहिली वेळ आहे. हे खरे आहे. परंतु हे जाहीर करताना, आपल्यासमोर पर्यायच नाही. कारण अस्मानी संकट आहे, जे गेल्या वर्षी, त्याच्या अगोदरच्या वर्षी आणि या वर्षी सुध्दा सातत्याने आले आहे. त्यामुळे आपल्यासमोर दुसरा पर्याय नाही. मात्र तरी सुध्दा तुम्ही अभिनंदनाला पात्र आहात. आपण ऐतिहासिक घोषणा केली हे आम्ही मान्य करतो. आम्हाला अपेक्षित आहे. माननीय कृषी मंत्री श्री. खडसे साहेब, आम्ही तुमची भाषणे 8-8 तास ऐकली आहेत. एकही मुद्दा रिपिट न होता भाषणे केली आहेत, मग ती भाषणे राज्याच्या आर्थिक स्थितीवर असोत, दुष्काळावर असोत किंवा कोणत्याही विषयावर असोत. आम्ही खालच्या सभागृहात तुमची भाषणे ऐकली आहेत. आज आम्हाला ते माननीय श्री. खडसे साहेब हवे आहेत, आम्हाला ते माननीय श्री. एकनाथ खडसे साहेब अभिप्रेत आहेत, जे तळमळीने तुटून सरकावर पडत होते आणि शेतकऱ्यांचा, कष्टकऱ्यांच्या प्रश्नावर जाब विचारीत होते. आज आम्ही जाब विचारला तर कृपया पाठीमागे बोट दाखवू नका, तुमच्या 15 वर्षांत काय झाले हे विचारू नका. होय, मला माहीत आहे की, राज्याची परिस्थिती आपण सांगितलेली आहे. पण आपली पत अजून आहे. कर्ज घ्यायला तुम्हाला कोणी अडविले आहे ? मी वर्तमानपत्रामध्ये वाचले. कारण त्याची चर्चा होत नाही, होऊही नये. तुम्ही कर्ज घ्यावे. तुम्हाला कोणी अडविले आहे ? हीच गोष्टी आम्ही त्याहीवेळी सांगितली होती. केंद्र सरकारकडून खरे तर हे अपेक्षित आहे. मी हे का अपेक्षित आहे हेही

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

11-03-2016 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) X.4

MSK/ AKN/ KTG/ MMP/ AKN/ 15:50

श्री. भाई जगताप ....

सांगतो. गेल्या दीड-दोन वर्षांत देशाचे नव्हे तर संपूर्ण जगाचे सुदैव आहे की, पेट्रोलजन्य पदार्थांचे भाव खाली आले आहेत. सभापती महोदय, त्या माध्यमातून या देशाच्या तिजोरीमध्ये कमीत कमी अडीच लाख कोटी रुपये जमा झाले आहेत.

....Y

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.भाई जगताप.....

परंतु, देशाच्या अर्थसंकल्पात ते आम्हाला कोठे दिसले नाही. अर्थात, हा केंद्र सरकारशी संबंधित मुद्दा आहे. आज कमी-अधिक प्रमाणात देशात सगळीकडे अशाच प्रकारची स्थिती आहे. राज्यातील शेतकरी तर हवालदिल झालेलाच आहे. परंतु, देशातील शेतकरी देखील हवालदिल झालेला आहे. मग आमच्या माननीय पंतप्रधानांना असे का वाटले नाही की, त्यांना मदतीचा हात द्यावा ? देशाचा अर्थसंकल्प सादर होण्यापूर्वी माननीय पंतप्रधानांनी एका शेतकरी रॅलीमध्ये असे सांगितले होते की, "मेरे देश का किसान इस देश की रिढ है." म्हणजेच देशातील शेतकरी हा देशाचा कणा आहे. परंतु, त्यांच्यासाठी अर्थसंकल्पात काय आहे ? त्या अर्थसंकल्पाचीही आम्ही चिरफाड करण्याची तयारी केली आहे. परंतु, येथे आपल्या राज्याचा विचार आहे. ज्या पध्दतीने सन 2007-2008 मध्ये तत्कालीन युपीअे सरकारने निर्णय घेतला आणि देशभरातील शेतकऱ्यांचे 72 हजार कोटी रुपयांचे कर्ज माफ केले होते. त्याप्रमाणे आम्हाला अपेक्षा होती. आज आपल्याकडे अडीच लाख पेट्रो डॉलर शिल्लक राहिले आहेत. त्यापैकी 1 लाख पेट्रो डॉलर आपण शेतकऱ्यांसाठी का वापरले नाहीत ? केवळ घोषणांचा सुकाळ आणि प्रत्यक्षात काही नाही, अशा प्रकारची जी काही परिस्थिती देशात आणि राज्यात आपण पाहतो आहेत, त्याबाबत आम्ही बोलत आहोत.

सभापती महोदय, मला आणखी एका गोष्टीचा उल्लेख येथे करावासा वाटतो. मी आकडेवारीमध्ये जाणार नाही. कारण, माझ्या पूर्वीच्या वक्त्यांनी या संदर्भातील आकडेवारी सभागृहासमोर ठेवलेली आहे. आम्हाला अपेक्षा आहे, आशावाद आहे की, 18 तारखेला बजेट सादर केले जाईल. राज्याचे बजेट ठेवले जात असताना कमीतकमी राज्याच्या बजेटमध्ये तरी दुष्काळ निवारणाच्या दृष्टीने आणि शेतकऱ्याला, बळीराजाला दिलासा देण्याच्या दृष्टीने काही तरी असेल, अशा आशावाद आम्हाला आहे. सर्वच अधिवेशनांमध्ये आम्ही असा आशावाद बाळगला होता. पण घडले काहीच नाही. तरी सुध्दा आम्ही आशावादी आहोत. ऐतिहासिक घोषणा करीत असताना काही अन्य ऐतिहासिक गोष्टी आपल्या अर्थसंकल्पात असाव्यात, अशा प्रकारचा आशावाद मी या ठिकाणी व्यक्त करीत आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.भाई जगताप.....

सभापती महोदय, मला एका गोष्टीचे आश्चर्य वाटते. मी जिल्हानिहाय बाबींचा उल्लेख येथे करणार नाही. पण काही साध्या साध्या गोष्टी आहेत, त्यांची अंमलबजावणी का होत नाही ? मी पूर्णत: सरकारने घेतलेल्या निर्णयांना दोष देणार नाही. परंतु, त्यांची अंमलबजावणी का होत नाही, असा माझा प्रश्न आहे. एक उदाहरण मी आपल्याला देणार आहे. आपण चारा छावण्यांचा उल्लेख केला. औरंगाबाद जिल्ह्यात चारा छावण्यांची मागणी आहे. या सभागृहाच्या नेत्यांनी आणि मुख्यमंत्री महोदयांनी सांगितले होते की, मागेल त्याला शेततळी देऊ. शेततळी हा नंतरचा भाग झाला. त्याची सुरुवात तर आपण यापूर्वीच करावयास हवी होती. जलयुक्त शिवार वगैरे योजनांच्या बाबतीत मी काही बोलणार नाही. परंतु, आजच्या घडीला जे आवश्यक आहे, त्याबाबतीत मी बोलणार आहे. औरंगाबाद जिल्ह्यात आजच्या घडीला 7 लाख जनावरे आहेत. या जनावरांसाठी आकाशातून चारा येणार आहे का ? प्रत्येक महिन्याला 1 लाख मेट्रीक टन चारा त्या ठिकाणी लागतो. तो कोठुन आणावयाचा, कसा आणावयाचा ? त्या छावण्या बंद करण्याचा निर्णय झाला. त्यानंतर उद्रेक झाला आणि मग मुख्यमंत्री महोदयांना इंटरव्हेन करावे लागले. सरकारमध्ये एकवाक्यता नाही. आपल्या दोघांनाही माहीत आहे की, परिस्थिती वाईट आहे. आपल्या दोघांनाही माहीत आहे की, परिस्थिती हाताबाहेर गेलेली आहे. तरी सुध्दा आपल्यामध्ये मतभेद आहेत. कृषी मंत्री महोदय असे म्हणतात की, भरपुर चारा आहे आणि मुख्यमंत्री महोदय म्हणतात की, असे चालणार नाही, छावण्या सुरु कराव्या लागतील. ही जर सरकारची स्थिती असेल तर बळीराजाने कोणाकडे बघायचे ? आम्ही विरोधक काय बोलतो आहोत यापेक्षा जे दररोज आत्महत्या करण्यासाठी आपल्याकडे परवानगी मागत आहेत, त्यांनी यामधून काय अर्थ काढायचा, हा महत्वाचा प्रश्न आहे.

सभापती महोदय, नेहमीच असा दावा केला जातो की, दुष्काळ निवारणासाठी एक पैसाही आम्ही कमी पडू देणार नाही. मंत्री महोदयांच्या उत्तरात 100 टक्के हे वाक्य असणार आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

औरंगाबाद जिल्ह्यासाठी 321 कोटी रुपये निधीची आवश्यकता आहे. हा शासनाचाच सर्व्हे आहे.

आतापर्यंत फक्त 183 कोटी रुपये देण्यात आले आहेत. उर्वरित 138 कोटी रुपयांचा निधी त्या जिल्ह्याला प्राप्तच झालेला नाही. मग आपण दुष्काळ निवारण कसे करणार आहात ? आपणच म्हणाला होता की, मागेल त्याला शेततळी आणि चारा छावण्या आम्ही देऊ. तुम्ही या संदर्भातील निकषही बदलले आहेत. त्यावर मी आता बोलणार नाही. कारण, हे अधिवेशन मोठे आहे. पुरवणी मागण्यांवर बोलत असताना आम्ही या मुद्यावर बोलू. मी येथे फक्त लातूर, उस्मानाबाद, मराठवाड्यातील 15 हजार पेक्षा जास्त गावे आणि आता रब्बीचा दुष्काळ जाहीर केल्यामुळे त्यामधील गावे, यांच्या बाबतीत बोलत आहे. माझा प्रश्न असा आहे की, जिल्हाधिकारी खरे बोलत आहेत की, आपण खरे बोलत आहात ? याची माहिती या सभागृहाला, महाराष्ट्रातील जनतेला आणि शेतकऱ्याला मिळाली पाहिजे. एकीकडे आपण भीमगर्जना करीत आहात. शेतकऱ्याला एक पैसाही कमी पडणार नाही, अशी गर्जना आपण करीत आहात आणि दुसरीकडे जिल्हाधिकारी म्हणतात की, आम्हाला 136 कोटी रुपयांचाच निधी मिळाला आहे.

सभापती महोदय, आपण दुष्काळाचा आढावा घेतो. माझा अनुभव असा आहे की, अधिकाधिक पिकांचा समावेश त्यामध्ये केला जातो. कोकणातील आंबा असो किंवा बागायती क्षेत्रातील अन्य पिके असोत, त्यांचा समावेश करण्याचा प्रयत्न सरकार करीत असते. येथे असे काय झाले की, कापूस बाहेर काढला गेला, केळी उत्पादनाचा समावेश केला गेला नाही. केळी उत्पादकांचे हे म्हणणे आहे की, आम्हाला बाहेर ठेवण्यात आले आहे. अशी काय जादू झाली की, राज्यातील कापूस उत्पादक, केळी बागायतदार सुजलामसुफलाम झाले. त्यांना मदतीची गरज नाही का ?

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, मला सन्माननीय सदस्यांच्या भाषणात व्यत्यय आणावयाचा नाही. परंतु, रेकॉर्डवर चुकीचे येऊ नये म्हणून खुलासा करावयाचा आहे.

सभापती महोदय, कापूस, केळी या पिकांसाठीचे आदेश 15 दिवसांपूर्वीच निर्गमित केलेले आहेत व जिल्हा स्तरावर पैसेही वाटले आहेत. ज्या पिकांना पीक विमा योजनेचा लाभ मिळणार

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

नाही, अशा कापूस उत्पादक शेतकऱ्यांना मदत करण्याचा निर्णय सरकारने घेतलेला आहे व 1 हजार कोटी रुपयांची तरतूद केली आहे. फक्त त्याचे वितरण अद्याप झालेले नाही.

...4....

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, मंत्री महोदय त्यांच्या उत्तराच्या भाषणतूनही याबाबतचा खुलासा करु शकले असते.

यानंतर श्री.बोरले.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.भाई जगताप.....

राज्यात असे काही व्यक्तिमत्व आहेत की, ते हृदयापासून बोलतात. त्यामध्ये माननीय श्री.एकनाथराव खडसे साहेबांचा क्रमांक वरचा आहे. ते समोर बसलेले आहेत म्हणून मी हे बोलत नाही. परंतु, ते संवेदनशील दिसत नाहीत. आता त्यांनी सरकारी उत्तर दिलेले आहे. (...अडथळा..) आता आपण माझे उत्तर ऐकून घ्यावे. मी आता आपल्याला खडसावून विचारत आहे की, शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे कारण काय आहे ? स्वामीनाथन समितीने शासनाला अहवाल दिलेला आहे. मी काही सांगण्याची आवश्यकता नाही. स्वामीनाथन समितीच्या अहवालाचे शासनाने तंतोतंत पालन करावे, असा आम्ही विरोधक म्हणून आग्रह केला तरी त्यातील काही गोष्टी महत्वाच्या आहेत की नाही ? मागील शासनाने 15 वर्षात काय केले, असे तुम्ही नेहमी अंगुलिनिर्देश करता, बोट दाखविता. आम्ही सर्व पिकांसाठी दिलेला हमी भाव आणि आताच्या सरकारने मागील दिड वर्षात दिलेला हमी भाव याबाबत आपण माहिती द्यावी. आपण त्यावर चर्चा करु शकतो. आपण दिलेला हमी भाव काय आहे ? केंद्र शासन देशाचा विचार करुन निर्णय घेते. प्रत्येक राज्याने भौगोलिक परिस्थितीचा विचार करुन अनेक वेळा निर्णय घेतलेले आहेत. मग आपण निर्णय का घेतला नाही, असा आमचा प्रश्न आहे. आपण आपल्या पक्षाचा वचननामा काढून बघावा. तो वचननामा मी लिहिलेला नाही, तो तुम्हीच लिहिलेला आहे. मी त्या संदर्भात बोललो तर आपण म्हणाल की, मी राजकीय बोलत आहे. म्हणून मी त्या संदर्भात बोलणार नाही. माझे म्हणणे असे आहे की, ज्या शेतकऱ्यांच्या आत्महत्या होतात त्यामध्ये कापूस उत्पादक शेतकऱ्यांचा आकडा सर्वात जास्त आहे. मग ज्यावेळी आवश्यकता आहे त्यावेळी सरकार शेतकऱ्यांना दिलासा देणार नाही काय ? एकीकडे आपण ऐतिहासिक 7 हजार कोटी, 3 हजार कोटी, 10 हजार कोटी रुपये आल्याचे सांगत आहात. आपण सावकारांचे 300 कोटी रुपये देणार असल्याचे सांगता. मग शेतकऱ्यांना आधार द्यायला नको काय ?

सभापती महोदय, मी आपल्याला वर्धा जिल्ह्यातील शेलू कृषी उत्पन्न बाजार समितीमधील उदाहरण सांगू इच्छितो. सन 2014-15 मध्ये शेलू कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये प्रशासक नेमण्यात आला आणि त्याच्या देखरेखीखाली 450 कापूस उत्पादक शेतकऱ्यांनी श्री.टालाटूले नावाच्या व्यापाऱ्याला कापूस विकला. तो टाळाटाळ करतो हा भाग वेगळा आहे. तो टाळाटाळ

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.भाई जगताप.....

करतो हे आम्ही समजू शकतो. परंतु, सरकार टाळाटाळ का करीत आहे, हा माझा प्रश्न आहे. मी हा विषय मांडण्यासाठी सभागृहात पहिल्या दिवशी उभा राहिलो होतो. परंतु, त्यावेळी मला तत्काळ खाली बसविण्यात आले आणि सांगण्यात आले की, ज्यावेळी दुष्काळावर चर्चा होईल त्यावेळी आपण या संदर्भात बोलावे. ते लोक आमरण उपोषणाला बसलेले होते. त्यावेळी या गोष्टीला 11 दिवस झाले होते. त्यांच्या आयुष्याचा एक-एक तास महत्वाचा आहे. परंतु, त्याबाबत सरकार गंभीर वाटले नाही. का ? आम्ही आकडेवारी सांगणार असू किंवा एखादा मुद्दा मांडणार असू तर तो राजकीय होतो ? मी एका गोष्टीचे स्वागत करतो. मी परवा पत्रकारांना माहिती दिली. त्या संदर्भात काल बैठक झाली. माननीय वित्तमंत्री, माननीय सहकार मंत्री आणि माननीय पालकमंत्री यांच्या बरोबर बैठक झाली. माननीय श्री.एकनाथराव खडसे साहेब, मला जे वाईट वाटले ते मी सांगत आहे. त्या बैठकीला वित्त विभागाचे अधिकारी, जिल्हाधिकारी, डीडीआर इत्यादी अधिकारी उपस्थित होते. कारण, तो निर्णय घेणे आवश्यकच होते. ते 450 शेतकरी एवढे हवालदिल झाले की, मोर्चे काढताना त्यांच्याकडून काही चुकाही झालेल्या आहेत. मी त्याचा उल्लेख करणार नाही. कारण, त्या बैठकीत माननीय वित्त मंत्र्यांनी त्याचा उल्लेख केलेला आहे. मी तो विषय तेथे सोडून दिला. परंतु, आज शेतकरी हवालदिल झालेले असताना मागील दोन-अडीच वर्षापासून त्यांचे 8 कोटी रुपये बुडविण्यात आलेले आहेत. कृषी उत्पन्न बाजार समितीच्या त्या व्यापाऱ्याने त्या शेतकऱ्यांचे पैसे बुडविलेले आहेत. मग सरकार त्या शेतकऱ्यांकडे लक्ष देणार नाही काय ? तुमच्या अधिकाऱ्यांनी काय उत्तर दिले ? मी त्यांना सांगितले की, ही शासनाची जबाबदारी आहे. वित्त विभागाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, ती ऑटोनॉमस बॉडी आहे. आम्ही काही आज केजीमधून आलेलो नाही. कृषी उत्पन्न बाजार समित्या किंवा इतर कोणतेही बोर्ड शासनाच्या नियंत्रणाखाली चालते. मग शासनाचा प्रशासक त्या ठिकाणी का बसला होता ? त्यांच्या उपस्थितीमध्ये, देखरेखीखाली 450 शेतकऱ्यांनी 20 हजार टन कापूस विकलेला असताना शासनाने हात वर करावयाचे काय ? अधिकारी म्हणतात की, सरकार कसे काय पैसे देणार ? कमालच आहे. मला आश्चर्य वाटले. मी डीडीआर, जिल्हाधिकारी यांच्याकडे हा मुद्दा मांडला होता. त्यांनी शासनाला प्रस्ताव दिलेला आहे. शासन विशेष बाब म्हणून हे करु शकते. मला हे सांगताना मनापासून प्रचंड

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.भाई जगताप.....

वेदना होत आहेत. मी त्या बैठकीत या संदर्भात उल्लेख केला. वित्त विभागाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, अशी विशेष बाब वगैरे काही होत नाही, असे पैसे देता येत नाहीत. मग तुम्ही 371 कोटी रुपये कसे दिले ? सावकारांना पैसे देण्याची कोणत्या कायद्यात तरतूद आहे ? सरकारने सावकारांना थेट पैसे देण्याबाबत देशातील एक तरी कायदा आपण आम्हाला सांगावा. तुम्ही सावकारांना पैसे देण्यासाठी विशेष बाब करु शकता आणि तुमच्या डोळ्यासमोर शेतकऱ्यांचे 8 कोटी रुपये बुडत आहेत त्यासाठी तुम्ही विशेष बाब करु शकत नाहीत. अधिकाऱ्यांनी मला सांगितले की, भाई आपण आम्हाला असे एक उदाहरण दाखवावे. ते मला विचारतात ? मग तुम्ही प्रशासक म्हणून तेथे काय काम करीत आहात ? तुम्ही तेथे आयएएस, आयपीएस अधिकारी म्हणून काम करीत आहात. हे तुमचे काम आहे. आम्हाला काय विचारता की, आपण आम्हाला एक उदाहरण दाखवावे. दुर्दैवाने त्याचीच री माननीय अर्थमंत्री आणि सहकार मंत्र्यांनी ओढली. मला अपेक्षा वेगळी होती. तुम्ही दोन दिवसापूर्वी अधिकाऱ्यांना फोन करुन सांगितले की, हे काम झाले पाहिजे. ते काम दोन दिवसात झाले. तो रेफरन्स तुम्हाला माहिती आहे. आपण शेतकऱ्यांसाठी, मागासवर्गीयांसाठी, आदिवासींसाठी, अल्पसंख्याकांसाठी, तरुणांसाठी, शिक्षणासाठी विशेष बाब करावी. अधिकारी आम्हाला प्रश्न विचारतात की, अशी विशेष बाब करता येते काय आणि ते खात्रीपूर्वक सांगतात की, असे कधीच झालेले नाही. मग काय सांगावयाचे, हे आपणच सांगावे. आपण अनेक वर्षापासून राज्यात काम करीत आहोत. आपण अनेक वर्षापासून या सिस्टीममध्ये काम करीत आहोत. अधिकाऱ्यांची एवढी मग्रुरी, अधिकारी राज्याचे मालक झालेले आहेत काय ? सावकारांना पैसे देतांना का त्रुटी काढली नाही ? त्यावेही त्यांचे तोंड कोणी दाबले होते काय ? शेतकऱ्यांना मदत करताना तुम्हाला कायदा दिसतो. मी कायद्यातील तरतुदींचा सन्मान करतो. श्री.टालाटुले यांची प्रॉपर्टी अटॅच केलेली आहे. त्याला अटक झाली, नंतर त्याची जामिनावर सुटका झाली, ही वेगळी गोष्ट आहे. नागपूर शहरात त्याचा मोठा आलिशान बंगला आहे. प्रॉपर्टी जप्त करताना त्याची सर्व प्रॉपर्टी जप्त केली पाहिजे. परंतु, सर्व प्रॉपर्टी जप्त केली नाही, याचे मला आश्चर्य वाटले. तेथील जिल्हाधिकारी चांगले काम करतात. मी या प्रकरणात माहिती घेतली म्हणून मी सांगतो की, ते चांगले काम करीत आहेत. मी त्यांना विचारले की, तुम्ही यातून त्याचे घर कसे

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.भाई जगताप.....

काय वगळले ? शेतकऱ्यांचे 8 कोटी रुपये देण्याचे शासनाचे काम आहे, कर्तव्य आहे आणि उद्या जर तुम्ही त्याच्या प्रॉपर्टीचा लिलाव करुन शेतकऱ्यांना पैसे देणार असाल तर ती प्रॉपर्टी किती आहे ? परंतु, त्याचा बंगला जप्त करण्यात आला नाही आणि कालच्या बैठकीत तो निर्णय झाला. ते आज घेतले किंवा नाही, याची मला माहिती नाही. मी विरोधक म्हणून याचा बाऊ केला असता. परंतु, मी काल पत्रकारांकडे गेलो नाही.

..2A-1/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.भाई जगताप...

आज ते उपोषण आश्वासन देऊन सोडणे महत्वाचे होते. तुम्ही व आपण कोणत्याही बाजूला बसलो तरी ते महत्वाचे नाही. राज्यातील संवेदनशील प्रश्न हाताळीत असताना आपणाला राजकारण करता येणार नाही. मी असे राजकारण केलेले नाही. उपोषण कर्त्यांशी मी काल रात्री व आज सकाळी बोललो आहे. त्या ठिकाणी जिल्हाधिकारी गेले व उपोषण सोडण्यात आले आहे. सांगण्याचा उद्देश असा आहे की, आज जी यंत्रणा दुष्काळ निवारणासाठी अस्तित्वात आहे त्या आकडेवारीवर मी बोललो तर मला देखील दीड दोन तास बोलता आले असते. किती तास बोललो ही बाब माझ्यासाठी महत्वाची नाही. ते मुद्दे बाजूला ठेऊन मी हे सर्व बोलत आहे.

सभापती महोदय, मला या ठिकाणी मुद्दाम सांगावेसे वाटते की, मंत्री महोदयांनी आपल्या भाषणात या बाबींचा खुलासा केला पाहिजे. आज आपण मार्च महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात असताना मोठ्या प्रमाणात पाणी टंचाई जाणवत आहे. पुढील तीन महिन्यात पाण्याची व्यवस्था कशी करण्यात येणार आहे. लातूर शहराला 28 दिवसांतून एकदा पाणी मिळते. लातूर येथे पाऊस जुलै महिन्याच्या शेवटी येतो. कोकणासारखा जून महिन्यात त्या भागात पाऊस पडत नाही. यासाठी सरकार काय उपाययोजना करणार आहे व यासाठी किती निधी ठेवण्यात आलेला आहे. जिल्हाधिकाऱ्यांना किती अधिकार देण्यात आले आहेत. परत या विषयावर राजकारण होईल. मागील सरकारने दुष्काळ निवारण्यासाठी संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना निधी वाटपाचे अधिकार त्याच ठिकाणी दिले होते. आपण फक्त टँकरची जंत्री गोळा करणार आहात काय ? इतके टँकर झाले, अमुक टँकर झाले, परंतु टँकर भरायला पाणी कोठे आहे. मंत्री महोदयांकडून आम्हाला मोठ्या अपेक्षा आहेत, मला माहिती आहे की, काही गोष्टीबाबत आपणाला मर्यादा आहेत, तरी देखील मी आपणाला विनंती करतो की, आपण एक धाडसी पाऊल उचला आणि घ्या कर्ज. या राज्यातील शेतकऱ्यांना तुम्ही सांगितल्याप्रमाणे व आम्ही मागणी केल्याप्रमाणे 7/12 चा उतारा कोरा करा. शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमाफी करण्यात यावी. हा शेतकरी गेल्या चार वर्षापासून सतत आयुष्याशी झगडत आहे, कुटुंबाशी झगडत आहे, स्वतःच्या मरणाशी झगडत आहे. या शेतकऱ्याला यापासून मुक्त करण्यात यावे. शासनाने संपूर्ण कर्जमाफी करावी अशी मी अपेक्षा व्यक्त करतो व माझे भाषण संपवितो. जयहिंद, जय महाराष्ट्र.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विनायक मेटे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेते श्री.धनंजय मुंडे व इतर सन्माननीय सदस्यांनी नियम 260 अन्वये जो प्रस्ताव मांडलेला आहे त्यावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, या विषयावर चर्चा करीत असताना प्रामुख्याने दोन विषय अतिशय महत्वाचे आहेत, एका बाजूला दुष्काळाचा विषय असून दुसऱ्या बाजूला शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहेत. या दोन्ही विषयावर बोलत असताना शेतकऱ्यांच्या आत्महत्या याच वर्षात होत आहेत असे नसून गेल्या अनेक वर्षापासून शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहेत. त्यांची आकडेवारी किती आहे, याच्या खोलात जाण्याची गरज नाही. अनेक वर्षापासून शेतकऱ्यांच्या आत्महत्या सुरु आहेत. दुष्काळाची परिस्थिती देखील या वर्षासाठी नवीन नाही. मराठवाडा मागील चार वर्षापासून दुष्काळाला सामोरे गेलेला आहे. या भागात कधी कोरडा तर कधी ओला दुष्काळ पडलेला आहे.

सभापती महोदय, या दोन्ही विषयाबाबत मागील व आताचे सरकार आपापल्या परीने आवश्यक ती उपाययोजना व मदत करीत आहे. सरकार दुष्काळात कामे करीत असताना इतर अनेक संस्था शेतकऱ्यांसाठी मदत करीत आहे, यामध्ये नाना पाटेकर यांची 'नाम' संस्था काम करीत आहे. मारवाडी युवा मंच आहे, मराठवाडा लोकविकास मंच यांच्या माध्यमातून दुष्काळात कामे करण्यात येत आहेत. अनेक संस्था कामे करीत आहेत, व्यक्तीगत लोक देखील दुष्काळात सरकारच्या बरोबरीने कामे करीत आहेत, त्यांची नावे देखील आपणाला माहिती नाहीत. अशा सर्व बाजुने प्रयत्न होत आहेत तरी देखील ते अपूर्ण पडत आहेत, याचे कारण निसर्गानेच आपणाला पाण्याचे व अन्न धान्याचे अपूरे दान दिले आहे. तरी मी सरकारचे खरोखर कौतुक करतो की, सरकारने दुष्काळी भागात अनेक उपाययोजना केल्या आहेत, परंतु मला भीती अशी वाटते की, ही बाब माननीय विरोधी पक्ष नेत्यांना माहिती असावी. ज्या उपाययोजना केलेल्या आहेत, त्या उपाय योजनेनुसार दुष्काळ ही वाईट गोष्ट असली तरी काही लोकांच्या दुष्टीने ती फायद्याची गोष्ट आहे की, काय अशा पध्दतीने काही लोकांच्या लॉब्या तयार होऊ लागल्या आहेत, याबाबत चिंता वाटत आहे. उदाहरण द्यावयाचे झाले तर सरकारने पिवळे,नारिंगी किंवा केशरी असे कोणत्याही कार्डाचे बंधन न ठेवता सरकट दोन रुपये किलो गहू व तीन रुपये किलो दराने तांदूळ देण्याची योजना सुरु केलेली आहे. ही अत्यंत चांगली योजना असून ती सर्व सामान्य लोकांपर्यत पोहचू

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

11-03-2016 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) AA-3

VVK/ AKN/ KTG/ प्रथम श्री.बोरले... 16:20

श्री.विनायक मेटे...

शकलेली नाही. यामध्ये सरकारची चूक नाही. यामध्ये वाटप करणाऱ्या यंत्रणेची चूक आहे. हा विषय मी अनेक वेळा सभागृहात उपस्थित केलेला आहे. बीड जिल्ह्यातील उदाहरण पाहिले तर आज देखील बीड जिल्ह्यातून हैद्राबाद येथे धान्य जात आहे. सरकारी योजनेतून जे धान्य देण्यात येते ते लोकांपर्यंत पोहचत नाही. हा खरा महत्वाचा प्रश्न आहे.

सभापती महोदय, आपण एमआरईजीएसच्या माध्यमातून कामे दिली आहेत. अनेक कामांना मान्यता दिली आहे. आजच्या तारखेचा मी बीड तालुक्याचा रिपोर्ट नेटवरून काढला आहे. एमआरईजीएसवर चार हजार मजूर काम करतात असे दर्शविण्यात आले आहे. या मजुरांपैकी मी फक्त काही मोजकी गावे आपणाला वाचून दाखवितो. महसूल मंत्री महोदयांनी या विषयाकडे गांभीर्याने लक्ष देण्याची आवश्यकता आहे. नाळवंडी गावात 300 मजूर दाखविण्यात आले आहेत. देवीबाभळ गावात 200 मजूर दाखविण्यात आले आहेत, वेलूरी गावात 420 मजूर दाखविण्यात आले आहेत. काठवडे गावात 120 मजूर दाखविण्यात आले आहेत. उमराव जहांगीर येथे 146 मजूर दाखविण्यात आले आहेत, बाभुळवाडीला 100 मजूर दाखविण्यात आले आहेत, पारगांव शिवनी येथे 146 मजूर दाखविण्यात आले आहेत. या 10 ते 12 गावातील बरेचसे मजूर आहेत. यातील 9 ते 10 गावांची तक्रार मी स्वतः मुख्यमंत्री महोदयांकडे केली आहे. या गावात गेल्या वर्षापासून सातत्याने बोगस मस्टर भरून फक्त बिले उचलण्याची कामे होत आहेत. मुख्यमंत्री महोदयांनी या विषयाबाबत चौकशी लावली आहे. या चौकशीचे पत्र जिल्हाधिकारी यांच्याकडे गेले. जिल्हाधिकारी यांच्याकडून ते पत्र जिल्हा परिषदेकडे गेले, जिल्हा परिषदेकडून ते पत्र पंचायत समितीकडे गेले आहे. पंचायत समिती ही सर्व कामे बोगस करीत आहे. या कामांची चौकशी देखील तेच करणार आहेत. माझ्याकडे आजचा रिपोर्ट आहे आजही त्या गावात शेकडो लोक बोगस मस्टर भरून पैसे उचलत आहेत. यासंदर्भातील यादी माझ्याकडे आहे, ती यादी मी मंत्री महोदयांना देतो. दुष्काळासाठी सरकार उपाययोना करीत आहे त्याचा गैरफायदा घेणारे लोक देखील आहेत. म्हणजे मेलेल्या माणसाच्या टाळूवरील लोणी खाण्याचा हा प्रकार चालला आहे. अशा लोकांना शासनाने ठेचून काढले पाहिजे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

या नंतर श्री.सांगळे.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विनायक मेटे....

सदर लोक मजुरांच्या नावावरील पैसे खात आहेत, अन्न खात आहेत. खडसे साहेब आपण पाण्याच्या टँकरसंदर्भात ज्या योजना केल्या आहेत, त्या योजना कशा फेल होतील यासाठी खालील यंत्रणा अधिकाऱ्यांना हाताशी धरण्याचा प्रयत्न करीत आहे. शासनाने सुरु केलेली जलयुक्त शिवार योजना अतिशय चांगली आहे. त्या योजनेचा आज नाही तर उद्या निश्चितपणे उपयोग होईल. विरोधी पक्षनेत्यांचे आवडते गाव नांदुर्णा आहे. संपूर्ण जिल्ह्याच्या मशीनरी त्या गावात नेवून बसविल्या आहेत.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, सदर गाव माझ्या आवडीचे असले तरी त्यांचा जन्म त्या सर्कलमध्ये झाला आहे.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, एका गावामध्ये जिल्ह्यातील सर्व मशीनरी नेवून ठेवली आहे. या गोष्टीला सर्व अधिकारी बळी पडत आहेत, ते या गोष्टीला बळी का पडत आहेत, कशासाठी बळी पडत आहेत, ते मी या ठिकाणी सांगत नाही. हे सरकार उपाययोजना करुन लोकांना दिलासा देवू पहात आहे. परंतु त्या उपाययोजना फेल करण्यासाठी खालील यंत्रणा प्रयत्न करीत आहे. योजनांची चांगल्या प्रकारे अंमलबजावणी होण्यासाठी अधिकाऱ्यांकडे जास्त लक्ष देणे अत्यावश्यक आहे. अनेक सन्माननीय सदस्यांनी छावण्यांचा उल्लेख केला. छावण्यांच्या संदर्भात थोडे समज, गैरसमज पसरले आहेत.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे दुष्काळावर व्यवस्थितपणे चर्चा करीत आहे. सन्माननीय सदस्यांनी भाषणाच्या सुरुवातीला शासनाचे आभार मानतो व त्यानंतर उपाययोजनांबाबत माहिती देतो असे सांगितले. परंतु ते सर्व उपाययोजनांबाबत तक्रार करीत आहेत. अशा प्रकारे त्यांनी सुरुवातीला आभार शासनाचे आभार मानले व त्यानंतर रोजगार हमी योजनेची कामे, छावण्या, जलयुक्त शिवार योजनो असो, यासंबंधी तक्रारी करीत आहेत. यामुळे सदनाचे थोडे कन्फ्यूजन झाले आहे.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, मी सरकारचे आभार यासाठी मानले की, सरकारने दुष्काळग्रस्त लोकांच्या काळजीसाठी केलेल्या योजना वाखाणण्यासारख्या आहेत. परंतु तक्रार अशी आहे की, प्रशासकीय यंत्रणेकडून योजनांची अंमलबजावणी केली जाते, त्यात अधिकारी व प्रशासन

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विनायक मेटे....

कमी पडत आहे. अनेक सन्माननीय सदस्यांनी छावण्यांबद्दल मुद्दा उपस्थित केला. 1-2 दिवसांच्या काळात समज, गैरसमज यामुळे काही गोष्टी घडल्या. जिल्हाधिकाऱ्यांनी या संदर्भात एक तारखेला रिपोर्ट केला, तो आपल्याकडे 9-10 तारखेला आला. मी या संदर्भात कृषी अधिकाऱ्यांकडून माहिती घेतली. जिल्हाधिकाऱ्यांनी रिपोर्टचा आधार कृषी अधिकारी आणि पशुसंवर्धन खाते असल्याचे सांगितले होते. मी बीड जिल्ह्यातील कृषी अधिकारी आणि पशुसंवर्धन खात्याला बोलाविले आणि त्यांना विचारले की, हे सर्व कशाच्या आधारावर दिले आणि तुम्ही खरोखर अहवाल दिला आहे का, यावर त्यांनी मला सांगितले आम्ही अहवाल दिलेला नाही. मी त्यांना सांगितले की, तुम्ही खोटे बोलू नका. अन्यथा मी तुम्हाला खडसे साहेब व कलेक्टर साहेबांसमोर उभा करीन. यावर त्यांनी मला सांगितले की, पेरणी किती झाली, त्याचा अहवाल आम्ही जरुर दिला. परंतु त्या पेरणीत पीक उगवले आहे की नाही आणि उगवले असल्यास किती पीक उगवले ते किती उंच उगवले की बाटूक आले आहे, यासंबंधी आम्ही अहवाल दिलेला नाही. ही बाब आम्ही शपथेवर सांगण्यात तयार आहोत. जिल्हाधिकाऱ्यांनी शासनाकडे रिपोर्ट पाठविण्यापूर्वी जी शहानिशा करायची होती ती दुर्दैवाने केली नाही. यामुळे सर्व गोंधळ झाला. या गोष्टींमध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे असे मी मघापासून सांगत आहे. माननीय मुख्यमंत्री किंवा माननीय श्री.खडसे साहेब आपण सर्व गोष्टींकरिता उपाययोजना करीत आहात. परंतु त्या उपाययोजना खालच्या स्तरापर्यंत जाण्याकरिता जी साथ मिळायला पाहिजे, ती मिळत नाही, त्यात दुरुस्ती करणे अत्यावश्यक आहे. छावण्यांमधील मोठ्या जनावराला 70 रुपये आणि लहान जनावराला 35 रुपये दिले जातात. त्यातून शेणाचे 7 रुपये कापून घेतले जात असल्यामुळे मोठ्या जनावराकरीता फक्त 63 रुपये मिळत आहेत. त्या रकमेतून जनावरांना ऊस, चारा वगैरे द्यावा लागतो. जनावरांना फक्त ऊस नव्हे तर कोरडा चारा, सरकी व पेंड द्यावी लागते. मी एका गोष्टीसाठी जिल्हाधिकांच्याचे कौतुक करतो. मागील काळात छावण्यांच्या संदर्भात जो भ्रष्टाचार झाला होता, तसा भ्रष्टाचार यावेळी 1 ते 2 टक्के सुध्दा होण्याची शक्यता नाही. याचे कारण असे आहे की, बीड जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांनी दर आठवड्यातून एक-एक, दोन-दोन वेळा सर्व छावण्यांची क्रॉस चेकिंग करण्याची कार्यवाही सुरु केली आहे. यामुळे छावण्यांमध्ये जेवढी लहान-मोठी जनावरे असतात, तेवढीच दाखविता येतात,

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विनायक मेटे....

त्यापेक्षा जास्त जनावरे दाखविता येत नाही. अशा प्रकारे शासनाला मागील वेळी आलेले अनुभव यावेळी येणे कठीण आहे. आता त्या ठिकाणी ऊसाचा दर प्रति टन अडीच हजार रुपये आहे. बीड, उस्मानाबादमध्ये पुणे व अहमदनगरवरुन ऊस मागवावा लागतो. 2200 ते 2700 रुपये प्रति टन ऊसाचा दर असल्यामुळे इतक्या दूर अंतरावरुन ऊस आणणे परवडत नाही. तसेच कडब्याचा भाव 2200 ते 2700 रुपये प्रति शेकडा आहे. ऊसाप्रमाणे कडब्याचा भाव असल्यामुळे छावण्या चालविणाऱ्या लोकांना ते दर परवडत नाहीत. तसेच कापणीमध्ये सुध्दा चुकीच्या गोष्टी होत आहेत. यामुळे छावण्यांच्या संदर्भात शासनाने विचार करणे अत्यावश्यक आहे. पाणी अतिशय महत्त्वाची गोष्ट आहे. शासनाने मध्यंतरी असे आदेश काढले होते की, ज्या ठिकाणी बोअरवेल असेल तेथून छावण्यांकरिता पाणी आणायचे नाही. या गोष्टींकडे तातडीने लक्ष देऊन छावण्यांमधील जनावरांना जगविण्याचे काम आपल्याला करावे लागणार आहे. सभापती महोदय, मी जास्त न बोलता 2-3 मुद्दे सांगणार आहे. अनेक सन्माननीय सदस्यांनी पाण्याचे दुर्भिक्ष्य असल्याचे सांगितले. सध्या मार्च महिना सुरु आहे. परंतु 15 एप्रिलनंतर पाण्याची फार मोठी अडचण निर्माण होणार आहे. पाणी संपल्यानंतर ते रेल्वेने आणू शकत नाही, यासाठी एक मर्यादा आहे. आता हळूहळू स्थलांतर होत आहे. मला अशी भीती आहे की, तेथून पुणे, पिंपरी-चिंचवड, नवी मुंबई, ठाणे आणि मुंबईमध्ये मोठ्या प्रमाणावर स्थलांतर होवू शकते. त्या ठिकाणी लोक आल्यानंतर त्यांना काम देणे, त्यांची राहण्याची व्यवस्था करणे यादृष्टीने शासनाला निश्चितपणे तयारी करावी लागणार आहे.

कृषी खात्याकडून आत्महत्या रोखणे किंवा दुष्काळाबद्दल अतिशय चांगल्या प्रकारे काम केले जात आहे. माझी मंत्री महोदयांना नम्र सूचना आहे. मी सदर सूचना मागील काळात केली होती. मागील सरकारच्या काळात कृषी मंत्र्यांनी कृषीचा स्वतंत्र अर्थसंकल्प सादर करावा, असा प्रस्ताव तयार केला होता. महाराष्ट्र पुरोगामी आणि सर्वात पुढे असलेले राज्य आहे. देशात महाराष्ट्राने प्रथम कृषीचा अर्थसंकल्प सादर करण्याचा पायंडा पाडावा. ज्याप्रमाणे केंद्रात रेल्वेचा अर्थसंकल्प स्वतंत्रपणे सादर केला जातो. त्याच धर्तीवर महाराष्ट्रात कृषीवर आधारीत, कृषीला जोडधंदा देणारा, शेतकरी, शेतमजूर आणि ग्रामीण भागातील माणसाला जगवणारा या आधारावर पुढील वर्षी कृषी अर्थसंकल्प सादर करु शकल्यास मोठे काम होऊ शकेल असे माझे स्पष्ट मत आहे.

यानंतर CC-1.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विनायक मेटे.....

अटल पेन्शन योजना केंद्र सरकारने सुरु केली आहे. त्याची व्याप्ती वाढवून राज्यातील शेतकरी व शेतमजूर यांना दरमहा 1000 रुपये पेन्शन महाराष्ट्र सरकारने लागू करण्याचे जाहीर केले तर निश्चितपणे शेतकरी आत्महत्या करणार नाहीत आणि दुष्काळातून काही प्रमाणात त्यांची सुटका होऊ शकेल. आपण मला विचार मांडण्याची संधी दिली त्याबद्दल आपले आभार मानून माझे भाषण पूर्ण करतो.

...2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.निरंजन डावखरे (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेते श्री.धनंजय मुंडे यांनी नियम 260 अन्वये दुष्काळासंबंधी जो प्रस्ताव मांडला आहे त्यावर माझे विचार मांडण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, मराठवाडा, विदर्भ, पश्चिम महाराष्ट्रासह राज्यातील विविध भागांमध्ये यावर्षी तीव्र दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे. त्या संदर्भात सभागृहात चर्चा सुरु आहे. महाराष्ट्रातील भीषण दुष्काळावर मात करण्यासाठी सरकार पूर्णत: अपयशी ठरलेले आहे असे उच्च न्यायालयाचे मत आहे. या संदर्भात हायकोर्टाने सू-मोटो केस दाखल करुन घेतली. 124 पेक्षा जास्त शेतकऱ्यांच्या आत्महत्या झाल्या, त्या संदर्भात शासनाकडे विचारणा करण्यात आली. शासनाने देखील हायकोर्टात आकडेवारी सादर केली आहे.

सभापती महोदय, दुष्काळाचे हे संकट निसर्गनिर्मित असताना चांगली विधायक कामे होणे अपेक्षित आहे. ही जबाबदारी शासनाची असली तरी लोकप्रतिनिधी म्हणून आमचीही काही प्रमाणात जबाबदारी आहे, असे मी समजतो. प्रत्येक विभागात परिस्थिती काय आहे याची जाणीव शासनाला करुन देणे अतिशय गरजेचे आहे. आज शेतकऱ्यांना पाणी आणि चाऱ्याअभावी आपले पशुधन कवडीमोल भावात विकावे लागत आहे. मराठवाडा विभागातून जवळजवळ 10 हजार मजूर स्थलांतरित होताना दिसत आहेत. दुष्काळी परिस्थितीमुळे शेतीपूरक कामे नसल्यामुळे रोजगाराअभावी बीड, उस्मानाबाद व लातूर जिल्हयातील लोकांना स्थलांतर करणे भाग पडत आहे. मनरेगाच्या माध्यमातून शासन दुप्पट कामे करण्याचा प्रयत्न करीत असताना मजूर उपस्थिती कमी असल्याने कामे सुरु होण्यास अडचणी येत आहेत. त्यात गैरप्रकार मोठया प्रमाणात होत असल्यामुळे या संदर्भात क्रॉस चेक होण्याची गरज आहे. 10 हजार मजूर स्थलांतरामुळे मनरेगाच्या कामांवर कमी झाले आहेत ही वस्तुस्थिती आहे. याचा अर्थ मजूर कामे सोडून जात आहेत. दुष्काळामुळे शहरी भागात रोजगार मिळविण्यासाठी स्थलांतर होत आहे. मराठवाडयातील सर्व जिल्हयांमध्ये रोजगार हमी योजनेवरील मजुरांचे प्रमाण कमी होताना दिसत आहे.

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.विनायक मेटे)

सभापती महोदय, मराठवाडयामध्ये रोजगार हमी योजनेची 11356 कामे सुरु होती, मी माहिती घेतली असता या आठवडयात त्यापैकी फक्त 6643 कामे सुरु असल्याचे सांगण्यात आले.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

11-03-2016 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) CC.3

SGB/ AKN/ KTG/ 16:40

ॲड.निरंजन डावखरे.....

याचा अर्थ शासनाकडून कामे मंजूर केली जात आहेत परंतु कामावरील मजूर उपस्थिती कमी होत आहे, मजूर स्थलांतरित होत आहेत. रोजगार मिळविण्यासाठी पुणे, ठाणे, पिंपरी-चिंचवड, कल्याण-डोंबिवली, नवी मुंबईकडे जात आहेत. भविष्यात या भागात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो.

सभापती महोदय, आम्ही अमरावतीमध्ये राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या वतीने मोर्चा काढला होता, त्या मोर्चामध्ये माननीय सदस्य श्री.प्रकाश गजभिये देखील सहभागी झाले होते. अमरावती जिल्हयात जवळजवळ 1200 गावे दुष्काळसदृश असल्याचे सर्व्हेमध्ये आढळून आले आहे. शासनाने या संदर्भात ठोस उपाययोजना करावी अशी माझी विनंती आहे. सोलापूर जिल्हयात देखील चिंताजनक परिस्थिती निर्माण होत आहे. सांगली जिल्हयात रब्बी हंगामाचे सर्वेक्षण करण्यात आले. त्यानुसार 104 गावे दुष्काळसदृश असल्याचे आढळून आले आहे. या भागातील शेतकऱ्यांसमोर स्वतःच्या उदरनिर्वाहाबरोबर जनावरांचा चारा व पाण्याचा प्रश्न देखील निर्माण झाला आहे. आटपाडी, जत, कवठे महांकाळ, खानापूर, कडेगाव, तासगाव, मिरज तालुके दुष्काळी भाग म्हणून घोषित झाले आहेत. तेथे दुष्काळाची भीषण परिस्थिती आहे. श्रीगोंदा तालुक्यात तीव्र पाणी टंचाई असल्यामुळे शेतकरी व शेतमजूर पिंपरी-चिंचवड, पुणे या भागात स्थलांतरित होत आहेत. शहरी भागांमध्ये बांधकामे सुरु आहेत, एमआयडीसी क्षेत्रात उद्योग आहेत त्यामुळे रोजगाराच्या अपेक्षेने हे स्थलांतर सुरु आहे. आज मुंबई, ठाणे, कल्याण-डोंबिवली परिसरात न्यायालयाच्या आदेशामुळे नवीन बांधकामे थांबली आहेत, स्लो डाऊन सुरु आहे. त्यामुळे त्या परिसरात जे स्थलांतरीत लोक येणार आहेत त्यांना रोजगार मिळणार नसेल तर कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. कामधंदा नसल्यामुळे लोक पोट भरण्यासाठी गुन्हेगारीकडे वळण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यादृष्टीने शासनाने प्रतिबंधात्मक पावले उचलली पाहिजेत.

सभापती महोदय, नाका कामगारांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. पूर्वी 100 लोक उभे असतील तर त्यापैकी 80 लोकांना काम मिळत होते. आज 500 लोक उभे असतील तर त्यापैकी

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

50 लोकांना देखील काम मिळत नाही ही वस्तुस्थिती आहे. ठाणे जिल्हयात गंभीर परिस्थिती निर्माण होत आहे. बारवी धरणामध्ये पाणी साठा अपुरा असल्यामुळे वारंवार अडीच दिवसाची

...4...

कपात करून सहकार्य करण्याची विनंती प्राधिकरणाला केली आहे. त्या आदेशाची अंमलबजावणी होत नाही. प्राधिकरणाकडून आदेश धाब्यावर बसविण्याचे काम सुरु आहे. पाण्याची उचलेगिरी सुरु आहे. त्यामुळे शहरी भागातील नागरिकांना पाण्यावाचून हाल सोसावे लागत आहेत.

सभापती महोदय, मी शासनासमोर तीन महत्वाचे मुद्दे मांडू इच्छितो. त्या संदर्भात मंत्री महोदयांना उत्तराच्या भाषणामध्ये खुलासा करावा अशी अपेक्षा करतो. विद्यार्थ्यांची शैक्षणिक फी माफी तातडीने व्हावी व त्याची अंमलबजावणी झाली पाहिजे. सभागृहात फक्त घोषणा केली जाते परंतु अंमलबजावणी होताना दिसत नाही. जे स्थलांतर होत आहे ते कसे थांबविता येईल, थांबविता येत नसेल तर ज्या भागात स्थलांतर होईल तेथील स्थलांतरित लोकांच्या दृष्टीने कोणत्या उपाययोजना करण्यात येणार आहेत? लातूर, उस्मानाबाद जिल्हयातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न ताबडतोब सुटला पाहिजे. आज त्या भागात बाटली बंद पाणी विकणारे मोठे रॅकेट निर्माण झाले आहे, त्यावर शासनाने नियंत्रण आणले पाहिजे. मराठवाड्यामध्ये पाण्याचा प्रश्न गहन बनलेला असताना औरंगाबादच्या एमआयडीसीमधील मद्य निर्माण करणाऱ्या फॅक्टऱ्यांना मुबलक पाणी उपलब्ध होत आहे. या संदर्भात शासनाने कारवाई केली पाहिजे. शेतकऱ्यांना पूर्णपणे कर्जमाफी देऊन त्यांचा प्रश्न सोडवावा अशी विनंती करून मी माझे भाषण पूर्ण करतो.

नंतर 2डी.1...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.कपिल पाटील (मुंबई विभाग शिक्षक) : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.धनंजय मुंडे यांनी नियम 260 अन्वये दुष्काळाच्या विषयावर मांडलेल्या प्रस्तावावर बोलण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्रात गेले 4 वर्ष सातत्याने दुष्काळ पडत आहे. ऑस्ट्रेलियात तर 9 वर्ष दुष्काळ पडत आहे. 9 वर्षाच्या दुष्काळाचा सामना करण्यासाठी ऑस्ट्रेलिया सरकारने जी पावले उचलली आहेत तशी पावले गेल्या चार वर्षामध्ये महाराष्ट्र राज्याने उचलल्याचे दिसत नाही. या सभागृहासह राज्यातील सर्वच जनतेचे असे मत आहे की, 1972 पेक्षा अत्यंत वाईट अशी परिस्थिती मराठवाड्यात आहे, महाराष्ट्रात आहे. मराठवाडा जात्यात आहे, पण उर्वरित महाराष्ट्र सुपात आहे. आज मराठवाड्याची स्थिती अत्यंत वाईट आहे. पण उर्वरित महाराष्ट्र देखील त्याच वाटेने निघालेला आहे हे आपल्याला नाकारता येणार नाही. आज पाण्यासाठी दंगली होतील अशी स्थिती उद्‌भवलेली आहे. विहिरीतील पाणी काढताना, शेंदताना एका मुलीचा मृत्यू झाला आहे. एवढेच नव्हे तर टँकरचे पाणी घेताना झालेल्या मारामाऱ्या आमच्या समोर आहेत. अशा स्फोटक परिस्थितीचा सामना महाराष्ट्र शासन कसा करणार आहे हा खरा महत्त्वाचा मुद्दा आहे. आपण टँकर देत आहात. जेथे पाणी साठे आहेत तेथे पाण्याची चोरी होत आहे. लातूर जिल्ह्यामध्ये पाण्याच्या चोरीचे प्रचंड प्रकार सुरू झाले आहेत. त्यावर कोणतेही नियंत्रण नाही. यावर आपण नियंत्रण मिळविले नाही तर परिस्थिती आणखी हाताबाहेर जाईल. पूर्वी टँकर माफीया होते. आता बोअरची लॉबी सुरू झालेली आहे. त्यांच्या राजकारणातून ज्या पद्धतीने काम सुरू आहे त्यातून अत्यंत वाईट स्थिती निर्माण होणार आहे.

सभापती महोदय, 1995 मध्ये पहिली शेतकऱ्याची आत्महत्या झाली. त्यावेळी युतीचे सरकार होते. त्या बातमीने मी अस्वस्थ झालो होतो. त्यावेळी श्री.पाशा पटेल या शेतकऱ्यांच्या नेत्या सोबत मी उस्मानाबादमधील परांडा या गावी गेलो. त्यावर्षी 1008 च्या आसपास शेतकऱ्यांच्या आत्महत्या झाल्या होत्या. आज या घडीला महाराष्ट्रातील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांचा आकडा

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.कपिल पाटील....

60750 एवढा पार करून गेलेला आहे. गेला वर्षीचा आकडा थोडासा कमी झाला होता. परंतु, आता तो 3228 इतका झाला आहे. गेल्या वर्षी जे डिक्लाईन झाले होते ते आता वाढलेले आहे. देशातील एक दोन राज्ये अपवाद सोडता आत्महत्येचे प्रमाण थोडेसे कमी झाले होते. परंतु, गेल्या वर्षभरामध्ये आत्महत्येचे प्रमाणे पुन्हा एकदा भरपूर वाढलेले आहे. याचे कारण काय आहे ? याचा अर्थ शेतकऱ्यांचा भरवसा पुन्हा उडाला आहे काय ? या प्रश्नाचे उत्तर सराकरला निश्चितपणे द्यावे लागेल.

सभापती महोदय, आपण नेहमी म्हणतो की, हे अस्मानी संकट आहे. अवर्षण हे अस्मानी संकट असू शकेल. पण दुष्काळ हे अस्मानी संकट नसून ते मानव निर्मित संकट आहे. ते राज्यकर्त्यांच्या धोरणातून निर्माण झालेले आहे हे सांगितले पाहिजे. आपण सातत्याने म्हणतो की, पाऊस पडला नाही म्हणून दुष्काळ आला. निसर्गाचे, अस्मानी संकट आहे असे समजून राज्यकर्त्यांना, शासकीय यंत्रणेला माफ करतो. त्यांची सुटका करतो हे काही बरोबर नाही. शेतकरी आज ज्या परिस्थितीचा सामना करीत आहे, त्याला पूर्णपणे पाण्याचे, शेतीचे धोरण कारणीभूत आहे. महाराष्ट्रामध्ये 70 हजार छोटी धरणे आणि स्रोत आहेत. त्याचा फक्त 12 टक्के वापर होत आहे. पूर्वी आपली सिंचनाची क्षमता 11 टक्के होती. ती अजूनही आपण वाढवू शकलेलो नाही. 70 हजार छोटी धरणे असून सुद्धा त्याचा वापर 12 टक्के होत असेल तर या राज्यातील 90 लाख शेतकरी संकटात जाणार नाही तर काय ? एकूण शेतकऱ्यांपैकी 90 लाख शेतकरी थेट दुष्काळाचा सामना करीत आहे. हा प्रश्न तात्पुरत्या उपाययोजनेने सुटणार नाही. आज आपण चारा छावण्या उघडतो किंवा सरकारी रिपोर्ट आल्यानंतर बंद करतो. प्रश्न चारा छावणी भ्रष्टाचाराचा असेल तर रेशनवर चारा देण्याची जबाबदारी टाकली पाहिजे. मागे देखील मी हा मुद्दा उपस्थित केला होता. आपल्याला छावणीमध्ये भ्रष्टाचार दिसत असेल तर चाऱ्या बरोबर गुरांसाठी पौष्टिक खाद्य रेशनवर देणे आवश्यक आहे. अगदी मळी मिक्स केली तरी ते पौष्टीक ठरेल. तेव्हा आपण थेट रेशनवर चारा पोहोचविला, त्याच्या दावणीला दिला तर तो शेतकऱ्याला अधिक उपयोगी ठरेल. छावणीत जाऊन चारा देण्यामध्ये घरातील दोन माणसे अडकली जातात. तेथे म्हाताराकोतारा माणूस जात असला तरी तो तेथे अडकूनच बसतो. तो घरात मोकळा राहू शकतो. पण तेथे राहू शकत नाही म्हणून ती गोष्ट करण्याची आवश्यकता होती. पण तसे होत नाही. ..3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.कपिल पाटील....

सभापती महोदय, या सरकारला संवेदना आहे की नाही ? या सरकारला संवेदना नाही असा कोणीही आरोप करणार नाही. मघाशी माननीय विरोधी पक्ष नेते व सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप म्हणत होते की, सरकार संवेदनशील आहे आणि काम करीत आहे. परंतु, यंत्रणा काम करीत नाही. माननीय मुख्यमंत्री आणि त्यांचे ज्येष्ठ सहकारी संवेदनशीलतेने काम करीत आहे. त्यांचे प्रयत्न प्रामाणिक आहेत. माननीय मंत्री श्री.दिवाकरजी रावते साहेब हे जेव्हा विरोधी पक्षात होते तेव्हा ते दुष्काळी भागात पायपीट करायचे. पायाला फोड येई पर्यंत ते चालत होते. हे मी स्वत: पाहिलेले आहे. मी त्यांच्या यात्रेत चाललो आहे. आजही ते मंत्री झाल्यानंतर थांबलेले नाहीत हे देखील मी पाहतो आहे. माननीय महसूल मंत्री श्री.खडसे साहेब हे त्यांच्या डोळ्याचे ऑपरेशन झालेले असताना उन्हातान्हात फिरले. मोतीबिंदूचे ऑपरेशन झाल्यानंतर उन्हात फिरता येत नाही. निदान तीन-चार आठवडे कुठेही बाहेर जाता येत नाही. तरी देखील ते बाहेर पडले. त्यामुळे त्यांच्या प्रामाणिकपणाबद्दल शंका नाही. अगदी माननीय वित्त मंत्र्यांनी देखील कुपोषणाची समस्या कशी वाढते आहे यासंबंधातील आकडेवारी प्रामाणिकपणे सांगितली आहे. आपल्या प्रामाणिकपणाबद्दल शंका नाही, संवेदनशीलतेबद्दल शंका नाही. पण ही संवेदनशीलता उस्मानाबादमध्ये हरवली का हा प्रश्न आहे. उस्मानाबादमध्ये ज्या पद्धतीने शेतकऱ्याला मारहाण झाली त्याचा असा मेसेज गेला की, हे सरकार शेतकऱ्यांना मारते आहे. जो शेतकरी आपल्याकडे त्याचे गाऱ्हाणे घेऊन येतो त्याचे सर्व प्रश्न चुटकीसरशी सोडवावे अशी त्याची अपेक्षा नसते. त्यांचे म्हणणे एवढेच असते की, आमचे ऐकून घ्यावे. आमच्या काय अडचणी आहेत त्या समजून घ्याव्यात. पण त्याच्या अडचणी ऐकून घेण्याच्या ऐवजी मंत्र्यांचा पी.ए.धू-धू धूत असेल, बकलून काढत असेल तर ते चुकीचे आहे. त्याच्याबद्दल राज्य सरकार धृतराष्ट्राप्रमाणे डोळे मिटून घेत असेल तर ते चुकीचे आहे. आपण आमच्याबद्दल संवेदनशील असाल. पण महाराष्ट्रातील सामान्य जनतेमध्ये हे राज्य सरकार निबर कातडीचे आहे, संवेदना हरवलेले आहे अशा पद्धतीचा मेसेज गेलेला आहे. तो दुरुस्त करावयाचा असेल तर आपल्याला कारवाई करावी लागेल. पण ती आपण केलेली नाही. ज्या उस्मानाबादमध्ये पहिली आत्महत्या घडली त्या उस्मानाबादमध्ये आज सर्वात वाईट स्थिती आहे. तेथेच शेतकऱ्याला कोणतेही सयुक्तिक कारण नसताना मारले गेले. ..4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.कपिल पाटील....

समजा, शेतकऱ्याचे काही चुकले असेल तर त्याच्याशी बोलले पाहिजे होते. त्याला मारण्याचा काय संबंध आहे. आमच्या शिक्षकांना जेलमध्ये टाकू असे म्हटले तरी ते बिचारे त्यांच्या पेशामुळे सहन करतात. पण या राज्यातील शेतकरी हे सहन करणार नाही. स्वामीनाथनसह सगळ्या तज्ज्ञांचे म्हणणे आहे की, पाऊस हे दुष्काळाचे कारण नाही. अवर्षण हे शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे कारण नाही. मग शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे कारण काय आहे ? त्यांनी सांगितले की, कर्ज हे कारण आहे. या सभागृहत पुन्हा पुन्हा कर्जमुक्तीची, कर्जमाफीची मागणी येते ती याच कारणामुळे येते. दुसरे कारण वाढलेली प्रोडक्शन कॉस्ट हे आहे. तिसरे कारण पाण्याचे वाटप आणि व्यवस्था हे आहे. चौथे कारण त्याच्या उत्पादनाला न मिळणारा भाव हे आहे. चांगले पिकले तर भाव पाडले जातात. कमी पिकवून भाव वाढण्याची शक्यता झाली की, आयात केली जाते. सरकारच्या दोन्ही धोरणांमुळे शेतकरी नागावला जातो. त्यामुळे तो उद्ध्वस्त होतो आणि मग गळ्या भोवती फास घ्यावा लागतो. या प्रश्नावर शासनाचे नेमके काय धोरण आहे हे मला जाणून घ्यायचे आहे. दुष्काळ ही आपत्ती असली तरी राष्ट्रीय आपत्ती कायद्याशी त्याचा काही संबंध आहे की नाही याचे उत्तर सरकारने दिले पाहिजे. त्या कायद्यामध्ये दुष्काळ ही आपत्ती असेल तर त्या कायद्यानुसार या राज्यातील दुष्काळ ही आपत्ती जाहीर करून त्या कायद्यानुसार कार्यवाही सरकार करणार की नाही, हा मुख्य महत्वाचा प्रश्न आहे. आपण वरवरची धोरणे करतो. पण होलिस्टीक ॲप्रोच घेत नाही. त्यामुळे दुष्काळाच्या संदर्भात तात्पुरती मलमपट्टी होते. पण कायम स्वरूपी उपाययोजना होत नाही. सगळ्यात मोठी अडचण प्रशासकीय यंत्रणेची आहे. आज प्रशासकीय यंत्रणा हलत नाही. मी अनेक विरोधी पक्ष नेत्यांशी, जे ग्रामीण भागामध्ये काम करतात अशा अनेक ज्येष्ठ सन्माननीय सदस्यांशी बोललो आहे. त्यांचे असे म्हणणे आहे की, साधी विहीर किंवा बोअर अधिग्रहीत करायची असेल तर सहा-सहा महिने केली जात नाही. यासाठी एवढा वेळ जात असेल तर याचा अर्थ सरकारची यंत्रणेवरची पकड ढिली झाली आहे. ही यंत्रणा कामी लावण्यासाठी इच्छाशक्ती हवी.

यानंतर श्री.अजित....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.कपिल पाटील...

सभापती महोदय, आपत्ती निवारण कायद्याद्वारे दुष्काळाचे निवारण करण्यासाठी कायम स्वरूपी उपाययोजना केली पाहिजे. माझी या निमित्ताने मागणी आहे की, राज्यात दुष्काळ निवारण आयोग स्थापन करण्यात यावा. आपणास केवळ तात्पुरत्या उपाययोजना करून चालणार नाही तर आपणास लॉंग टर्म उपाययोजना कराव्या लागतील. कॉम्प्रेहेन्सीव्ह उपाययोजना कराव्या लागतील आणि होलीस्टीक ॲप्रोच घ्यावा लागेल. त्यामुळे दुष्काळ निवारण आयोग निर्माण करण्यात यावा. सन 1988 मध्ये पडलेला दुष्काळ मी पाहिलेला आहे. त्यावेळी श्री.शंकरराव चव्हाण मुख्यमंत्री होते श्री.दत्ता देशमुख आणि श्री.दांडेकर हे दोघे अर्थतज्ज्ञ दुष्काळी भागात फिरून दुष्काळी परिषदा घेत होते.दोघेही शेतकऱ्यांचे कैवारी होते. त्यापूर्वी 1972 च्या दुष्काळामध्ये वि.स.पागे आणि बाळासाहेब भारदे यांनी जे काम केले त्यामुळे राज्यामध्ये रोजगार हमी योजना आली. तेव्हा दुष्काळा ही संधी आहे असे समजून काम केले तर त्यातून मोठे काम उभे राहू शकेल.

सभापती महोदय, आपल्याकडे पाण्याचे स्त्रोत मर्यादित आहेत हे लक्षात घेऊन पाण्याचा पुनर्वापर कशा पद्धतीने करता येईल हे पाहिले पाहिजे. पाण्याचा पुनर्वापर होण्यासाठी छोट्या शहरांपासून मोठ्या शहरांपर्यंत प्रयत्न झाले पाहिजेत. जे काही पाणी उपलब्ध आहे ते नीट वापरले पाहिजे आणि ते शेतकऱ्यांना पुरेसे मिळाले पाहिजे. आपण हा दृष्टीकोन ठेवला तर इतर ठिकाणी पाण्याचा जो गैरवापर सुरु आहे तो थांबू शकेल.

सभापती महोदय, राज्याचे स्वतःचे हवामान खाते असले पाहिजे अशी मागणी मी मागील तीन वर्षापासून करीत आहे. गारपीट केव्हा होणार हे आपण सांगत नाही. अतिवृष्टी होणार असेल तर ते आपण सांगत नाही. आता जगभर हवामानासंबंधी शास्त्र विकसित झाल्यामुळे हवामानासंबधीची पूर्व कल्पना देणे सहज शक्य झाले आहे. आपण इतका खर्च करतो. तेव्हा एखादे हवामान खाते घेतले तर राज्याच्या दृष्टीने फायद्याचे ठरेल. चीनने असे हवामान खाते सुरु केले आहे. अनेक देशांमध्ये हवामान खाते आहे. आपल्याकडे काही ठिकाणी ही यंत्रणा लावण्यास सुरुवात झाली आहे, परंतु ती तात्पुरत्या स्वरूपातील आहे. यासाठी स्वतंत्र यंत्रणा व स्वतंत्र मनुष्यबळ पाहिजे. आपल्याकडे मनुष्यबळ नाही तेव्हा किमान आपल्याकडे हवामान शास्त्रज्ञांना

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.कपिल पाटील...

सल्लागार म्हणून नेमणे आवश्यक आहे. पुणे येथे ज्येष्ठ हवामान शास्त्रज्ञ आहेत. त्यांच्या ज्ञानाचा उपयोग बाकीचे राज्य करून घेत आहेत. आपण त्यांच्या ज्ञानाचा उपयोग करून घेत नाही. त्यांचे सांगणे आहे की, आमच्या ज्ञानाचा उपयोग करून घेतला जात नाही. आपण त्यांच्या ज्ञानाचा उपयोग करून घेतला पाहिजे. केवळ पावसाच्या संदर्भात नव्हे तर वीज पडण्याच्या संदर्भात देखील पूर्व सूचना देता येते. पूर्वी चीनमध्ये वीज पडून अनेक माणसे मृत्युमुखी पडत होती. आता चीनमध्ये वीज पडून माणेस मरत नाही. आपल्याकडे अजून वीज पडून माणसे मरत आहेत. आपणास शेतकऱ्यांकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलावयाचा असेल तर त्यांना कर्जमुक्त केले पाहिजे. त्याशिवाय त्याला जगता येणार नाही, उभे राहता येणार नाही. पण त्याच बरोबर इतर गोष्टी देखील करणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, आपण काही काळासाठी दुष्काळी भागातील तरूणांना भोजनाची व्यवस्था केली होती. राज्यातील अनेक दुष्काळी जिल्ह्यांतील मुले बाहेर शिक्षण घेत आहेत त्यांच्यासाठी सरकारने किमान जेवणाची सोय केली पाहिजे. अन्यथा मुलांना परीक्षेच्या काळामध्ये काहीतरी काम शोधावे लागेल. काही वेळा ही मुले केळे खाऊन आणि फक्त पाणी पिऊन राहतात. एकवेळ जेवणाऱ्या मुलांची संख्या खूप आहे. त्या मुलांसाठी किमान जेवणाची व्यवस्था करणे किंवा पर्यायी व्यवस्था करणे आवश्यक आहे. आपण त्यांना निर्वाह भत्ता दिला पाहिजे. किमान ते सन्मानाने काही तरी करु शकतील. आपण परीक्षा शुल्क माफ केले परंतु शिक्षण शुल्क माफ केलेले नाही. परीक्षा फी माफ असताना शिक्षण शुल्क घ्यावयास नको होते. आपले आदेश वेळेवर न निघाल्यामुळे परीक्षा शुल्क भरावी लागली. कुमारी स्वीतीने गळफास लावल्यानंतर परिवहन विभागाच्या मंत्री महोदयांनी विद्यार्थ्यांना मोफत एस.टी.ची.सुविधा दिली. जून जुलै महिन्यात पाऊस चांगला झाला तरी त्याचे परिणाम ऑक्टोबर महिन्यात दिसतील. परंतु त्यापूर्वी शैक्षणिक वर्ष सुरु होईल. तोपर्यंत विद्यार्थ्यांनी करायचे काय? तेव्हा सरकारने या विद्यार्थ्यांच्या पुढील वर्षाची प्रवेश फी आणि शैक्षणिक शुल्काची काळजी घ्यावी. अशी मागणी करून मी माझे भाषण पूर्ण करतो.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी.: राज्यातील नागरी भागातील बेकायदेशीर बांधकामांना निर्बंध/ आळा घालण्याकरिता प्रस्तावित धोरणास मान्यता मिळणे

मु.शी.: राज्यातील नागरी भागातील बेकायदेशीर बांधकामांना निर्बंध/ आळा घालण्याकरिता प्रस्तावित धोरणास मान्यता मिळणे यासंबंधी माननीय राज्यमंत्र्यांचे निवेदन.

डॉ.रणजित पाटील (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 46 अन्वये पुढील निवेदन करतो.

(प्रेस : येथे सोबत जोडलेले निवेदन छापावे.)

..4..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी.: राज्यातील मराठवाडा, विदर्भ, पश्चिम महाराष्ट्रासह अनेक भागात दुष्काळाची गंभीर परिस्थिती निर्माण होणे

मु.शी.: राज्यातील मराठवाडा, विदर्भ, पश्चिम महाराष्ट्रासह अनेक भागात दुष्काळाची गंभीर परिस्थिती निर्माण होणे या विषयावर सर्वश्री धनंजय मुंडे, शरद रणपिसे, सुनील तटकरे,माणिकराव ठाकरे, जयंत प्र. पाटील, हेमंत टकले, संजय दत्त, कपिल पाटील, अमरसिंह पंडित, अमरनाथ राजूरकर, सतीश चव्हाण, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.संदीप बाजोरिया, ॲड.रामहरी रुपनवर, सर्वश्री अब्दुल्लाखान दुर्राणी, सुभाष झांबड, अशोक ऊर्फ भाई जगताप, आनंदराव पाटील, हरिसिंग राठोड, चंद्रकात रघुवंशी, डॉ.सुधीर तांबे, वि.प.स. यांचा प्रस्ताव

(चर्चा पुढे सुरु...)

ॲड.रामहरी रूपनवर (नामनियुक्त): सभापती महोदय, राज्यात पडलेल्या दुकाळाच्या संदर्भात नियम 260 अन्वये जो प्रस्ताव मांडण्यात आलेला आहे, त्यावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, या विषयावर अनेक सन्माननीय सदस्यांनी त्यांचे मुद्दे मांडलेले आहेत. परंतु जे मुद्दे मांडायचे राहून गेले आणि जे मुद्दे वस्तुस्थितीशी निगडीत आहेत ते मुद्दे मी येथे मांडत आहे.

सभापती महोदय, दुष्काळाच्या संदर्भातील खरी परिस्थिती रेकॉर्डवर येत नाही हे माझे पहिले दु:ख आहे. कारण मी रोज शेतकऱ्यांच्या शेतीमध्ये जाऊन विहिरींची आणि जनावरांच्या चाऱ्याची पाहणी करतो. त्यामुळे राज्यात नेमकी काय परिस्थिती आहे त्याची माहिती सरकारपुढे येत नाही. कालशासनाने सोलापूर आणि अहमदनगर जिल्ह्यांतील दुष्काळग्रस्त भागातील रब्बी पिकांसाठी काही सवलती जाहीर केल्या. ते किती चुकीचे आहे ते सांगतो. सोलापूर जिल्हयात

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.रामहरी रूपनवर.....

सर्वात कमी पाऊस माळशिरस तालुक्यामध्ये पडला त्या माळशिरसचे नाव त्यामध्ये नाही. त्या ठिकाणी फक्त 28 टक्के पाणी पडते. ही आकडेवारी जिल्हाधिकाऱ्यांनी दिलेली आहे. त्या भागात कॅनॉल आहे म्हणून तेथे लोक राहत आहेत, अन्यथा तेथील लोक मुंबईला आले असते, अशी परिस्थिती आहे.

यानंतर श्री.बोर्डे....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.रामहरी रूपनवर....

माण तालुका हा आमच्या शेजारी असल्यामुळे त्या तालुक्यात आणि आमच्या तालुक्यात काहीच फरक नाही. सभापती महोदय, ओढ्याच्या पलीकडे सातारा जिल्हा आणि ओढ्याच्या आलीकडे सोलापूर जिल्हा आहे. परंतु ओढ्याच्या पलीकडे 15 पैसे आणेवारी आणि ओढ्याच्या अलीकडे मात्र 95 पैसे आणेवारी दाखविली जाते. हे कसे होऊ शकते ? मुळात ओढ्याच्या अलीकडे कॅनॉल नाही. तरी सुध्दा अशी परिस्थिती आहे. दोन जिल्हाधिकाऱ्यांमध्ये अशा प्रकारे आणेवारी लावण्याचा प्रकार हा गंभीर आहे. मी डीपीसीच्या बैठकीमध्ये हा विषय उपस्थित केला होता. मला तहसीलदारांनी सांगितले की, या सर्व बाबी समितीने केलेल्या आहेत. मी समितीच्या दोन सदस्यांना तेथे आणले. त्यांनी सांगितले की, आम्हाला काहीच माहीत नाही आणि या संदर्भात बैठकही झाली नाही. आम्हाला सही करण्यास सांगितले म्हणून आम्ही त्यावर सही केली. महोदय, या राज्यात काय प्रकार सुरु आहे हे मी डीपीसीच्या बैठकीमध्ये सिध्द केले. आमच्या तालुक्यात केवळ 28 टक्के पाऊस झाल्यामुळे खरीप आणि रब्बी पिकांची पेरणी झाली नाही. त्यामुळे शासनाची आणेवारी काढण्याची जी पध्दत आहे ती चुकीची आहे, हे मी निदर्शनास आणून देतो.

सभापती महोदय, सध्या मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रात तीव्र दुष्काळ आहे. त्या भागात पाण्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. त्या भागात पाणीच नसेल तर ते कुठून देणार. त्या भागात शेततळी घेण्यात आले. परंतु पाऊसच पडला नाही तर त्या ठिकाणी पाणी साठण्याचा प्रश्नच नाही. त्यामुळे सध्या या भागांमध्ये भयावह परिस्थिती निर्माण झालेली आहे. सभापती महोदय, 1995 मध्ये राज्यात युतीचे शासन होते. त्यावेळी युती सरकारने 15 हजार कोटी रूपयांची तरतूद करुन राज्यात टँकरमुक्त महाराष्ट्र धोरण राबविण्याचे जाहीर केले होते. यापैकी 8 हजार कोटी रूपये खर्च सुध्दा केले होते. मी विचारु इच्छितो की, सध्या युतीचे शासन कार्यरत असताना पूर्वीसारखेच धोरण का राबविले जात नाही ? मी विनंती करतो की, 1995 मध्ये जसे धोरण स्वीकारले होते तशाच प्रकारचे धोरण आता सुध्दा स्वीकारावे.

सभापती महोदय, सोलापूर जिल्ह्यात 32 साखर कारखाने आहेत. त्या कारखान्यावर 2 कोटी लोकांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न अवलंबून आहे. सरकारच्या तिजोरीत 35 टक्के महसूल

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.रामहरी रूपनवर....

केवळ ऊस उत्पादक आणि साखर कारखान्यांच्या माध्यमातून येतो. माझ्या माहितीनुसार या वर्षी सोलापूर जिल्ह्यात 32 कारखान्यांपैकी केवळ तीन-चार कारखाने सुरु होतील. 32 पैकी केवळ तीन-चार कारखाने सुरु होणार असतील तर बाकीच्या कारखान्यातील लोखंडाचे काय करायचे ? त्या कारखान्यातील सामानाला भंगारमध्ये सुध्दा कोणी घेणार नाही. आपण या उद्योगाकडे तिरकेपणाने बघत आहोत. पश्चिम महाराष्ट्र हा डोंगराळ प्रदेश आहे. उभ्या डोंगरावर चहाच्या मळ्याप्रमाणे डाळिंबाच्या बागा लावल्या जातात आणि त्यातून ऊसाचे पीक घेतले जाते. ऊस उत्पादक शेतकऱ्यांना खूप कष्ट करावे लागतात. आमच्या भागातील ऊस उत्पादक शेतकरी कष्ट करून स्वतःची प्रगती करीत असताना सुध्दा त्याच्याकडे दुर्लक्ष केले जाते. किंबहुना आम्हाला सापत्न वागणूक दिली जाते. त्या भागातील साखर कारखाने चालले पाहिजे या दृष्टिकोनातून योग्य प्रकारे नियोजन केले पाहिजे. नाही तर ते कारखाने भंगारमध्ये विकावे लागतील. महोदय, मुंबईतील गिरण्यांची व गिरणी कामगारांची जशी अवस्था झाली तशी साखर कारखान्यांची आणि तेथील कामगारांची होईल. ही परिस्थिती खरोखरच निर्माण होणार आहे. त्यामुळे या विषयाकडे सरकारने गांभीर्याने बघितले पाहिजे.

सभापती महोदय, आमच्या भागात खरीप आणि रब्बी पिकांची पेरणीच झाली नाही तर आणेवारी काढण्याचा प्रश्नच येत नाही. त्या ठिकाणची आणेवारी शून्य पाहिजे. परंतु प्रशासनाने त्या ठिकाणची आणेवारी 90 पैशांपर्यंत दाखविली आहे. महोदय, आमच्या जिल्ह्याचे जिल्हाधिकारी कोणाचेच ऐकत नाहीत. ते माननीय पालकमंत्र्यांचे सुध्दा ऐकत नाहीत. हे संपूर्ण राज्याला माहीत झाले आहे.

सभापती महोदय, हल्ली सारखा दुष्काळ पडतो. कधी विदर्भात तर कधी पश्चिम महाराष्ट्रात गारपीट होते, तर कधी अवकाळी पाऊस येतो किंवा कधी कधी पाऊसच पडत नाही. वारंवार पडणाऱ्या दुष्काळावर मात करण्यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना वा धोरण ठरवावे लागेल. शिवाय दुष्काळावर मात करण्यासाठी निधीची तरतूद करावी. अती पाऊस झाला तरी ओला दुष्काळ पडतो आणि कमी पाऊस झाला तरी कोरडा दुष्काळ पडतो. कधी कधी योग्य पाऊस झाला आणि जास्त उत्पादन झाल्याने बाजारात एकदम माल आला तरी भाव पडून शेतकऱ्यांचे

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.रामहरी रूपनवर....

नुकसान होते. सर्वच बाबी पावसावर अवलंबून आहेत असे नाही. हे सर्व खरे असले तरी आज अतिशय भयावह अशी परिस्थिती शेतकऱ्यांवर ओढवलेली आहे.

सभापती महोदय, मी दूध संघ चालवितो. आज त्या दूध संघाची काय अवस्था आहे ? दोन वर्षांपूर्वी दुधाचा प्रती लीटर दर 28-29 रूपये होता. परंतु आता तो दर नाही. जनावरांच्या चाऱ्याचे दर दुपटीने वाढले आहेत. परंतु दूध दराच्या बाबतीत सरकारचे कसल्याही प्रकारचे ठोस धोरण नाही. आज दूध संघ बंद पडण्याच्या मार्गावर आहेत. अनेकांनी आपली जनावरे विकून टाकली आहेत. आज दूध निर्मिती होत नाही. पूर्वी एका तालुक्यात तीन-चार लाख लीटर दुधाची निर्मिती होत होती, परंतु आता ती निर्मिती 10-20 हजार लीटरवर आली आहे.

सभापती महोदय, विविध विकास महामंडळामध्ये जिल्हा निकष ठरविण्यात आलेला आहे. वास्तविक पाहता या ठिकाणी तालुका हा निकष धरला पाहिजे. माण तालुक्यासह सांगोला, आटपाडी, जत, कवठेमहांकाळ हे राज्यातील 5-7 तालुके मिळून माण जिल्हा करावा असा प्रस्ताव माननीय वसंतदादा पाटलांनी आणला होता. सोलापूर जिल्ह्यातील काही तालुके बागायती आहेत. त्या तालुक्यांना धरून सांगोला आणि मंगळवेढा तालुक्याला सुध्दा बागायतीमध्ये मोजले गेले आहे. मी तर म्हणेन की, गव्हाबरोबर किडे रगडण्याचा प्रकार सुरु आहे. त्यामुळे हा निकष बदलण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्रात सतत दुष्काळ असतो म्हणून वस्तुस्थितीदर्शक निधी आणि नियोजनाच्या दृष्टीने तरतूद करणे आवश्यक आहे. मराठवाड्यात पाण्याची परिस्थिती कधी नव्हे इतकी वाईट आहे. त्या ठिकाणी गढूळ पाण्याची घागर 30 ते 50 रूपयाला विकत मिळते. त्या भागातील लोक स्थलांतरीत होत आहेत. माझी खंत आहे की, राज्यातील दुष्काळाची वस्तुस्थिती रेकॉर्डवर येत नाही. माझी मागणी आहे की, दुष्काळाबाबतची वस्तुस्थिती रेकॉर्डवर आणण्याच्या दृष्टीने सरकारने प्रथम प्रयत्न केला पाहिजे.

सभापती महोदय, विकास महामंडळाच्या नियोजनाचे निकष बदलण्याची आवश्यकता आहे. तसेच आपत्ती निवारणासाठी कायमस्वरूपी तरतूद करण्याची आवश्यकता आहे. शेती मालाची किंमत

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

उत्पादक ठरविणार अशी स्थिती निर्माण करावयास पाहिजे. जेणेकरुन एकही आत्महत्या होणार

ॲड.रामहरी रूपनवर....

नाही. हे आपल्याला करावेच लागेल. तसेच दुष्काळाबाबतची वस्तुनिष्ठ माहिती येण्याबाबत नियोजन करणे आवश्यक आहे. पाणी वापर, पाणी साठवण, ठिबक पध्दती आणि पीक पध्दती बाबत सरकारचे काहीच धोरण नाही. त्यामुळे या संदर्भातील धोरण तयार केले पाहिजे, अशी माझी मागणी आहे. महोदय, या प्रस्तावावरील चर्चेच्या माध्यमातून मी सरकारला ज्या उपाययोजना सुचविल्या आहेत त्या सरकारने कराव्यात. या प्रस्तावावर बोलण्यासाठी वेळेची मर्यादा असल्यामुळे मी माझे भाषण येथेच थांबवितो.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.प्रकाश गजभिये (नामनियुक्त) : सभापती महोदय, नियम 260 अन्वये मांडण्यात आलेल्या प्रस्तावावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, सरकार दुष्काळाच्या प्रश्नावर किती गंभीर आहे याचे ज्वलंत उदाहरण या ठिकाणी पहावयास मिळत आहे. माननीय मुख्यमंत्री आणि माननीय कृषी मंत्री भारतीय जनता पक्षाचे असताना सुध्दा त्यापैकी कोणीही या ठिकाणी उपस्थित नाहीत. दुष्काळाच्या परिस्थतीत माननीय मंत्री श्री.दिवाकर रावते हे शेतामध्ये नांगर घेऊन पेरणी करण्यासाठी गेल्याचे आम्ही बघितले होते. त्यामुळे खऱ्या अर्थाने शेतकऱ्याचे सुपूत्र असलेले माननीय श्री.दिवाकर रावते हे या सभागृहात उपस्थित आहेत याचा आम्हाला आनंद आहे.

सभापती महोदय, अर्थसंकल्पीय अधिवेशन 9 मार्चपासून सुरु झाले आहे. आपण गेल्या तीन दिवसांपासून या प्रस्तावावर चर्चा करीत आहोत. राज्यात दुष्काळ असताना मुके-बहिरे असलेले सरकार, असंवेदनशील असलेले सरकार जागे होईल आणि शेतकऱ्यांना न्याय देईल, राज्याच्या शेतकऱ्याविषयी नवीन धोरण तयार करेल, यासाठी आम्ही विरोधी पक्षाने सरकारची प्रतिकात्मक प्रेतयात्रा काढली. या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना प्रत्यक्षात काय मिळणार आहे याकडे राज्यातील 11 कोटी जनतेचे लक्ष लागलेले आहे, ही वस्तुस्थिती आहे. सभापती महोदय, खरोखरच हे सरकार संवेदनशील आहे काय, या बाबतचा आम्ही अभ्यास केला. आज दुष्काळामध्ये मराठवाडा, विदर्भ आणि कोकणासह सर्वच भागात जनावरे मरत आहेत. त्यांचे फार हाल होत आहेत.

2 जी.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. प्रकाश गजभिये ....

सभापती महोदय, आपण मला बोलण्यास संधी दिल्याबद्दल मी आपले धन्यवाद मानले पाहिजेत. तुमच्या 4 लोकांची या लोकांनी, या शासनाने काय अवस्था केली आहे, तुम्ही सुध्दा दुष्काळामध्ये होरपळत आहात. विनायकरावजी मेटे, सदाभाऊ खोत, रामदास आठवले साहेब, महादेवराव जानकर साहेब. निदान राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने तुम्हाला तालिका सभापती तरी बनविले याचा आम्हाला आनंद होत आहे. काल पुण्याच्या व्यासपीठावर सन्माननीय सदस्य श्री. महादेव जानकर म्हणाले ....

तालिका सभापती : आपण दुष्काळावर बोलावे.

श्री. प्रकाश गजभिये : सभापती महोदय, मी दुष्काळावरच बोलत आहे. मी आपल्या दुष्काळाच्या संदर्भात सांगत आहे.

तालिका सभापती : त्या दुष्काळाच्या संदर्भात वेगळी चर्चा ठेवू या, त्यावर तुमचे भाषण ठेवू.

श्री. प्रकाश गजभिये : सभापती महोदय, सरकारमधील अभ्यास गट इस्त्रायलला अभ्यास करण्यासाठी गेला, तेथून अभ्यास करून काय मिळविले हे समजत नाही, त्यासाठी किती तरी रुपये खर्च आला. आपले कोण माननीय मंत्री यामध्ये होते हे आम्हाला माहीत नाही. इस्त्रायलमध्ये कशी सुपीक शेती आहे, तेथे कमी हेक्टरमध्ये कसे जास्त उत्पादन घेतात हे पहायला गेले. तेथील शेतकरी आत्महत्या करीत नाही. आपल्या देशातील सोडा मात्र आपल्या राज्यातील कास्तकार, शेतकरी आत्महत्या करू नये यासाठी तुम्ही काय शिक्षण घेऊन आलात आणि त्यासाठी किती खर्च केलात हा प्रश्न विरोधी पक्षाच्या बाकावरून मी तुम्हाला विचारीत आहे. आपण या प्रश्नाचे उत्तर द्यावे. सदनात जास्त सन्माननीय सदस्य, माननीय मंत्री उपस्थित नसतील, मात्र माननीय सभापती महोदय व सरकारमधील काही प्रतिनिधी येथे बसले आहेत.

सभापती महोदय, इस्त्रायलला जाऊन आल्यानंतर केंद्र सरकारच्या पथकाने संपूर्ण राज्यभर फिरण्याचा देखावा, कांगावा केला. आम्हाला वाटत होते की, सरकार अभ्यास करून आले, त्यामुळे आता आम्हाला मार्गदर्शन मिळेल. केंद्र सरकारचे अधिकारी, प्रतिनिधी मंडळ घेऊन संपूर्ण मराठवाड्यात फिरले आणि रात्रीचा दौरा केला. रात्री त्यांना जनावरे उपाशी आहेत, शेतकरी

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. प्रकाश गजभिये ....

उपाशी आहेत याबद्दल काय दिसत होते ते आम्हाला समजले नाही. आम्हाला वाटत होते की, दुसऱ्या दिवशी वर्तमानपत्रात येईल आणि ते काही तरी घोषणा करून जातील. सभापती महोदय, शेतकऱ्यांना आतापर्यंत दिलेले पॅकेज पूर्णत्वास गेलेले नाही. आता काही तरी त्यांच्या पदारात पडेल असे वाटत होते. आता सरकारमध्ये माननीय मंत्री श्री. दिवाकर रावते साहेब आहेत. सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील म्हणाले की, ते शेतकऱ्यांचे खरे सुपूत्र आहेत, त्यांच्याबरोबर काम करायला आम्हाला आवडेल. आताच सन्माननीय सदस्य सदनातून गेले. मी म्हणतो की, त्यांच्या हातात काहीच नाही, त्यांची परिस्थिती फार विचित्र झाली आहे, त्यांनी घेतलेला निर्णय पटेनासा होतो हे आम्ही उघड्या डोळ्यांनी पाहत आहोत. त्यांची, शिवसेनेची विदारक अवस्था झाली आहे, त्यांना सुध्दा शेतकऱ्यांकरिता आंदोलन करावे लागत आहे आणि ती परिस्थिती सर्व 11 कोटी लोक वर्तमानपत्रांतून वाचत आहेत, टीव्हीच्या माध्यमातून पाहत आहेत.

सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्री ज्या गावात जातात त्या गावात दुसऱ्याच दिवशी आत्महत्या होते. मला सांगावयाचे आहे की, राज्यातील शेतकरी एखाद्यावर विश्वास ठेवेल, ज्याच्या बोलण्यामुळे सुखावेल असा कोणी माणूस उरलेला नाही. शेतकऱ्याच्या पाठीवर हात ठेवला तर तो हात शेतकऱ्यांना आपला वाटेल, माझा कोणी तरी बाप आहे, मला जीवन जगावेच लागेल, मी मरणाच्या मार्गावर जाणार नाही असा ज्याच्यामुळे शेतकरी म्हणेल असा कोणी माणूस या राज्यात दिसत नाही. मला सांगावेसे वाटते की, तुम्ही शेततळे करणे यासारख्या अनेक ऐतिहासिक योजना राज्यात लागू करण्याच्या प्रयत्न करीत आहात. आम्ही सन 1995 मध्ये युतीच्या काळातील योजना पाहिल्या. झुणका भाकर योजना, 27 लाख लोकांना नोकऱ्या देणे योजना अशा योजना पाहिल्या. आता आपण मागेल त्याला शेततळे देण्याची योजना केली आहे. आपण मागेल त्याला काय शेततळे देणार ? समजा एखाद्या जवळ दीड एकर शेती आहे, त्याने अर्ध्या एकरात शेततळे बांधले तर तेथून तो काय उत्पादन काढेल, तुम्ही शेततळे देण्यासाठी काय निकष लावले ? तुम्ही निकष लावले की, त्याच्याकडे 225 मीटर जमीन असली पाहिजे, त्याचे बीपीएल यादीमध्ये नाव असले पाहिजे आणि त्यानंतर 50 हजार रूपयांच्या आत तुम्ही पैसे देणार आणि त्याच्या पुढील खोदकामासाठी पैसा लागला तर तो शेतकरी स्वत: खर्च करेल. तुमचे असे निकष आहेत. तुमचे

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. प्रकाश गजभिये ....

असे निकष असतील तर कोण तुमचे शेततळे घ्यायला अर्ज करणार, किती लोकांचे अर्ज आले आहेत ? आपण या संदर्भात पाहिले पाहिजे. आमच्या विदर्भात 50 हजार शेततळे देणार होता. शेततळ्यांची संकल्पनाच चुकीची आहे. अगोदरच्या सरकारने एक लाख रुपये देण्याचा प्रयत्न केला होता, ती मर्यादा तुम्ही 50 हजार रुपयांवर आणली. आपण आता जलयुक्त शिवार योजनेचा फार मोठा गाजावाजा करीत आहात. नदीचे, नाल्याचे खोलीकरण करीत आहात. कोणत्याही सर्वसामान्य माणसाला समजते की, आपण आता अमुक लाख रुपये खोलीकरणाला खर्च करीत आहात. 5-6 महिन्यांनी पाऊस आला आणि ते नदी, नाले पुन्हा भरून गेले तर त्यातील गाळ काढायला तुम्ही पुन्हा पैसे द्याल का ? तुम्हाला त्यामध्ये भ्रष्टाचार वाटत नाही. तुम्ही प्रयत्न केला आणि 40-50 नद्या स्वच्छ केल्या, त्याचे खोलीकरण केले आणि पाणी आल्यावर त्या भरल्या तरी तेथे कसे पाणी थांबेल ?

सभापती महोदय, आत्महत्यांचा लेखाजोखा घेतला. सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस म्हणाल्या की, आमच्या काळात आत्महत्या जास्त झाल्या, हे तुमचेच आकडे आहेत. सन 2001 पासून सन 2015 पर्यंतची आकडेवारी आहे. मी फक्त सन 2013 व सन 2014 चे आकडे वाचणार आहे, बाकीचे वाचणार नाही. सन 2013 मध्ये 1297 आत्महत्या झाल्या, 2014 मध्ये 1811 आत्महत्या झाल्या, सन 2015 मध्ये 3228 आत्महत्या झाल्या. मराठवाड्यात सर्वात जास्त आत्महत्या कुठे झाल्या असतील तर त्या अमरावती विभागात झाल्या. अमरावती विभागातील आत्महत्या 1179 आहेत, औरंगाबाद विभागातील आत्महत्या 1130 आहेत, म्हणजे आमच्या पश्चिम विदर्भात सर्वात जास्त दुष्काळ आहे. तेथे 50 पैशापेक्षा कमी आणेवारी असलेली जास्त गावे आहेत. आम्हाला विदर्भाविषयी काही सांगावेसे वाटत आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.प्रकाश गजभिये.....

आमच्या विदर्भाला मुख्यमंत्री पद मिळाले. त्यामुळे आम्हाला असे वाटले होते की, निश्चितच विदर्भातील आत्महत्यांचे प्रमाण कमी होईल. मला या ठिकाणी सरकारला असे सांगावयाचे आहे की, सर्व कामे बाजूला ठेवावीत आणि दुष्काळ निवारणाकडे लक्ष द्यावे.

सभापती महोदय, या देशात काय सुरु आहे ? 17 बँकांची 9 हजार कोटी रुपयांची कर्जे थकविणारा उद्योगपती भारतातून निसटून जातो. मग राज्य सरकारने 1 लाख कोटी रुपयांचे कर्ज आपल्या राज्यातील शेतकऱ्यांसाठी काढले आणि त्यांना कर्जमाफी दिली तर काय बिघडणार आहे ? अशा प्रकारचा कळवळा या राज्य सरकारला आहे का ?

सभापती महोदय, आपल्या राज्यातील शेतकऱ्याला वाचवायचे असेल तर त्यांच्यासाठी सरकारने पेन्शन योजना सुरु केली पाहिजे. त्यांना प्रति महिना किमान 3 हजार रुपये मिळाले तरच ते वाचू शकतील.

तालिका सभापती (श्री.विनायक मेटे) : सन्माननीय सदस्यांनी कृपया आपले भाषण आटोपते घ्यावे.

श्री.प्रकाश गजभिये : सभापती महोदय, मला अनेक मुद्दे मांडावयाचे होते. परंतु, वेळेअभावी मी माझे भाषण पूर्ण करतो.

...2....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.रामभाऊ वडकुते (नामनियुक्त) : सभापती महोदय, विरोधी पक्षाने उपस्थित केलेल्या दुष्काळी परिस्थितीवरील चर्चेत भाग घेण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, या राज्यात सातत्याने गेल्या चार वर्षापासून दुष्काळी परिस्थिती आहे.

सभापती महोदय, सन्माननीय परिवहन मंत्री श्री.दिवाकर रावते हे खाली बसून असे बोलले की, मी आरक्षणावर बोलावे. परंतु, आता त्या विषयावर बोलण्यासारखे काही नाही. पण आपण आमच्या मतांवर सरकारमध्ये आला आहात, हे विसरु नका, एवढेच मला सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, राज्यातील दुष्काळी परिस्थिती पाहता सर्वात जास्त भयानक परिस्थिती मराठवाड्यातील आहे. माननीय मंत्री श्री.दिवाकर रावते हे आमच्या जिल्ह्याचे पालकमंत्री आहेत. मी त्यांच्या तोंडावर कौतुक करणार नाही. पण त्यांनी सातत्याने जिल्ह्यात फिरुन तेथील परिस्थिती बघितली आहे. मी त्यांना माहिती देऊ इच्छितो की, आताच मला 'आयबीएन लोकमत' या वाहिनीच्या एका रिपोर्टरचा फोन आला होता व त्यांनी असे सांगितले की, परभणी जिल्ह्यातील 108 दुष्काळग्रस्त गावात अधिग्रहित केलेल्या विहिरींचे पैसे अद्याप न दिल्यामुळे तेथील स्त्रियांनी आपले मंगळसुत्र विकले आहे. या चर्चेच्या निमित्ताने या घटनेची नोंदही शासनाने घेण्याची आवश्यकता आहे. पिण्याच्या पाण्यासाठी शासन खाजगी विहिरी अधिग्रहित करीत असेल आणि त्यांना जर पैसे देणार नसेल तर दुष्काळ निवारणासाठी पैसे कमी पडू दिले जाणार नाहीत, या राज्य सरकारच्या घोषणेला काय अर्थ राहणार आहे ? हे सरकार संवेदनशील आहे, असे आपण म्हणत असाल तर 8/8 महिने विहिरींचे पैसे का दिले जात नाहीत ? आपण निवडणुकीपूर्वी आणि निवडणुकीनंतर अनेक घोषणा केल्या आहेत. आपण दुबार पेरणीसाठी 1500 रुपये देण्याची घोषणा केली आहे. पण आतापर्यंत एका तरी शेतकऱ्याने दुबार पेरणीसाठी पैसे घेतले आहेत का, याचीही माहिती आपण द्यावी. मला फक्त एवढेच सांगावयाचे आहे की, आपण फक्त घोषणा करु नका. आम्ही येथे राजकारणावर बोलण्यासाठी उभे राहिलेलो नाही. परंतु, राज्यातील परिस्थिती अतिशय भयानक आहे व ती आपण गांभीर्याने घेण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, ही चर्चा होत असताना तुमच्या काळात आत्महत्या होत नव्हत्या का, अशा प्रकारचे प्रश्न विचारले जात आहेत. माझी एवढीच विनंती आहे की, अशा प्रकारचे प्रश्न

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.रामभाऊ वडकुते.....

विचारु नका. शेतकरी काही सुखाने आत्महत्या करीत नाही. मुले, बाळे असताना, सर्व काही सोडून शेतकरी आत्महत्या करीत असेल तर त्याचा शासनाने गांभीर्याने विचार केला पाहिजे. परंतु, तसा विचार केला जात नाही, हे दुर्दैव आहे.

सभापती महोदय, भारत हा कृषीप्रधान देश आहे. माननीय पंतप्रधान श्री.नरेंद्र मोदी यांनी अशी घोषणा केली होती की, आमचे सरकार येईल त्यावेळी शेतकऱ्यांना वाचविण्यासाठी 50 टक्के नफा ठेऊन उत्पादनावर आधारित दर निश्चित केले जातील. या घोषणेचे काय झाले ? स्वामीनाथन समितीने केलेल्या शिफारशी शासनाने स्वीकारल्या तर शेतकऱ्यांच्या आत्महत्या होणार नाहीत.

सभापती महोदय, माननीय मंत्री श्री.दिवाकर रावते यांना चांगला अनुभव आहे. ते मुंबईत असले तरी 15-20 वर्षे त्यांनी मराठवाड्यात घालविली आहेत. बीड जिल्ह्यामध्ये 10-10 मंत्री गेले होते. वर्तमानपत्रात बातमी आली की, एका मंत्री महोदयांच्या स्वीय सहायकाने शेतकऱ्याला मारहाण केली. आपण त्या ठिकाणी लोकांना मारहाण करण्यासाठी गेला होता की, दुष्काळी परिस्थितीची पहाणी करण्यासाठी गेला होता ? शेतकऱ्याने काही मागणी केली आणि त्याला जर अशा प्रकारे मारहाण होत असेल तर त्यांनी त्यासाठी आपल्याला निवडून दिले आहे का ? अशा प्रकारे वागण्यासाठी आपल्याला सत्ता दिलेली आहे का, याचाही विचार आपल्याला करावा लागणार आहे.

सभापती महोदय, यापूर्वी एका सन्माननीय सदस्यांनी सरकारने चांगल्या योजना घेतल्याबद्दल सरकारचे अभिनंदन केले आणि पुढे असे सांगितले की, अधिकारी या योजना योग्य प्रकारे राबवीत नाहीत. याचा अर्थ काय आहे ? या सरकारचा अधिकाऱ्यांवर अंकुश राहिलेला नाही. त्यांनी असेही सांगितले की, आपल्या राज्यातील धान्य हैद्राबाद येथे जाते. त्यामुळे हे सरकारच भ्रष्टाचार करीत आहे की काय, असे म्हटले तर चुकीचे होणार नाही. सरकारी योजना अंमलबजावणी यंत्रणेमार्फत चांगल्या प्रकारे कशा राबविल्या जातील, याबाबतचा विचार करणे गरजेचे आहे. आम्ही चांगल्या योजना तयार केल्या आहेत, चांगल्या घोषणा केल्या आहेत, असे म्हणावयाचे आणि त्या योग्यप्रकारे राबविल्या जात नसतील तर सामान्य जनतेला काहीही उपयोग होणार नाही.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.रामभाऊ वडकुते.....

सभापती महोदय, या सरकारने शेततळ्यांबाबतही घोषणा केलेली आहे. आमच्या पालकमंत्री महोदयांनी बैठक घेतली. 10 ते 12 गावांमध्ये पिकांसाठी वीज द्यावी, अशा प्रकारची मागणी आम्ही त्यांच्याकडे केली. पालकमंत्री महोदयांनी देखील जिल्हाधिकाऱ्यांना आदेश दिले की, 10-15 दिवसात पिके येणार आहेत, त्यांना पाणी सोडावे. दुसऱ्या दिवशी इरिगेशनच्या अधिकाऱ्यांनी असे सांगितले की, आम्हाला जिल्हाधिकारी महोदयांकडून निदेश आलेले नाहीत. अशा प्रकारे कारभार होणार असे तर शेतकरी कसा वाचेल, याची जाणीव मी आपल्याला करुन देत आहे.

सभापती महोदय, दुष्काळात बँकांकडून कर्ज वसुली केली जाणार नाही, असे सरकारने सांगितले आहे. परवा हिंगोली जिल्ह्यातील एक शेतकरी माझ्याकडे आला होता. स्टेट बँक ऑफ इंडियाने मराठवाड्यात कर्ज वसुलीसाठी वेगळ्या यंत्रणेची नेमणूक केली आहे. आता बँकांकडून वसुली केली जात नाही. या यंत्रणेचे अधिकारी घराला कुलुप ठोकतात. त्या अधिकाऱ्यांनी या शेतकऱ्याला नोटीस दिलेली आहे. एकीकडे कर्ज वसुली बंद आहे, असे सांगता आणि अशा प्रकारे शेतकऱ्यांकडून कर्जाची वसुली सुरु आहे, हे बरोबर नाही.

सभापती महोदय, शेतीसाठी ट्रान्स्फॉर्मर हा अतिशय महत्वाचा भाग आहे. पैसे दिल्याशिवाय ट्रान्स्फॉर्मर मिळत नाही. पालकमंत्री महोयांनल या संदर्भात जिल्हाधिकाऱ्यांना असे आदेश दिले होते की, जे कोणी पैसे घेतील त्यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करावा. असे प्रकार घडत असतील तर शेतकरी आत्महत्या करणार नाही तर काय करतील ?

सभापती महोदय, शेतकऱ्यांना कर्जमाफी द्यावी, असा आग्रह सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी नागपूर येथील अधिवेशनात धरला होता. परंतु, विरोधी पक्षाने अधिवेशन चालू दिले नाही, असा आरोप आपण केला. आमच्या जाणत्या राजाने 73 हजार कोटी रुपयांची कर्जमाफी केली होती. त्यावेळी कर्जमाफी केल्यामुळे आत्महत्या थांबतात का, असा प्रश्न आपण विचारला होता.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.रामभाऊ वडकुते.....

आत्महत्या थांबणार नाहीत. परंतु, त्या काही प्रमाणात तरी कमी होतील आणि तशा त्या झाल्या होत्या. गेल्या चार वर्षांपासून या राज्यात दुष्काळी परिस्थिती आहे. या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी असा किती निधी लागणार आहे ?

यानंतर श्री.बोरले.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.रामराव वडकुते.....

माननीय विरोधी पक्षनेते आणि आम्ही सर्व आमदारांनी सातत्याने मुख्यमंत्री महोदयांची भेट घेतली. माननीय श्री.शरद पवार साहेबांनी देखील मुख्यमंत्री महोदयांची भेट घेतली. मराठवाड्यात मागील 4 वर्षापासून पाऊस पडलेला नाही. शासनाने मराठवाड्यातील शेतकऱ्यांचे तरी कर्जमाफ करावे, अशी आम्ही विनंती केली होती. त्यासाठी फक्त 7 हजार कोटी रुपये लागणार होते. आपण मोबाईल कंपन्यांचे 3 हजार कोटी रुपयांचे कर्जमाफ करता. परंतु, तुम्ही शेतकऱ्यांना वाचविण्यासाठी त्यांचे 7 हजार कोटी रुपयांचे कर्ज माफ करु शकत नाही, याचा सुद्धा आपल्याला विचार करावा लागेल. शेतकरी जगला तर आपण जगू शकतो. शेतकरी धान्य पिकवितो आणि ते आपल्याला खायला देतो, याचे आपल्याला भान राहिले पाहिजे. परंतु, याकडे गांभीर्याने बघितले जात नाही. माझी मागणी आहे की, आपण प्रथम शेतकऱ्यांचे कर्जमाफ केले पाहिजे. शेतकऱ्यांचे विजेचे बिल माफ केले पाहिजे. शासनाला ज्या उपाययोजना करावयाच्या आहेत त्या शासनाने केल्या पाहिजेत.

सभापती महोदय, आम्ही मागेल त्याला मनरेगा अंतर्गत विहीर मंजूर करु, असे सांगण्यात आले होते. मनरेगा अंतर्गत किती विहिरी मंजूर करण्यात आलेल्या आहेत याबाबत मी औरंगाबाद आयुक्तांकडे विचारणा केली. मी हिंगोली येथील जिल्हाधिकाऱ्यांना विचारले असता त्यांनी मला सांगितले की, आपल्याला शंभर विहिरींपेक्षा जास्त विहिरी मंजूर करता येणार नाहीत. मग नेमके कोण निर्णय घेत आहेत ? मंत्रिमंडळाच्या बैठकीत झालेल्या निर्णयाची, मंत्री महोदयांनी किंवा राज्यमंत्री महोदयांनी घेतलेल्या निर्णयाची स्थानिक पातळीवर अंमलबजावणी होत नसेल तर त्या निर्णयाचा काय उपयोग आहे, याचा देखील आपण विचार करण्याची आवश्यकता आहे. मी सांगू इच्छितो की, शेतकऱ्यांना आत्महत्येपासून परावृत्त करावयाचे असेल तर प्रथम त्यांचे कर्जमाफ केले पाहिजे. दुष्काळी भागातील शेतकऱ्यांच्या मुलांची शैक्षणिक फी माफ करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. परंतु, त्या निर्णयाची देखील अंमलबजावणी झालेली नाही. शेतकऱ्यांना मोफत वीज मिळाली पाहिजे. टान्सफॉर्मर जळाला तर दुसऱ्या दिवशी शेतकऱ्यांना वीज मिळाली पाहिजे. परंतु, आज परिस्थिती काय आहे ? एक मंत्री वेगळे बोलतात तर दुसरे मंत्री वेगळेच बोलतात. परवा

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.रामराव वडकुते.....

मुख्यमंत्री महोदयांनी पाणी पुरवठ्याच्या टँकरबाबत सांगितले की, पाण्याचे टँकर भरण्यासाठी विजेमुळे अडचण आली तर आम्ही ते दुरुस्त करु. मेक इन इंडिया कार्यक्रमात वित्तमंत्र्यांनी सांगितले की, राज्यात कोठेही विजेचा तुटवडा नाही. आज राज्यात भारनियमन होत असताना देखील राज्यात विजेचा तुटवडा नाही असे सांगितले जाते. म्हणजे एका मंत्री महोदयांचे स्टेटमेंट वेगळे असते आणि दुसऱ्या मंत्री महोदयांचे स्टेटमेंट वेगळे असते. जी सत्यता आहे ती आपल्याला नाकारता येणार नाही. शासनाने ग्रामीण भागात चांगल्या उपाययोजना करण्याच्या दृष्टीकोनातून निर्णय घ्यावेत आणि शेतकऱ्यांना वाचविण्याचा प्रयत्न करावा, अशी विनंती करुन मी माझे भाषण पूर्ण करतो.

तालिका सभापती : सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन सोमवार, दिनांक 14 मार्च, 2016 रोजी दुपारी 12.00 वाजता सभागृहाची बैठक पुन्हा भरेल.

(सभागृहाची बैठक सायंकाळी 5 वाजून 43 मिनिटांनी सोमवार, दिनांक 14 मार्च, 2016 रोजीच्या दुपारी 12.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION